म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.

# सात स्वरश्री

गोपालकृष्ण भोबे

REFBK-0015201



# सात स्वरश्री

गोपालकृष्ण भोबे

# सात स्वर श्री

अनुक्रम ७०५५८ दि. ३१/५/६६ २७।५।६६

# सात स्वरश्री

लेखक : गोपालकृष्ण भोबे

दा. क्र. १५२०१
REFBK-0015201

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

किंमत १ रुपया

मुखपृष्ठ चित्रकार : दिनानाथ दलाल
दलाल आर्ट स्टुडिओ, मुंबई

रेखाचित्रे : व्ही. एन्. ओके

प्रकाशक : संचालक, प्रसिद्धी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

# मनोगत—

महाराष्ट्रातील शिष्ट समाजात अभिजात संगीताला मानाचे स्थान मिळवून देणाऱ्या, संगीताची पेठ महाराष्ट्रातील बहुजन समाजाला खुली करणाऱ्या आणि अखिल भारतातील संगीत सृष्टीत महाराष्ट्राची मान ताठ ठेवणारा शिष्य संप्रदाय निर्माण करणाऱ्या सात संगीत महर्षींच्या या जीवनकथा.

ही सातही नावे संगीताला आजीव वाहून घेतलेल्या साधकांना प्रातःस्मरणीय अशी आहेत. या सप्तर्षींच्या जीवनांतील घटना इतक्या हृद्य आणि रोमहर्षक आहेत की, त्या कितीही वेळा ऐकल्या तरी त्यातील गोडी अवीट वाटते. संगाताची सेवा करणाऱ्या ज्या कलावंतांनी आणि शास्त्रकारांनी या लोकांना प्रत्यक्ष पाहिले आणि ऐकले, त्यांच्यासमोर यांतील कुणाही एकाचे नांव घेतले की, जीवनात घडून गेलेल्या एका अत्यद्भुत साक्षात्काराचा आनंद त्यांच्या मुखावर ओसंडू लागतो. जणू ब्रह्म पाहिल्याचा सोहळा ते जेव्हा वर्णन करू लागतात तेव्हा ऐकणाऱ्यांचेही भान हरपते.

मी या सप्तर्षींसंबंधी खूप ऐकले, इतके ऐकले की, त्यातील एकेक घटना एकेका प्रदीर्घ लेखाचा विषय व्हावी. एकच घटना निरनिराळे संप्रदायी निरनिराळ्या तऱ्हेने सांगतात; मात्र त्यांतील भावना एकच असते. जसे एकाच घराण्याच्या गायकीचे अध्ययन केलेल्या गायकांच्या एखाद्या रागाच्या मांडणीमध्ये, चिजेच्या बंदीषीमध्ये, आलापीमध्ये आणि सुरावटीमध्येही फरक आढळतो. तसेच याबाबतीतही म्हणता येईल.

या चरित्रातील काही घटना अशा आहेत की आजच्या जमान्यातील काही लोकांना त्या अवास्तवही वाटण्याचा संभव आहे; परंतु चाळीस

वर्षांपूर्वीच्या आणि आजच्या परिस्थितीत जमीन-अस्मानाचा फरक पडलेला आहे हे येथे लक्षात घेतले पाहिजे.

त्या काळी घरोघरी तुडुंब भरलेली धान्याची कोठारे होती. बाजारांत एका रुपयाला पस्तीस ते चाळीस शेर धान्य आणि एका रुपयाला पस्तीस शेर दूध—दारात म्हशी उभ्या करून डोळ्यांदेखत पिळून मिळत होते. घासाघासाला चार-पाच तरी बदाम-पिस्ते मिळावे अशी अस्सल साजुक तुपाची मिठाई आठ आणे शेर होती. आजच्या नव्या पिढीला या दंतकथा वाटणे स्वाभाविक आहे; पण या सत्यकथा आहेत. ती परिस्थिती पाहिलेली, भोगलेली माणसे जिवंत आहेत. आणि म्हणूनच या चरित्रातील चरित्रनायकांचे व्यक्तित्व अधिक भरदार करणाऱ्या काही ऐकीव घटना मी त्यात कोणताही फेरफार न करता जशा ऐकल्या तशाच मांडल्या. चालू काळाशी त्यांची सांगड घालून, त्यांना वास्तवतेच्या मुशीत कोंबून त्यांचा नूर बदलण्याचा प्रयत्न मी केला नाही. वास्तविक हे सातही गुरुजन त्यांच्या विशाल संप्रदायाला परब्रह्मस्वरूप वाटतात. त्यांचे गुणानुवाद गाताना या संप्रदायातील प्रत्येकाला शब्द अपुरे पडतात. त्या मानाने माझ्या लेखणीला मर्यादा पडलेल्या आहेत.

अभिजात संगीताची अभिरूची बहुजनसमाजात आज अपरंपार वाढत आहे. संगीत कलेच्या ऊर्जितावस्थेसाठी झटणाऱ्यांच्या पाठीशी भारताची शासनसंस्था आज उभी आहे. अशा वेळी संगीताची उपासना करू इच्छिणाऱ्या नव्या पिढीला आणि संगीताची आवड असलेल्या बहुजनसमाजाला संगीतातील या महापुरुषांनी केलेल्या आटोकाट परिश्रमांची व हठयोगी साधनेची थोडीशी जाणीव असावी आणि 'आपण त्यांच्या समान होऊ' अशी स्फूर्ती भावी पिढीला मिळावी या हेतूने ही चरित्रे मांडायचा प्रयत्न केलेला आहे.

महाराष्ट्र सरकारच्या सांस्कृतिक विभागाने नियुक्त केलेल्या सल्लागार समितीने अशा तऱ्हेची एक पुस्तक मालिका संगीत-प्रेमी बहुजन-

समाजाला अल्प किंमतीत उपलब्ध व्हावी अशी योजना मांडली आणि समाज कल्याण खात्याने ती मान्य केल्यानंतर हे कार्य मजकडे सोपवून त्यांनी माझा जो बहुमान केला याबद्दल शासनसंस्थेचा मी आभारी आहे. समाजकल्याण खात्याच्या मंत्री माननीय श्रीमती निर्मलाराजे भोंसले यांनी या पुस्तकाला पुरस्कार लिहून मला आशीर्वाद दिल्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

माझे गुरुतुल्य स्नेही चित्रकार दीनानाथ दलाल यांनी या पुस्तकाचे मुखपृष्ठ मोठ्या प्रेमाने तयार केले. मित्रवर्य व्ही. एन्. ओके यांनी अविलंबे रेखाचित्रे तयार करून देऊन या पुस्तकाची शोभा वाढविलेली आहे. संगीतातील जेष्ठ श्रेष्ठ असे प्रा. ग. ह. रानडे यांचे मार्गदर्शन अतिशय मोलाचे, अनेक समस्यांचा खल त्यांनी तासन तास केला. महाराष्ट्र सरकारच्या मुद्रणालयातील अधिकारी श्री. बापूराव नाईक आणि श्री. सप्रे यांनी या पुस्तकाच्या निर्मितीकडे वेळात वेळ काढून आपलेपणाने लक्ष पुरविले. मनोरंजन समितीचे चिटणीस श्री. राजाराम हुमणे व प्रसिद्धी संचालनालयाचे श्री. वसंत शिरवाडकर यांचे सहाय्य वेळोवेळी लाभलेले आहे. या सर्वांचे मी नम्रपणे आभार मानतो.

या मालेतील पुढील पुस्तकांत या सप्तर्षींच्या परंपरेची जोपासना करणाऱ्या महाराष्ट्रातील आणखी अनेक कलावंत स्त्री-पुरुषांची चरित्रे प्रसिद्ध होणार आहेत.

**गोपालकृष्ण भोबे**

१५९, गिरगांव रोड, मुंबई-४

# पु र स्का र

महाराष्ट्रात हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचा प्रचार आणि विकास करण्यासाठी ज्यांनी आपले जीवन वेचले अशा कलाकारांचा आणि विद्वानांचा सामान्य जनतेला परिचय करून देण्याच्या उद्देशाने अल्प किंमतीत त्यांची चरित्रे प्रसिद्ध करण्याची महाराष्ट्र सरकारच्या समाज कल्याण खात्याने एक योजना आखली असून या योजनेनुसार प्रसिद्ध होत असलेले 'सात स्वरश्री' हे पहिले पुस्तक होय. महाराष्ट्र राज्य संगीत-महोत्सव सल्लागार समितीच्या सूचनेप्रमाणे पंडित बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, पंडित विष्णु दिगंबर पलुस्कर, पंडित विष्णु नारायण भातखंडे, पंडित भास्करबुवा बखले, खाँसाहेब अब्दुल करीमखाँ, गायनाचार्य रामकृष्णबुवा वझे आणि खाँसाहेब अल्लादियाखाँ या सात श्रेष्ठ व्यक्तींचा या पुस्तकात समावेश करण्यात आला आहे. अशाच प्रकारची पुस्तके दरवर्षी प्रसिद्ध करून संगीत-क्षेत्रात ज्यांनी असामान्य कामगिरी केली त्या कलाकारांचा परिचय करून देण्याची सरकारची इच्छा आहे.

मराठी मुलखातून उत्तरेस जाऊन गायनविद्या संपादन करण्यासाठी विंध्य-सातपुडा पर्वतांच्या रांगा ओलांडीत तापी-नर्मदा पार करून शेकडो मैल पायी प्रवास करीत ग्वाल्हेरपर्यंत पोहोचलेल्या व्यक्तींमध्ये पंडित वासुदेवबुवा जोशी आणि पं. रामकृष्णबुवा देव ऊर्फ देवजीबुवा हे पहिले होत. तथापि उत्तरेत अपरंपार कष्ट करून हिंदुस्थानी संगीत महाराष्ट्रात प्रथम आणण्याचा मान बाळकृष्णबुवा इचलकरंजीकरांना असून त्यांचे नांव महाराष्ट्राच्या संगीताच्या इतिहासात अजरामर झाले आहे. बाळकृष्णबुवांनी हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत महाराष्ट्रात आणले इतकेच नव्हे तर सामान्य माणसाच्या मनात

गवय्यांविषयी असलेले किल्मिष दूर केले आणि शास्त्रीय संगीत लोकाभिमुख केले. एकोणविसाव्या शतकाच्या उत्तरार्धात गायन समाजाची स्थापना करणे, 'संगीत दर्पण' नांवाचे मासिक काढणे इत्यादी गोष्टीही त्यांनी केल्या.

बाळकृष्णबुवानंतर विष्णु दिगंबर पलुस्कर यांनी कलावंतांना सामाजिक प्रतिष्ठा व मान मिळवून देण्यासाठी सतत ३५ वर्षे प्रयत्न केला. त्यांनी मैफलीला व्याख्यानाची जोड दिली, जाहीर जलसे केले, संगीत परिषदा भरविल्या व गांधर्व महाविद्यालयाची स्थापना केली. संगीत परीक्षांची कल्पना त्यांनीच प्रत्यक्षात आणली आणि मुख्य म्हणजे हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचे स्वरलेखन करून शास्त्रशुद्ध अशी स्वरलिपी तयार केली. पलुस्करांची ही कामगिरी संगीताच्या अभिवृद्धीला निःसंशय पोषक ठरली.

पंडित विष्णु नारायण भातखंडे हे काही मूळचे गायक नव्हेत. परंतु संगीतात त्यांनी विशेष लक्ष घातले. संगीत शास्त्रातील जुन्या ग्रंथांचे अध्ययन केले, त्याच विषयावरील इतर भाषांतील ग्रंथांचा अभ्यास केला आणि हिंदुस्थानभर दौरे काढून अनेक दुर्मिळ चिजा, अस्ताई, अंतरे पैदा केले. या सर्व सामुग्रीच्या आणि संशोधनाच्या आधारे, भारतीय संगीत हे भारतीयच आहे हे सिद्ध करण्यासाठी त्यांनी संस्कृत, मराठी व इंग्रजीतून विपुल अशी ग्रंथरचना केली. त्यांनी लिहिलेली 'हिंदुस्थानी संगीत क्रमिक पुस्तकमालिके'तील सहा पुस्तके म्हणजे संगीतक्षेत्रातील लोकांना त्यांनी दिलेली मोलाची देणगी होय. शास्त्रीय आणि पायाशुद्ध संगीत शिक्षण देण्यासाठी त्या काळात ज्या शिक्षण संस्था स्थापन झाल्या त्यांच्यापैकी कित्येकांच्यामागे पंडित भातखंड्यांचा हात होता. १९२६ मध्ये लखनौ येथे 'मॉरीस कॉलेज ऑफ हिंदुस्थानी म्युझिक' स्थापन झाले तेही भातखंड्यांच्या मार्गदर्शनाखालीच.

विद्वान झाल्याशिवाय तोंड दाखवणार नाही, अशी प्रतिज्ञा करणाऱ्या बाळकृष्णबुवा इचलकरंजीकरांच्या प्रमाणे, 'भास्करबुवा झाल्याखेरीज किर्लोस्कर नाटक मंडळीत पाऊल टाकणार नाही' अशी प्रतिज्ञा करणारे

आणि अविश्रांत श्रम करून ती प्रतिज्ञा खरी करून दाखविणाऱ्या बखल्यांचीही कामगिरी अजोड अशी आहे. फैज महमदखाँ, नथ्थनखाँ आणि अल्लादियाखाँ या त्रिमूर्तींकडून वेगवेगळया प्रकारची गायकी घेऊन तिचे एक अपूर्व रसायन बनविण्याइतकी कुशाग्र बुद्धिमत्ता भास्करबुवांजवळ होती. त्यामुळेच भूगंधर्व रहिमतखाँ आणि फैयाजखाँ यांच्यासारख्या अव्वल दर्जाच्या उस्तादांनी त्यांच्या गाण्याची वाखाणणी केली. भास्करबुवा केवळ गायक नट म्हणून मिरवले नाहीत तर स्वयंवर, विद्याहरण, द्रौपदी इत्यादी नाटकांचे संगीतदिग्दर्शन करून त्यांनी मराठी नाट्यसंगीताचा दर्जा उंचावला. भारत गायन समाजाची स्थापना ही त्यांची आणखी एक उल्लेखनीय कामगिरी.

'किराणा' घराण्याची रंजक, हृदयस्पर्शी आणि भावपूर्ण गायकी महाराष्ट्रात आणून महाराष्ट्राला त्या गायकीचे वेड लावण्याचे महत्त्वाचे काम पै. अब्दुल करीमखाँनी केले. त्यांनी गायनकला मुक्त कंठाने गायिली आणि मुक्त हस्ताने इतरांना दिली. म्हणूनच अजूनही महाराष्ट्रात त्यांची मोठी शिष्यपरंपरा दिसून येते. खाँसाहेब अब्दुल करीमखाँनीही आर्यसंगीत विद्यालय आणि सरस्वती संगीत विद्यालय या संस्थांची स्थापना केली. इतर श्रेष्ठ गवय्यांप्रमाणे खाँसाहेबांनी हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचा सखोल अभ्यास केला होता. त्या अभ्यासामुळे आणि संशोधनामुळेच श्रुतींविषयी ते अधिकारवाणीने बोलू शकत. महाराष्ट्रात शास्त्रीय संगीत लोकप्रिय करण्यात खाँसाहेबांचा फार मोठा वाटा आहे. दक्षिण हिंदुस्थानात जाऊन कर्नाटकी संगीताचा त्यांनी अभ्यास केला. आणि काही दाक्षिणात्य राग हिंदुस्थानी संगीतात मिसळवून दिले.

माधुकरी मागून मधुकर वृत्तीने संगीत आत्मसात करण्यासाठी सारा हिंदुस्थान पालथा घालणारे आणि त्यासाठी अव्याहत कष्ट करणारे म्हणून पंडित रामकृष्णबुवा वझे यांचा परिचय आजच्या पिढीतील गायकांना करून देणे अवश्य आहे. संगीत ही केवढी महान कला आहे आणि तिच्या प्राप्तीसाठी पूर्वसूरींनी केवढी घोर तपश्चर्या केली, केवढी मानहानी सहन केली, किती परिश्रम केले याची पुरेशी कल्पना जरी नव्या पिढीला आली

तरी 'झटपट रंगारी पद्धती' ने गायक होऊ पाहणाऱ्या आजच्या गायकांना मार्गदर्शन होईल असा विश्वास वाटतो. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, भास्करबुवा बखले आणि रामकृष्णबुवा वझे यांची चरित्रे म्हणूनच आज आदर्श मानायची.

'संगीत सूर्य' म्हणून ज्यांचे वर्णन केले जाते अशा दैदीप्यमान गायकीचे गवई म्हणून पै. अल्लादियाखाँ यांचा लौकिक होता. खाँसाहेब तब्बल ५० वर्षे महाराष्ट्रात राहिले. महाराष्ट्राशी ते इतके एकरूप झाले की त्यांनी नुसती मराठी भाषाच आत्मसात केली असे नाही तर मराठी संत वाङ्मयाचा अभ्यास करण्यापर्यंत त्यांनी मजल गाठली. जयपूर घराण्याची गायकी महाराष्ट्राशी त्यांनी इतकी एकजीव केली की आता 'जयपूरवाले' म्हणविणाऱ्या गायकाजवळ सुद्धा ती सांपडणे मुश्किल झाले आहे. जयपूरची गायकी महाराष्ट्राची झाली आणि महाराष्ट्राबाहेर इतकेच नव्हे तर खुद्द जयपुरातही दुर्मिळ झाली याचे मुख्य कारण म्हणजे खाँसाहेबांना महाराष्ट्राविषयी वाटणारे प्रेम.

खाँसाहेबांनी महाराष्ट्रावर इतके प्रेम करण्याचे कारण त्यांच्याच शब्दात सांगावयाचे म्हणजे 'महाराष्ट्रासारखे रसिक इतरत्र आढळायचे नाहीत' असे ते नेहमी म्हणत. या रसिकतेमुळेच महाराष्ट्रावर अनेक संगीतकारांनी अपार प्रेम केले आणि महाराष्ट्रानेही त्यांचे अलोट कौतुक केले. या संगीत-प्रेमामुळे अनेक संगीतकार महाराष्ट्राकडे आकर्षिले गेले. ते महाराष्ट्रात स्थायिक झाले आणि महाराष्ट्रातच त्यांनी देह ठेवले. यांत ग्वाल्हेर घराण्याचे भूगंधर्व रहिमतखाँ, किराणा घराण्याचे बंदेअलीखाँ आणि अब्दुल करीमखाँ, जयपूर घराण्याचे अल्लादियाखाँ अशा जुन्या महान कलाकारांचा उल्लेख करता येईल. आजही बडे गुलामअलीखाँ, अमीरखाँ, पंडित रविशंकर, डागर बंधू यांसारखे श्रेष्ठ कलाकार महाराष्ट्राकडे आकर्षिले जातात ते याच कारणामुळे.

महाराष्ट्रातील संगीताचा इतिहास घडविणाऱ्या या सप्त कलाकारांची लालित्यपूर्ण चरित्रे महाराष्ट्रातील एक नाणावलेले संगीत-समीक्षक

श्री. गोपालकृष्ण भोबे यांनी महाराष्ट्र शासनासाठी खास लिहून दिली याबद्दल मी त्यांचे आभार मानते. प्रसन्न, वेधक शैलीत लिहिलेले 'सात स्वरश्री' हे पुस्तक लोकप्रिय होईल असा मला विश्वास वाटतो.

या सात कलाकारांच्या जीवन-चरित्राचा पट पाहता श्रीमंत पूज्य सयाजीराव महाराजांच्या सान्निध्यात बडोदे येथे गेलेल्या माझ्या बालपणीच्या अनेक आठवणी साहजिकच मनात उभ्या राहतात. बडोदे संस्थान आणि विशेषत: श्रीमंत पूज्य सयाजीराव महाराज यांच्याशी या सात कलाकारांपैकी बहुतेक सर्वांचा या ना त्या प्रकारे संबंध आला होता. पं. विष्णु दिगंबर पलुस्कर जेव्हा बडोद्यामध्ये प्रथम गेले तेव्हा श्रीमंत पूज्य जमनाबाई महाराणीसाहेबांनी त्यांची कीर्ती ऐकून त्यांचे खास गाणे केले होते आणि बडोद्यात दोन महिने राहण्याविषयी आग्रह केला होता. खुद्द सयाजीराव महाराजांनी त्यांची खास बैठक करवून त्यांना मोठी बिदागी दिली होती आणि दरबारात राहण्याविषयी सूचना केली होती. संगीतक्षेत्रातील कलाकार एकत्र आणण्यासाठी पंडित भातखंड्यांनी जी 'अखिल भारतीय संगीत परिषद' भरविली होती ती सयाजीराव महाराजांच्या अध्यक्षतेखालीच. याच परिषदेत पद्धतशीर गायन-शिक्षण पद्धतीचा पुरस्कार करण्यात आला होता आणि त्या पद्धतीनुसार चालणारी गायन-शिक्षण संस्थाही बडोद्यात स्थापन झाली होती. सयाजीराव महाराजांचा भातखंड्यांवर फार लोभ होता. भास्करबुवांचा तर जन्म बडोदे संस्थान येथील कठोर या गांवचा. बडोद्यातच श्री. भाटवडेकर व बाळशास्त्री तेलंग या दरबारी सेवकांच्या मदतीने आणि मध्यस्थीने त्यांचे फैज महमदखाँ यांच्याकडे शिक्षण झाले. किर्लोस्कर नाटक मंडळीचे श्रेष्ट नट व गायक भाऊराव कोल्हटकर यांना भास्करबुवांच्या दिव्य गायकीचा साक्षात्कार झाला तोही बडोद्यातच. पै. अब्दुल करीमखाँ बडोद्याहूनच महाराष्ट्रात आले. पै. अल्लादियाखाँही बडोद्यात अनेक वेळा गायले होते आणि तेथे त्यांचा लौकिकही झाला होता.

'सात स्वरश्री' हे पुस्तक महाराष्ट्रातील रसिक जनतेपुढे ठेवताना यांतील चरित्र नायकांच्या कर्तृत्वाचा सामान्यजनांना परिचय होईल आणि नव्या पिढीतील गायकांना त्यापासून बहुमोल असे मार्गदर्शन होईल असा विश्वास मी पुन्हा व्यक्त करते.

सचिवालय, मुंबई-३२ **निर्मलाराजे भोंसले**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | | पृष्ठ |
| आद्य गायनाचार्य पंडित बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर | ... | १ |
| संगीत प्रसारक पंडित विष्णु दिगंबर पलुस्कर | ... | २० |
| संगीत संशोधक चतुर पंडित विष्णु नारायण भातखंडे | ... | ३३ |
| पंडित भास्करबुवा बखले ... | ... | ४७ |
| स्वर-साधक खाँसाहेब अब्दुल करीमखाँ ... | ... | ६३ |
| संगीतातील कृतिपुरुष गायनाचार्य रामकृष्णबुवा वझे | ... | ७६ |
| संगीतसम्राट अल्लादिया खाँसाहेब ... | ... | ८८ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५२०१

# आद्य गायनाचार्य पंडित बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर

**हिंदुस्थानी** संगीतासंबंधी विचार करताना तीन कालखंड आपल्या नजरेसमोरून सरकतात. हे तीन कालखंड म्हणजे हिंदू काल, मुसलमान काल आणि आंग्ल काल होत. हिंदू काल म्हणजे वैदिककाल. या कालात 'आसेतु हिमाचल' पर्यंत भारतीय संगीत वैभवाच्या शिखरावर होते. शास्त्रकार, वाग्गेयकार, गायक, नर्तक आणि वादक यांनी सारा हिंदुस्थान गजबजलेला होता. संगीत क्षेत्रातील असा एकही विभाग नव्हता, की जो पूर्णत्वाला पोहोचलेला नव्हता. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंतच्या अनेक प्रांतांत अनेक शास्त्रकार जन्माला आले. शिव, ब्रह्मा या स्वयंभू देवता आणि नारद, तुंबरू या देवर्षींपासून भरत, कश्यप या महामुनींपर्यंत आणि मतंग, कोहल, दंतिल, वेण या महर्षींपासून नान्यभूपाल, भोज, सोमेश, अभिनवगुप्त, लोल्लट, उद्भट तो शार्ङ्गदेवांपर्यंत अनेक महान महान

बुद्धिमंतांनी अनेक प्रकारची भर घालून भारतीय संगीतकला समृद्ध केली; पूर्णावस्थेला नेली. सामवेदांतर्गत या शाखेला देवस्वरूप मानून तिला अतिशय शुचिर्भूत स्वरूप दिले गेले. पूज्य मानण्यात येऊ लागले.

इ.स.च्या दहाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत—म्हणजे जोपर्यंत वैदिक कालाचे अधिष्ठान राहिले तोपर्यंत—संगीत हे केवळ भक्तीमार्गीच होते; परंतु अकराव्या शतकात हिंदुस्थानावर मुसलमानी अंमल चालू झाला आणि शतकअखेरपर्यंत त्याने आपले हातपाय बरेच पसरले. हा काळ देशात बराच अंधाधुंदीचा गेला आणि अशा परिस्थितीत हिंदुस्थानी साहित्यसंस्कृती व कला सैरावैरा झाल्या. त्यांचा त्राता कुणी राहिला नाही. आणि त्या कालचक्राच्या फेऱ्यात हिंदुस्थानी संगीतकलेला यावनी सरंजामशाहीचे दास्यत्व पत्करून जगण्याखेरीज गत्यंतर उरले नाही.

देवर्षी, महर्षी आणि इतर महान बुद्धिमंतांनी जी ग्रंथरचना करून ठेवलेली होती ती या संक्रमणकालात बऱ्याच अंशी नाश पावली. उरलेल्या शास्त्रकारांना कसाबसा जीव जगविणे एवढेच बाकी राहिले. मात्र या जीव धरून राहिलेल्या शास्त्रकारांची आणि गायक-वादकांची काही रसिक अशा यवन सत्ताधीशांनी तसेच शेष राहिलेल्या हिंदू राजांनी फार मोठी कदर केली. भारतीय संगीतातील साक्षात्कारी प्रभाव सिद्ध झाल्यानंतर तर संगीतकारांना मानमान्यताही मिळाली. अकबराच्या कारकीर्दीत संगीतकाराला राजाइतकाच मान मिळू लागला; पण ही परिस्थिती फारच थोडा काल टिकली. इंग्रजांनी कुटील नीतीने हिंदुस्थान बळकावले आणि भारतावर ह्या तिसऱ्याच शक्तीचा अंमल सुरू झाल्यानंतर राजांचे राजेपण संपुष्टात आले. काही राजे मांडलीक झाले; बरीचशी संस्थाने इंग्रजांशी मुकाबला करताना नामशेष झाली. संगीतकारांना त्या संघर्षात फार वाईट दिवस पाहावे लागले.

दीर्घ काल चाललेला हा संघर्ष संपला तेव्हा राजे नांवाचे लोक केवळ नांवाचे राजे राहिले होते. त्या आमुलाग्र बदललेल्या राजवटीतील शासकांना विलासपर्यंकावर लोळता लोळता मनोरंजनार्थ पुन्हा संगीत हवेसे वाटू लागले. यावनी सत्तेचा स्वभाव जात्याच रंगेल आणि अतिविलासी. केवळ देवाच्या सख्यत्वासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या भारतीय शुचिर्भुत संगीताला अंतर्गृहात ओढले गेले आणि त्यावर अनंत प्रकारांनी रंगेल संस्कार झाले. संगीताची स्वरूपे बदलली खरी, पण या ना त्या प्रकारे संगीतकला जिवंत राहिली. साम्राज्यशाही उत्तरेकडेच स्थित असल्याने संगीतकलेचे जोपासकही तिथेच आश्रयाला राहिले.


जेवढा गुण मोठा तेवढे बादशहाने फेकलेले पारितोषिकाचे आमिषही मोठे असल्याने आपली विद्या दुसऱ्याला दिल्याने आपले महत्त्व कमी होईल ही भीती प्रत्येक कलावंताच्या मनात व्यापून राहिली. कलावंताची स्वार्थपरायण वृत्ती वाढली. जो तो आपली विद्या चोरून ठेवू लागला. हात राखून तिचा वापर करू लागला त्यातही काही पिढिजात उदारधी होते. ते कमी अधिक प्रमाणात परंपरेप्रमाणे विद्यादान करीत होते. आपल्यामागे आपली विद्या आणि आपले नांव शिल्लक राहावे अशी त्यांची भावना होती. अशा प्रकारचे काही सढळ मनाचे कलावंत शिष्य तयार करीत असत आणि दिग्विजयार्थ बाहेर पाठवीत असत. या शिष्यांची वर्णी ल्हान ल्हान स्वतंत्र राज्यांत किंवा मांडलिकांतही लागे; पण हे सर्व उत्तरेकडेच घडत होते.

मराठी राज्यात तत्कालात अभिजात संगीतकलेला फारसे महत्त्वाचे स्थान मिळाले नाही; पण संगीताचे आगर समजले जाणारे ग्वाल्हेर संस्थान हे जेव्हा एक मराठी राजाचे राज्य होते तेव्हा तिथे उमटलेला सुरांचा आणि नुपुरांचा झंकार अजाणताच महाराष्ट्रीय कलासक्त लोकांच्या कानी पडू लागला; परंतु नट, भाट, नर्तक आणि इतर तत्सम कलावंतांना—तो ब्राह्मण कुलात जन्मलेला असला तरी त्याला—

यज्ञकर्मात स्थान देऊ नये, असा दंडक मनूनेच घातल्यामुळे कर्मठ मध्यमवर्ग संगीत, नृत्यादी कलांपासून दूर राहू लागला. शिवाय कलावंत हा बराचसा नशेत राहणारा आणि संसारी माणसाहून भिन्न असल्याने अशा अवलियांच्या दुनियेचा आपल्या संततीला संपर्क लागू नये ही भावना सर्व समाजाची होती ; पण अशा स्थितीतही काही बंडखोर निघालेच. त्यांनी ही अभेद्य तटबंदी ओलांडून संगीतकला संपादण्याच्या उद्देशाने उत्तरेची वाट धरली. हालअपेष्टा सहन करून त्यांनी संगीत विद्या मिळविली आणि त्यातील काही महाभागांनी महाराष्ट्रात परत येऊन आपल्या विद्येचा प्रचार केला.

मराठी मुलुखातून उत्तरेस जाऊन प्रदीर्घ तपःश्चर्या करून गवयी-पदाला पोहोचलेल्या आद्य गायनाचार्यांपैकी पंडित वासुदेवबुवा जोशी हे एक होत. त्या आधी पुण्याचे पं. रामकृष्णबुवा देव उर्फ देवजीबुवा यांनी ग्वाल्हेरला जाऊन हस्सूखाँ यांच्याकडे टप्पा गायकी आत्मसात केली होती. देवजीबुवांनी जवळ जवळ तीन तपे गायनाचा अभ्यास केलेला होता व ग्वाल्हेरचे महाराजा जनकोजीराजे शिंदे यांच्या कालात ते दरबार गायक म्हणूनही होते. जनकोजीराजांच्या मृत्यूनंतर ग्वाल्हेर दरबार सोडून ते धार संस्थानात येऊन महाराज यशवंतराव पवार यांच्या आश्रयाला राहिले होते व अखेरपर्यंत तिथेच होते.

पं. वासुदेवबुवा जोशी हे ठाणे जिल्ह्यातील नागाव गावचे. या संगीत-साधकांस कुणा एका कीर्तनकाराकडून 'गायन विद्या ग्वाल्हेरीस मिळते' असे कळले आणि वयाच्या पंधराव्या वर्षी ते ग्वाल्हेर येथे जायला निघाले. त्या काळात वाहने नव्हती ; पण बुवांनी पायी प्रवास करून विंध्य, सातपुडा अशा पर्वतांच्या माला ओलांडून, तापी, नर्मदा अशा वेगवाहिनींना पार करून ग्वाल्हेर गाठले आणि कठीण प्रयत्नांनी उस्ताद हस्सूखाँची सेवा करून कृपा संपादन केली



आद्य गायनाचार्य पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर

व गानविद्या मिळविली. हस्सूखाँ यांच्या मृत्यूनंतर त्यांचे बंधू उस्ताद हद्दूखाँ यांचे शिष्यत्व त्यांनी पत्करले.

वासुदेवबुवा प्रपंची असूनही साधूवृत्तीने राहाणारे होते. ग्वाल्हेर-पासून नेपाळपर्यंत एक उत्कृष्ट गायक म्हणून त्यांची ख्याती झालेली होती. ग्वाल्हेरच्या कित्येक मंदिरांतून तत्कालिन रीतीप्रमाणे देवासमोर गाण्याचे काम त्यांना मिळाले होते. राजदरबारीदेखील त्यांची वर्णी थोरांच्या मालिकेत लागलेली होती; परंतु अशी परिस्थिती असतानाही त्यांनी आपले गुरू हद्दूखाँसाहेब यांच्या सेवेत यत्किंचितही अंतर पडू दिले नाही. हद्दूखाँसाहेबांना आयुष्याचे अखेरचे दिवस शारीरिक व्याधीमुळे विकलांग अवस्थेत कंठावे लागत होते. ग्वाल्हेर सरकारने त्यांची बडदास्त खूप ठेवली होती; पण त्यांच्या दैनंदिन कार्यक्रमातील अडीअडचणी वासुदेवबुवांना अधिक माहित असल्याकारणाने त्यांची सर्व सेवा बुवानांच करावी लागे. त्या विकलांग अवस्थेतही जीवनाच्या अंतापर्यंत नित्याचा सहा तासांचा रियाज हद्दूखाँसाहेबांनी सोडलेला नव्हता ही लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे. वासुदेवबुवांनीदेखील या रियाजाला अखेरपर्यंत साथ दिली.

वासुदेवबुवांनी कष्टसाध्य अशी संगीत विद्या मिळविली; पण महाराष्ट्रात परत येऊन स्थायिक न होता ते उत्तरेसच राहिले. त्रयस्थ झाले. देवजीबुवांचीही तीच गत. त्यामुळे हिंदुस्थानी संगीत महाराष्ट्रात आणून सामान्यापर्यंत पोहोचविणारा तोपर्यंत तरी कुणी झाला नव्हता. महाराष्ट्रात तत्कालात शास्त्रीय संगीताची जाण काही ठराविकांनाच मर्यादितपणे होती; पण एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस या गोष्टीचा भक्कम पाया ज्या महाभागाने घातला आणि मुमुक्षु मराठी माणसाच्या मनातील किल्मिषे काढून टाकून शास्त्रीय संगीताची दारे त्याला खुली केली त्यांचे नांव गायनाचार्य बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर.

पुराणपुरुषांचा आदर्श दृष्टीसमोर ठेवून अखंडितपणे ऋषितुल्य जीवन जगलेले जे काही कृतिपुरुष आपल्या या महाराष्ट्रात होऊन गेले त्या मालिकेतील गायनाचार्य बाळकृष्णबुवा हे एक होत. अखिल भारतीय संगीतकला कोविदांत त्यांचे स्थान प्रथम श्रेणीतच राहील. पं. वासुदेवबुवा जोशी यांच्याकडून सेवाभावाने मिळविलेल्या ग्वाल्हेर घराण्याच्या गायकीचा प्रचार महाराष्ट्रात प्रथम त्यांनी केला. सायासाने संपादन केलेली गायन विद्या आपल्यापुरती राखून न ठेवता शिष्यांद्वारे तिचा प्रसार करून एक थोर संप्रदाय त्यांनी निर्माण केला व गायन-कलेस प्रतिष्ठितांच्या घराघरात मानाचे स्थान मिळवून दिले.

संगीत विद्या मिळविण्यासाठी ज्या तऱ्हेचे कष्टमय जीवन बाळकृष्णबुवा जगले आणि ज्या तऱ्हेच्या यातना त्यांनी भोगल्या तो इतिहास आजच्या पिढीच्या अंगावर रोमांच उभा करणारा आहे. या लोकोत्तर पुरुषाचा जन्म भाद्रपद वद्य पंचमी शके १७७१ रोजी (इ. स. १८४९) इचलकरंजीपासून सुमारे बावीस मैलांवर असलेल्या 'बेडग' या लहानशा खेड्यात त्यांच्या आजोळी झाला.

बुवांचे वाडवडिलांचे घराणे कोल्हापूरजवळ चंदूर गावचे. घरात वंशपरंपरेने जोशीपण चालायचे; परंतु बुवांचे वडील रामचंद्र भट यांनी थोडीशी गायनकला संपादून जोशीपणा सोडून गवयाचा पेशा पत्करला व ते रामचंद्रबुवा या नांवाने प्रसिद्ध झाले. या पेशामुळे त्यांना वरचेवर गावोगावी फिरावे लागल्याने छोट्या बाळकृष्णास पित्याच्या सहवासाचे सुख फारसे लाभलेच नाही. आपल्या चिरंजीवाचा गळा जात्याच संस्कारक्षम आहे हे पाहून रामचंद्रबुवांना आनंद होई. त्यांनी काही ध्रुपदे व प्रबंध आपल्या लाडक्या मुलास शिकविलेली होती. गायनशास्त्रात आपण पारंगत होऊ शकलो नाही, तरी आपल्या मुलाने या कलेत निपूण व्हावे, भिक्षुकीसारख्या मानहानीच्या

व्यवसायात पडू नये अशी त्यांची सुप्त इच्छा होती. त्याप्रमाणे ते योजनाही आखीत होते ; पण बाळकृष्णाला नववे वर्ष लागले आणि थोड्याशा आजाराचे निमित्त होऊन त्याची आई एकाएकी वारली. यानंतर आधाराकरिता म्हणून बाळकृष्णास त्याचे चुलते विष्णुभटजी यांच्या ओटीत घालून रामचंद्रबुवा जत संस्थानाकडून बोलावणे आले म्हणून तेथे निघून गेले.

बाळकृष्णाचे हे चुलते म्हणजे व्यवसायाने भिक्षुक असल्याने मंगल-अमंगलादी सर्व कार्यांस त्यांना जावे लागे. त्यातून वृत्ती बरीचशी लाचारीची. तशीच हावरीही. थोरामोठ्यांच्या घरी या मुलाला बरोबर घेऊन गेले म्हणजे दक्षिणेत तेवढीच भर पडे. त्यामुळे मुलाच्या शिक्षणाच्या बाबतीत संपूर्णपणे दुर्लक्ष होऊन अगदी चालचलाऊ भिक्षुकीच्या अभ्यासाव्यतिरिक्त वयाच्या दहाव्या-अकराव्या वर्षापर्यंत त्याच्या हातून काहीही होऊ शकले नाही. बाळकृष्णाची बुद्धी जात्याच तल्लख आणि ग्रहणशक्ती तर पराकोटीची. त्यामुळे वडीलधाऱ्या माणसांस जिज्ञासेने काही विचारले, काही महत्त्वाकांक्षा बोलून दाखविल्या तर हेटाळणीच्या स्वरात संभावना होई. "मूर्ख आहेस !", "दगड आहेस !", "मुकाट्याने आपला भिक्षुकीचा धंदा करावा !" अशी वाक्ये सतत ऐकायला मिळायची.

एरवी बाळकृष्णाची बुद्धी कुशाग्र असली तरी भिक्षुकीच्या अभ्यासात त्याचे मन लागेना. एखादा मंत्रही—आठ आठ दिवस घोकंपट्टी करून त्यांच्या ओठावर खेळेना. आपण काही तरी वेगळे करायला जन्माला आलेले आहो असे त्यांना सतत वाटायचे. स्वभाव अत्यंत मानी आणि तेजस्वी असल्याने थोडासादेखील अपमान सहन होत नसे. त्या काळच्या दोन दिडक्यांच्या दक्षिणेसाठी लाचारीने हात पसरणे त्यांना मुळीच आवडत नसे. त्यामुळे वारंवार काकांकडून व—जिच्या मुठीत काका होते त्या—काकीकडून पदोपदी पाणउतारा

करून घेत आणि अश्रु गाळीत बाळकृष्ण जीवन कंठू लागला.

असाच एके दिवशी स्फोट झाला. दक्षिणेस जाण्यासंबंधी काकांनी आग्रह धरला आणि बाळकृष्ण ताडकन उत्तरला—

" दोन दिडक्यांची भिक्षा मागण्यासाठी मी जन्माला आलो नाही." पुतण्याने दिलेल्या उत्तराने काकांतला जमदग्नि जागा झाला. त्यांनी बाळकृष्णास काठीने फोडून काढले आणि ते म्हणाले—" कारट्या, दगडांतला दगड तू, तुला कशाला हवी एवढी आढ्यता ? आँ ? अरे, तुझ्यासारख्या शुंभाला एवढा मान कशाला रे ? असा ताठा विद्वानालाच शोभतो ! "

काकांच्या या वाक्प्रहाराने बाळकृष्णाचा स्वाभिमान डिवचला गेला. ' विद्वानालाच ताठा शोभतो ', हे शब्द त्याच्या कानात सारखे घुमू लागले ; विद्या शिकून विद्वान होण्याचा निश्चय त्याचे मन करू लागले. तो निदिध्यासच त्याला लागला आणि एक दिवस संधी साधून बाळकृष्णाने काकांचे घर सोडले.

घर सोडले खरे पण पुढे काय करायचे ? त्या काळात अशा थोड्याशा गाणाऱ्या मुलांचा आधार म्हणजे हरिदास असत. बाळकृष्णबुवा माघारी फिरले नाहीत. ते थेट म्हैसाळला गेले. म्हैसाळचे जोगळेकर हरीदास आणि बुवांचे वडील रामचंद्रबुवा यांचा चांगलाच स्नेह होता. त्यांनी मुलाला आपल्याकडे ठेवून घेतला. दोन वर्षेपर्यंत त्यास थोडे थोडे विविध विषयांचे शिक्षणही दिले ; पण अशा हुशार मुलाने केवळ आपल्या मागे झांज वाजवून आयुष्य काढण्यापेक्षा त्याला चांगले गाणे शिकविले तर काही नांव काढील, म्हणून फिरतीवर गेले असताना जतपर्यंत जाऊन मुलाला रामचंद्रबुवांच्या हवाली करून ' काहीही करून याला चांगलं गाणं शिकवा, मुलगा घराण्याचे नांव काढील ', असे सांगितले.

बऱ्याच वर्षांनी वडील भेटले. जत संस्थानाधिपतींचीही मर्जी

झाली. संस्थानात अलिदातखाँ नांवाचे गवयी होते. त्यांना श्रीमंतांनी शिकवायची आज्ञा केली. शिवाय वडीलही तालीम देतच होते. काही दिवस असे आनंदाचे गेले; पण दैवच असे विचित्र की रामचंद्रबुवांनी एकाएकी इहलोक सोडला. पंधरा वर्षांच्या बाळकृष्णावर आकाशीची कुऱ्हाड कोसळली. श्रीमंतांची मेहेरनजर होती, पण अलिदातखाँनी त्यानंतर काहीही शिकविले नाही. वैतागून आणि वडिलांचे वर्षश्राद्ध घालावे म्हणून बाळकृष्णबुवा इचलकरंजीस चुलत्याकडे परत आले. या वेळी त्यांच्या चुलत्यांनी हा नाद सोडून आपल्या पिढिजात भिक्षुकीच्या व्यवसायात पडण्याचा त्यांना उपदेश केला; पण 'विद्वत्ता मिळविल्याशिवाय आता घरी परतणार नाही', असे बाळकृष्णबुवांनी सडेतोड उत्तर दिले.

कोल्हापुरास गेल्याने तिथे गाणे शिकण्याची काही तरी सोय होईल म्हणून वशिल्याने तिथले प्रख्यात गवयी भाऊबुवा कागवाडकर यांच्याकडे ते शिकायला राहिले. आता तरी काही विद्यावंत होऊ आणि सन्मानाने घरी परतू असे बुवांना वाटले; पण बुवांच्या दैवाने अजून हवा तसा फासा न टाकल्याने गानविद्येच्या प्राप्तीऐवजी गुरूसेवेत अजाणतेपणे घडलेल्या ल्हानशा चुकीमुळे त्यांना गुरूमुखातून शापप्राप्ती मात्र झाली. "तुला गानविद्या कधीही येणार नाही, आणि मी तुला ती शिकविणार नाही!" असा शाप भाऊबुवा कागवाडकरांनी उच्चारला; पण 'मला गाणं येईल त्या दिवशीच तुम्हाला तोंड दाखवीन', असे तेजस्वी उत्तर देऊन ते तिथून निघाले.

आता काय करावे? कुठे जावे? अशा बावचळल्या मन:स्थितीत भटकत भटकत फिरून इचलकरंजीस काकांच्याच आश्रयाला येणे प्राप्त झाले. विद्वान होऊन परत येईन अशी प्रतिज्ञा करून घर सोडले; पण दैवाने खैर केली नाही. ही पिछेहाट लाजिरवाणे जिणे जगायला लावणारी होती. 'या विद्वान!', असे बरोबरीच्यांनी

चिडवावे, तर "आले दिग्विजयी वीर !", असे घरच्यांनी म्हणावे. इकडून टोमणे, तिकडून मानहानी यामुळे बुवांना जीवन असह्य वाटू लागले! यावर उपाय फक्त एकच होता. धीर खचू न देता 'विद्वान' झाले पाहिजे होते. टोमणे मारणाऱ्यांच्या नाकावर टिच्चून, आप्तांच्या निंदेला न भिता असल्या दिवाभितांना ठेचून विद्वान झाले पाहिजे होते. . . . विद्वान झाले पाहिजे . . विद्वान झाले पाहिजे . . विद्वान. . बुवांच्या मनाला रात्रंदिवस तळमळ लागली. तो एकच विषय त्यांना सतावू लागला. त्या विचाराने त्यांचा जीव वेडापिसा झाला.

बुवा सांगलीस येऊन सहज भटकत होते. तिथे त्यांना साधूपुरुष अण्णाबुवांचे दर्शन घडले. ते देहातीत असल्याने त्यांच्याभोवती मुलांचा घोळका जमत असे. अण्णाबुवा कधीही बोलत नसत; पण बाळकृष्णाच्या अंगावर खेकसून ते म्हणाले—"काय सारंगी वाजली? इथं रडत का राहिला आहेस? लष्करात जा! उत्तर दिशेकडे!" महाराजांचा यापूर्वी अनेकांना पडताळा आला होता. बुवानांही त्यांच्या शब्दांचा अर्थ समजला. गाणे शिकण्यासाठी आपण ग्वाल्हेरीस लष्करात गेले पाहिजे असेच महाराजांनी सांगितले असे मानून वेळ न दवडता त्यांनी ग्वाल्हेरची वाट धरली. ते पंढरपूर, सोलापूर, अक्कलकोट, तुळजापूर अशी मजल-दरमजल करीत पुण्यास आले. आणि पुण्यास उत्तरेकडे फिरतीवर जाणाऱ्या एका नाटक कंपनीत शिरले; पण वामनबुवा कवठेकर या नांवाच्या त्यांच्या वडिलांच्या स्नेह्याने त्यांना या गोष्टीपासून परावृत्त करून आपल्याबरोबर धार संस्थानात नेऊन धारचे दरबार गवयी देवजीबुवा परांजपे यांचेकडे गाणे शिकण्याची व्यवस्था केली.

देवजीबुवा अतिशय विद्वान कलावंत. चौमुखी गवय्या. अनेक गवय्यांकडे छत्तीस वर्षे अध्ययन केलेले; परंतु बुवांना दुर्दैवाने अतिशय कजाग आणि विचित्र वागणारी वामांगी मिळाली. ही

त्यांची पत्नी उद्दालक ऋषीच्या पत्नीसारखी वागायची. नको म्हटले, की तेच करायची आणि कर म्हटले, की काही करायची नाही. गुरूने शिष्यास म्हणावे 'आज मला तू जेवण करून वाढ', तर त्याला घराबाहेर काढून ती पक्वान्नाचे जेवण करी आणि बुवांनी काही इच्छा प्रदर्शित केली की त्यांना उपाशी ठेवीत असे. या बयेने बाळकृष्णबुवांना अक्षरशः विटविले. त्याला कधीही तालीम घेऊ दिली नाही. तो तालमीला बसला, की नसती कामे उरकून काढून त्याला बाहेर पाठवावा आणि काम नसल्यास देवजीबुवांस त्रास द्यावा असे तिचे सारखे चाललेले असे; पण देवजीबुवांनी बाळकृष्णास अन्य ठिकाणी नेऊन तालीम दिली. अशी चार वर्षे गेली आणि एके दिवशी अति जाच झाल्याने नाइलाज होऊन बाळकृष्णबुवांनी देवजीबुवांचे घर सोडले.

दुर्लभ अशी गुरूमाउली सापडली; पण ईश्वराच्या मनात आपल्याला संगीतविद्या मिळूच नये अशी इच्छा असेल तर ती साध्य तरी कशी होणार? असे विचार बुवांच्या मनात आले आणि आता हा नाद सोडून देऊन उरलेले आयुष्य तीर्थयात्रेत घालवावे असे त्यांनी ठरविले. कुणा साधूच्या संगतीने ते काशीस गेले आणि त्या साधूने त्यांना तिथून ग्वाल्हेरास आणून सोडले. आता ग्वाल्हेरास आलोच आहोत तर गायनाचार्य वासुदेवबुवा जोशी यांच्यापाशी जाऊन गाणे शिकविण्याबद्दल त्यांना विनंती तरी करून पहावी म्हणून बाळकृष्णबुवा जोशीबुवांकडे गेले. त्यांनी अति नम्रपणे त्यांना विनंती केली; पण वासुदेवबुवांचे आणि देवजीबुवांचे काय वैर होते कोण जाणे. "तू देवजीबुवांकडून आला असल्यास आणि त्यांचा शिष्य असल्यास तुला मी मुळीच शिकवणार नाही. इतकेच नव्हे तर तू इथं येऊ नकोस आणि या परिसरातदेखील फिरकू नकोस!", अशी त्यांना वासुदेवबुवांनी सक्त ताकीद दिली; पण 'मी तुमच्याजवळूनच

विद्या मिळवीन ' अशी प्रतिज्ञा करून बाळकृष्णबुवा तिथून बाहेर पडले. ते पुन्हा काशी क्षेत्री गेले आणि काशीस असताना एके दिवशी विजयनगरच्या महाराजांना त्यांचे गाणे ऐकण्याचा योग आला.

महाराज खूष झाले आणि त्यांनी बुवांना आपल्या पदरी ठेवले. यात्रा आटोपून परत जाताना महाराजांनी त्यांना आपल्या रियासतीत चलण्याविषयी पुष्कळ आग्रह केला. दुसऱ्या कुणी स्वतःचे कल्याण करून घेतले असते ; पण बाळकृष्णबुवांनी महाराजांना स्वच्छ सांगितले---

---" मला अजून गाणं शिकायचं आहे. ज्याच्याकरिता एवढी मजल मारली त्याची पूर्ती करायची आहे ! "

विद्वान झाल्याखेरीज घरी परतावयाचे नाही अशी बाळकृष्णबुवांनी प्रतिज्ञा केली होती. विद्या मिळावी म्हणून ज्या सिद्ध पुरुषाच्या आशीर्वादावर विश्वास ठेवून ते इतक्या दूर आले होते तो आशीर्वाद अजून फलत नव्हता. त्याने त्यांना निरुत्साही केले होते ; परंतु आता ' शेंडी तुटो पारंबी तुटो ' परत म्हणून जायचे नाही. हे क्षेत्र अतिपवित्र आहे असे संत महंत सांगत आले. आता इथे तपःश्चर्या आरंभायची आणि इच्छिलेले मिळाले नाही तर देहाचा अंत करायचा अशा निश्चयाने ते भटकू लागले. काशीपासून दोन मैलांवर असलेल्या एका टेकडीवरच्या शिवालयात त्यांनी तपःश्चर्येचा संकल्प सोडला व निराहार राहून अनुष्ठानास प्रारंभ केला. भुकेने जीव कासावीस होऊ लागला की आसपासची बिल्वपत्रे गोळा करून त्यांचा रस काढून प्यावा. अशी दोन सप्तके उलटली. पुढे रस काढायचे त्राण राहिले नाही तेव्हा नुसतीच बिल्वपत्रे खाऊ लागले. तिसऱ्या सप्तकात भुकेने ग्लानी आलेल्या अवस्थेत साक्षात्कार झाला. ज्या देवजीबुवांच्या कजाग पत्नीने त्यांना छळून छळून घराबाहेर काढले तिचे रूप

घेऊनच देवी स्वप्नात येऊन सांगू लागली की,—" जा, आता खाली काशीत जा. तिथे गंगाकिनारी जोशीबुवा तुझी वाट पहात आहेत. जा ! "

त्या दृष्टांताने बाळकृष्णबुवा खडबडून जागे झाले. धडपडत्या स्थितीत ते गंगाकिनाऱ्यापर्यंत आले. आश्चर्य असे, की खरोखरीच यात्रेसाठी काशीत आलेले जोशीबुवा तिथे अनुष्ठान करीत उभे होते. बाळकृष्णबुवांना राहवले नाही. त्यांनी जवळ जाऊन त्यांच्या चरणावर आपला देह लोटून दिला. जोशीबुवांनी त्यांना उठविले. हृदयाशी धरले. ते त्यांना राहात्या ठिकाणी घेऊन गेले. आणि ताबडतोब तंबोरी काढून तिच्या तारा जुळवून त्यांनी बाळकृष्णबुवांना शिकवायला सुरुवात केली. परात्पर गुरू आणि निष्ठावंत शिष्य यांची भेट झाली. बाळकृष्णबुवांचे दुर्दैन संपले. त्या दिवसापासून पुढे नऊ वर्षेपर्यंत वासुदेवबुवा जोशांनी बाळकृष्णबुवांना तालीम दिली. बुवांची तपःश्चर्या फळाला आली. नऊ वर्षे गुरूसेवा करून बुवांनी विद्यार्जन पुरे केले. मुळांतली वडिलांनी शिकवलेली ध्रुपद गायकी, त्यानंतर अनेक ठिकाणी फिरून मिळविलेली विविध तऱ्हेची गायकी, देवजीबुवांनी चार वर्षेपर्यंत शिकविलेली टप्प्याची गायकी आणि वासुदेवबुवा जोशांनी शिकविलेली ग्वाल्हेर घराण्याची अस्सल अशी ख्याल गायकी या सर्वांचा उत्कृष्ट संगम बाळकृष्णबुवांच्या ठिकाणी झाला.

" विजयी हो !" असा आशीर्वाद परात्पर गुरूकडून घेऊन दिग्विजयासाठी बाळकृष्णबुवा उत्तरेकडे गेले. तिथे संगीताबद्दल प्रसिद्ध असलेल्या शहरात जाऊन मोठमोठ्या जलशात गाऊन त्यांनी अफाट कीर्ती मिळविली. जयपूरच्या एका जलशात भूगंधर्व रहिमतखाँ यांच्या बरोबरीने गाऊन सर्व खानदानी गवय्यांकडून त्यांनी शाबासकी मिळविली. विजयी होऊन ते ग्वाल्हेरास परत आले

आणि मिळविलेली कीर्तिपुष्पे त्यांनी गुरूचरणावर वाहिली. एकदा-तर असा प्रसंग घडला की गुरूमाउलीच्या डोळ्यांतून आनंदाश्रूंच्या धारा ओघळल्या. आपण या शिष्याला गाणे शिकवून धन्य झालो असे त्यांना वाटले.

ग्वाल्हेरास साजऱ्या होणाऱ्या वसंतोत्सवात बाळकृष्णबुवांचे गाणे रंगात आले होते. आपला शिष्य कसा काय मैफल जमवितो हे प्रत्यक्ष पाहावे म्हणून वासुदेवबुवा हळूच येऊन जिथे गाणे चालले होते तिथे आडोशाला उभे राहिले. गाण्याला तोबा गर्दी झाली होती आणि गाणेही असामान्य रंगले होते. "वाहवा! आज जोशीबुवा खूप जुळले आहेत. बऱ्याच दिवसांनी इतकं चांगलं गाणं ऐकायला मिळालं!", असे उद्गार त्यांच्या बाजूलाच उभे असलेले काही रसिक लोक काढीत होते. त्यांना वाटत होते की गाणारी व्यक्ती दुसरी कुणी नसून ते वासुदेवबुवा जोशीच आहेत. ते उद्‌गार कानी पडताच वासुदेवबुवांना आनंद झाला. आपल्या शिष्याने आपले नांव राखलेले आहे; किंबहुना आपल्या नांवाला अधिक उजाळा आणलेला आहे हे त्यांनी प्रत्यक्ष पाहिले. त्यांना धन्यता वाटली आणि दुसऱ्या दिवशी "बाळकृष्णा, तुला गाणं शिकवलं त्याचं तू चीज केलंस रे!" असे उद्‌गार काढून त्यांच्या पाठीवरून मायेचा हात फिरविताना त्यांच्या डोळ्यांतून समाधानाने अश्रू आले.

"जा बाळकृष्णा, आता घरी जाऊन गृहस्थाश्रम पत्कर. सत्पात्री विद्यादान कर. चांगलं मिळेल ते घे. जा. तुझं कल्याण होईल!", असा गुरूंनी तोंड भरून दिलेला आशीर्वाद घेऊन बाळकृष्णबुवा महाराष्ट्रात यावयाला निघाले. वाटेत अनेक ठिकाणी सत्कार करून घेत ते मुंबईस आले. आता गावी जाऊन लग्न करायचे असे त्यांच्या मनाने घेतले होते; पण मुंबईत आणखी एक घटना अशी घडली की त्यामुळे बुवांनी स्वेच्छेने आपले लग्न लांबणीवर टाकले.

हद्दूखाँ यांचे चिरंजीव महंमदखाँ यांचे गायन विद्यारामभाईंच्या वाड्यात होणार आहे असे कळल्यावर ते तिथे गेले आणि गुपचूपपणे एका बाजूला बसले. गाणे ऐकण्यास बेसुमार गर्दी झाली होती आणि हे गाणे विशेष रंगावे म्हणून खाँसाहेबांच्या चाहत्यांनी त्यांना गाणे सुरू होण्याच्या आधी अस्सल अशी विलायती दारू एकदोन 'पेग' जास्तच पाजली; पण खाँसाहेबांना ती इतकी चढली की त्यांचा स्वतःवरील ताबाच सुटला. 'आज माझी तब्येत लागत नाही!' असे म्हणून ते बैठकीवरून उठलेदेखील. जमलेल्या गर्दीचा मनोभंग होऊ नये म्हणून त्या बैठकीवर दुसऱ्या कुणाला तरी बसविण्याची खटपट चालक मंडळी करू लागली. बाजूला बसलेल्या बाळकृष्णबुवांना ते खपले नाही. ते उठून उभे राहिले. म्हणाले— "खाँसाहेबांची आज तब्येत ठीक नसल्यास जलसा बंद करा; पण त्यांच्या बैठकीवर दुसरा कुणी बसवून त्या बैठकीचा अपमान करू नका!" आणि यानंतर तोंडातोंडी होता होता हा वाद इतक्या थराला गेला, की एक तर महंमदखाँनी गावे किंवा दुसऱ्या कुणी गाऊन त्यांची बैठक अपमानीत करावी असा प्रसंग येऊन ठेपला. कुणीतरी चिडून म्हणाले—"तुम्हांला त्यांचा एवढा अभिमान असेल तर तुम्हीच बसा ना!"

बाळकृष्णबुवांनी महंमदखाँची परवानगी घेतली. त्यांच्या चरणाला हात लावून वंदन केले आणि "गुरू घराण्याच्या बैठकीला पाय लावायची माझी लायकी नाही; पण त्यांच्या आज्ञेने मी त्यांची सेवा करीत आहे", असे नम्रतेचे उद्गार काढून त्यांनी ख्याल भरण्यास सुरुवात केली. त्या दिवशी ते असे गायले की तीन तासपर्यंत एका जागी लोक खिळ्यांनी ठोकून बसविल्यासारखे जागचे हललेच नाहीत. त्यांना ते भान राहिले नाही. दुसऱ्या दिवशी महंमदखाँना भेटायला गेले असता 'तू आता माझ्याबरोबर दौऱ्यावर चल' अशी त्यांनी

विनंती केली; पण 'गुरूंच्या आज्ञेशिवाय मला येता येणार नाही' असे त्यांनी महंमदखाँना सांगितले; पण मनातून महंमदखाँकडून त्यांना बरेच संपादावयाचे होते. त्यांची गायकी, त्यांची जबड्याची तान आणि आणखी बऱ्याच गोष्टी; पण हे जमणार कसे या विवंचनेत ते होते.

पण महंमदखाँनी जोशीबुवांकडून आज्ञा आणवून तो प्रश्न सोडविला आणि बुवांना घेऊन ते दौऱ्यावर निघाले. त्या दौऱ्यात महंमदखाँ यांना हवा होता त्याहून कितीतरी अधिक पैसा मिळाला; पण बाळकृष्णबुवांनी त्यांच्याकडून एक पैही घेतली नाही. आपल्यालाही हवे त्यापेक्षा पुष्कळ ज्ञान मिळाले याच आनंदात ते राहिले. हवी असलेली जबड्याची तान आणि कितीतरी नवीन चिजा आणि स्वरालंकार त्यांना मिळाले होते. दौऱ्याहून परत येताना ते मुंबईस उतरले. मुंबईत त्यांचे खूप जलसे झाले. मुंबईहून ते पुण्यास गेले. पुण्यास त्यांची सातारकर महाराजांशी गाठ पडली व महाराजांनी आपल्या पदरी त्यांना दरबार गायक म्हणून राहावयाची विनंती केली. त्यांच्या पदरी ते काही दिवस नोकरीस राहिले. महाराजांचे बुवांवर अतिशय प्रेम होते. तसाच आदरही होता. त्यांनी विनंती करून बुवांना गृहस्थाश्रम पत्करावयाला लावला आणि सुखात ठेवले.

विद्या मिळाली, लौकिक मिळाला, मनासारखा राजाश्रय मिळाला, प्रपंचही सुखाचा झाला; पण बुवा अजून अतृप्त होते. आपल्या गुरूपाशी जाऊन आणखी विद्या मिळवावी, त्यांना सुख द्यावे अशी त्यांची इच्छा होती. त्यांची ती इच्छा तिथेच पुरी झाली. पं. वासुदेवबुवा जोशी बऱ्याच कालावधीनंतर महाराष्ट्रात आले होते. ते शिष्याकडेच उतरले आणि दौऱ्यावर जायची आपली इच्छा त्यांनी बाळकृष्णबुवांस सांगितली. 'मनी आणावे ते ते होते' अशी बाळकृष्णबुवांची स्थिती झाली. त्यांना आनंद झाला. सातारकर महाराजांची आज्ञा ताबडतोब मिळाली आणि बुवा आपल्या गुरूंबरोबर दौऱ्यावर निघाले. ते

फिरत फिरत अनेक ठिकाणी जलसे करीत नेपाळपर्यंत गेले. सर्व ठिकाणी त्यांचा सन्मान झाला. द्रव्यही भरपूर मिळाले; परंतु नेपाळातील हवा वासुदेवबुवा जोशींना मानवली नाही. त्यांना अतिसाराचा विकारही जडला.

गुरूजींना घेऊन बाळकृष्णबुवा ग्वाल्हेरास आले आणि सेवा करीत राहिले. अतिसार आणि अशक्तपणा यामुळे दिवसातून कित्येक वेळा जोशीबुवांचे कपडे घाण होत; पण बाळकृष्णबुवांनी त्यांना त्या घाण कपड्यात कधीही वावरू दिले नाही; क्षणोक्षणी त्यांनी त्यांचे कपडे धुण्यापासून शरीर धुण्यापर्यंत सर्व कामे उत्साहाने केली. कधीही कंटाळा केला नाही. जोशीबुवांची पत्नी आणि घरची मंडळीदेखील कंटाळली. पण बाळकृष्णबुवांनी आपल्या परात्पर गुरूला सोडले नाही. शेवटी सहा महिन्यानंतर त्याच दुखण्यात वासुदेवबुवा जोशांचा अंत झाला. मरणसमयी त्यांनी बाळकृष्णबुवांना जवळ बोलावून सांगितले की— "मुला, माझी विद्या मी तुला दिली; पण आजपर्यंत जो आशीर्वाद मी कुणालाच दिला नाही तो तुला देतो—तुझ्या गाण्याचा कधीही बेरंग होणार नाही!"

एवढ्या सायासांनी आपण जी संगीत विद्या मिळविली ती स्वत:कडेच न ठेवता तिचा प्रसार करावा, सामान्य माणसांच्या मनात गवय्याबद्दल असलेली विक्षिप्त कल्पना आणि दुजाभाव काढून टाकावा, संगीत समाजाभिमुख करावे अशी बाळकृष्णबुवांची भावना होती. म्हणून ग्वाल्हेरहून मुंबईस परतताच त्यांनी गायन समाज काढला. त्यांचे सुदैव असे की डॉ. भांडारकर, महादेव चिंतामण आपटे, कुंटे, न्यायमूर्ती तेलंग, अशी प्रतिष्ठित मंडळी त्यांच्याकडे गाणे शिकायला येऊ लागली. इथे त्यांनी 'संगीत दर्पण' नांवाचे मासिकही काढले. आणि जोरदार प्रचार सुरू केला; पण दम्याच्या विकाराने प्रकृती

नादुरुस्त झाल्याने ते मिरजेस येऊन श्रीमंत बाळासाहेब मिरजकरांच्या आश्रयाला राहिले. श्रीमंतांनी एक दिव्य औषधी मिळवून देऊन त्यांचा दमा समूळ नाहीसा केला. त्या कृतज्ञतेने भारावून जाऊन बाळकृष्णबुवा काही वर्षे श्रीमंतांच्याच आश्रयाला राहिले.

आता त्यांच्या आयुष्यातली अनेक ध्येये पूर्ण झाली होती. विद्वान म्हणून त्यांचा लौकिक झाला होता. फार मोठा मान त्यांना मिळाला होता. त्यांना काही म्हटल्या काही कमी नव्हते. आता मात्र स्वग्रामी जावे असे त्यांना फार वाटू लागले. 'विद्वान म्हणूनच परत येईन' असे उद्‌गार त्यांनी तिथून बाहेर पडताना काढले ते पुरे केले होते. गायनाचार्य म्हणून हिंदुस्थानभर त्यांचा लौकिक झालाच होता. आता जन्मभूमीत जावयाला कोणतीच हरकत नव्हती.

आणि इचलकरंजीत त्यांनी पाऊल ठेवले तेव्हा त्यांचे कसे स्वागत झाले असेल याची कल्पनाच केलेली बरी. स्वतः संस्थानाधिपती श्रीमंत नारायणराव यांनी त्यांना आपल्या घरी आश्रय दिला.

बुवांचा शिष्यवर्गही आपल्या गुरूजींप्रमाणेच लोकोत्तर असा झाला. गांधर्व महाविद्यालयाचे संस्थापक पंडित विष्णु दिगंबर पलुस्कर, अनंतबुवा जोशी, निलकंठबुवा जंगम, वामनबुवा चाफेकर, यशवंतबुवा मिराशी, भाटेबुवा, काळेबुवा, तातोबा पेंडसे, गुंडोबुवा इंगळे, औंधकर इत्यादी बुवांच्या शिष्योत्तमांनी आपल्या गुरूचे नांव दिगंत गाजवून अखेरच्या आयुष्यात आपल्या गुरूजींना खूप सुख दिले. गोव्याच्या दत्तीबाई व चंद्राबाई या दोन गायिकांनाही बुवांनी तालीम दिली होती. 'ज्या मापाने द्यावे त्या मापाने घ्यावे' अशी एक म्हण आहे. वासुदेवबुवांनी आपले गुरू हद्दूखाँ विकलांग झाले तेव्हा त्यांची पूज्यभावाने जशी सेवा केली तसाच पूज्यभाव बाळगणारा शिष्य वासुदेवबुवांनाही मिळाला. बाळकृष्णबुवांनी वासुदेवबुवांची जशी सेवा केली तशीच सेवा बाळकृष्णबुवांच्या सर्व शिष्यांनी

अखेरपर्यंत केली. आपल्या सर्व शिष्यवर्गाला घेऊन बुवांनी समस्त भारतवर्षात एक मोठा दौरा काढला होता. हा दौरा अत्यंत यशस्वी झाला.

अखेरच्या आयुष्यात बुवांना पुत्र शोकासारखी दारुण दु:खे भोगावी लागली. ज्याला त्यांनी संगीत विद्येत पारंगत करून ज्याच्यावर आपल्या भावी आशा-आकांक्षांचे मनोरे उभारले तो त्यांचा पुत्र अण्णाबुवा देवाघरी निघून गेला. अशा एकामागून एक झालेल्या आघातांनी हे गायनाचार्य खचले. त्यांच्या फुलासारख्या कोमल अंत:करणाला त्या दु:खाच्या डागण्या सहन होईनात. ते भ्रमिष्टा-सारखे वागू लागले. अशा परिस्थितीत श्रीमंत इचलकरंजीकरांनी त्यांच्यावर कृपेची अखंड छाया धरली. त्यांचे शेवटचे गाणेही राजवाड्यावरच झाले.

संगीत विद्येतील या भव्य-दिव्य कलावंत पुरुषाचा आत्मा माघ शुद्ध अष्टमी शके १८४८ (१९२६) या दिवशी पंचमहाभूतांत विलीन झाला. बुवांचे चरित्र म्हणजे दीपस्तंभासारखे. अनेक पिढ्यांना ते मार्गदर्शन करीत राहील. संगीत रसिक त्यांचे आजन्म ऋणी राहतील.

● ● ●

# संगीत प्रसारक पंडित विष्णु दिगंबर पलुस्कर

उत्तर हिंदुस्थानातली ख्याल गायकी गायनाचार्य बाळकृष्णबुवांनी महाराष्ट्रात ओढून आणली; आणि तिच्या प्रचाराचा पाया जरी घातला, तरी संगीतकला तोपर्यंत राजाश्रयावर जगण्यात आनंद मानीत होती. अति सामान्य माणसांच्या श्रवणरंध्रापर्यंत तिचा ध्वनी पोहोचू शकत नव्हता. कुबट, कोंदट वातावरणात राहणाऱ्यांची ती स्वामिनी होती. गुप्त राहण्यात तिला धन्यता वाटे. सामान्यांच्या जीवनाशी नाते जोडायला ती इच्छित नव्हती. ती उत्तरेकडेच सुस्तावली होती.

तिच्याशी नाते जोडावे म्हणून महाराष्ट्रातले काही दुर्दम्य प्रयत्नवादी तरुण उत्तरकडे गेले. त्यांची हिंमत, त्यांचा स्वार्थत्याग, त्यांची ज्ञान-लालसा अचाट होती. पडेल ते कष्ट करायची. प्रसंगी त्यासाठी आत्मार्पण करायची त्यांची तयारी होती. आणि झालेही तसेच. तपःश्चर्या करणाऱ्या प्राचीन ऋषि-मुनींना जशा अनेक

आपत्ती भोगून सिद्धी मिळवावी लागली तशा आपत्ती त्यांनाही भोगाव्या लागल्या. पं. वासुदेवबुवा जोशी, पं. देवजीबुवा परांजपे, पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर प्रभृती महापुरुषांनी अनेक संकटे पार करून संगीत-कलेशी नाते जोडले, तिला प्रसन्न करून घेतले आणि वशही केले. परंतु एकदा तिला अधीन करून घेतल्यानंतर मात्र ते थांबले नाहीत. त्यांनी कोंदटलेल्या, बुरसलेल्या वातावरणातून संगीतकलेला प्रकाशात आणायचा प्रयत्न केला. तिच्यापासून मिळणारा आनंद बहुजन-समाजापर्यंत पोहोचविण्याचा चंग बांधला आणि ते कार्याला लागले. आधी त्यांनी शिष्य तयार केले आणि त्यांना आपल्या ध्येयाचा मंत्र सांगितला व आपल्या कार्यासाठी प्रवृत्त केले.

द्रोणाचार्यांनी अनेक शिष्य केले; पण त्यांच्या प्रतिज्ञेची पूर्ती करणारा जसा एक पार्थच निघाला, तसाच आपल्या गुरूच्या ध्येय-पूर्तीसाठी झटून शिवाय स्वतःचा असा उत्तुंग कर्तबगारीचा ठसा त्यावर ठेवून हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत सबंध हिंदुस्थानातल्या अतिसामान्य लोकांपर्यंत ज्यांनी संगीताचा प्रसाद पोहोचविला त्यांचे नांव पंडित विष्णु दिगंबर पलुस्कर!

संगीत प्रसारार्थ ज्या वेळी विष्णु दिगंबर बाहेर पडले त्या वेळी जरी त्यांचे गुरू गायनाचार्य बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांनी थोडीशी अनुकूल भूमी तयार केलेली असली तरी मध्यमवर्गीयांत संगीतकारा-बद्दल विशेष जिव्हाळा नव्हता. आपल्या मनरंजनापुरते ते त्याला जवळ करीत; पण अजून आपल्या घराच्या उंबरठ्याच्या आत त्यांनी त्याला येऊ दिले नव्हते. कलावंत हा नशाबाजच असतो, मुमुक्षू-सारखा तो जगूच शकत नाही, त्याचं सारं जीवन अव्यवहारी आणि अस्ताव्यस्त, संसारी जीवनाला तो नालायक, अशा साऱ्या कल्पनांमुळे शिष्ट समाज कलावंताला आपल्यापासून वेगळा ठेवू पाहात होता.

विष्णुबुवांना या सर्व परिस्थितीची जाणीव होती. म्हणून पहिल्या

प्रथम त्यांनी आपल्या ध्येयाच्या ब्रीदवाक्याची घोषणा मुळीं हीच केली की, ' तंबोऱ्याच्या जोरावर मी जग जिंकीन ! ' त्यांच्या या प्रतिज्ञेनेच समाज हादरला. विष्णुबुवांनी दोन गोष्टी आपल्या नजरेसमोर ठेवल्या. पहिली अत्यंत अवघड अशी गोष्ट त्यांना करायची होती ती म्हणजे गवय्याला समाजात स्थान निर्माण करणे ; त्याच्या बद्दलचे कलुषित मत बदलून टाकणे ; आणि दुसरी—संगीत हे जीवनाचेच एक अंग मानणे ; त्याला देवस्वरूप समजणे व देवाच्या सख्यत्वासाठीं त्याचा उपयोग केल्याच्या निमित्ताने प्रतिष्ठितांच्या माजघरापर्यंत त्याला प्रवेश मिळवून देणे. आपली प्रतिज्ञापूर्ती करायला विष्णुबुवांना ३५ वर्षे अविरतपणे झगडावे लागले. पण त्यांत ते यशस्वी झाले. सारा शिष्ट समाज त्यांचा झाला. संगीताच्या नादात गुंग झाला. संगीत लोकप्रियतेच्या शिखरावर गेले. कलावंताबद्दल लोकांच्या मनात आदराची भावना उत्पन्न झाली. आस्थेने ते त्याची चौकशी करू लागले. कलावंत हाही एक समाजाचा घटक म्हणून मिरवू लागला.

विष्णु दिगंबर पलुस्कर यांचा जन्म इ. स. १८७२ साली श्रावण शुद्ध पौर्णिमेच्या दिवशी कुरुंदवाड संस्थानात झाला. त्यांचे घराणे कीर्तनकाराचे. मूळ आडनांव ' गाडगीळ ' असे होते. परंतु ते ' पलुस ' गावचे म्हणून त्यांना लोक पलुस्कर म्हणायचे. पुढे तेच त्यांचे आडनांव झाले. कुरुंदवाड संस्थानचे अधिपती श्रीमंत नानासाहेब पटवर्धन हे विष्णुबुवांचे वर्गबंधू असल्याने महाराजांचा विष्णुबुवांवर फार लोभ होता. आपल्या भावी आयुष्यात घराण्याच्या परंपरेप्रमाणे विष्णुबुवांना एक कीर्तनकार तरी व्हायचे होते किंवा—ते नच झाल्यास—थोडेसे इंग्रजी शिक्षण पदराला आहे म्हणून कुरुंदवाड संस्थानातच कुठे तरी कारकुनी तरी करायची एवढाच ध्येयवाद

होता. कीर्तनकाराचा मुलगा असल्याने गाण्याचे अंग अनुवंशिक होते. पण बुवांच्या आयुष्यात परिवर्तन घडविणारी एक विलक्षण घटना त्यांच्या लहानपणीच घडली.

गावात दत्तजयंतीचा उत्सव फार मोठ्या प्रमाणावर होत असे अशाच एका उत्सवप्रसंगी शोभेची दारू उडविताना स्फोट होऊन विष्णुबुवांना जबर दुखापत झाली. त्यांचे तोंड भाजले वँ डोळ्यांवर बराच परिणाम झाला. ताबडतोब अनेक इलाज करण्यात आले. खुद्द संस्थानाधिपतीने जातीने लक्ष घालून तत्कालीन मोठमोठ्या डॉक्टरांशी विचारविनिमय करून इलाज करविले; पण व्यर्थ. भाजलेले तोंड बरे झाले पण दृष्टीवर झालेला ज्वालाग्राही दारूचा परिणाम शेवटपर्यंत तसाच राहिला. अशा परिस्थितीत मुलाला शालेय शिक्षण दिल्यास डोळ्यांवर ताण पडून त्याच्या भावी आयुष्याला ते घातक होईल म्हणून ज्याचा डोळ्यांशी अधिक संबंध येणार नाही असे कोणतेही अन्य शिक्षण मुलाला द्यावे असे श्रेष्ठांच्या विचार-विनिमयात ठरले. पलुस्करांचे कुटुंब कीर्तनकार म्हणून ओळखले जात असल्याने मुलाला गाणे शिकविणेच बरे असे एकमताने ठर-विण्यात आले.

सुदैवाने गायनाचार्य बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर हे मिरज संस्थानाधिपती श्रीमंत बाळासाहेब यांच्या पदरी असल्याने व मिरजेचे अधिपती व कुरुंदवाडचे अधिपती श्रीमंत दाजीसाहेब हे साडू असल्याने मुलाने गाणे कुणाकडे शिकावे हा प्रश्न चुटकीसरशी सुटला. मुलाला मिरजेला बाळकृष्णबुवांकडे पाठविताना त्याची सर्वतोपरी जबाबदारी श्रीमंत दाजीसाहेबांनी श्री. बाळासाहेब मिरजकरांवर टाकली. नुसती अशी सोयच करून श्रीमंत स्वस्थ बसले नाहीत तर त्यांनी स्वत:च्या एखाद्या जवळच्या नातेवाईकासारखी विष्णुबुवांची सदैव काळजी वाहिली. त्याची मिरजेला आबाळ तर होत नाही ना?

शिक्षणाची प्रगती कुठपर्यंत झाली ? मुलाचे या शिक्षणात व्यवस्थित लक्ष लागते की नाही ? इत्यादी चौकशी श्रीमंतांकडून वारंवार होत होती. गायनाचार्य बाळकृष्णबुवांसारख्या विद्यासंपन्न तपस्व्याने विष्णुबुवांना मनापासून तालीम देऊन त्यांना होईल तितक्या लवकर तयार केले.

श्रीमंतांचा आश्रय आहे म्हणून विष्णुबुवांनी गुरूसेवेकडे कदापि दुर्लक्ष केले नाही. इतर शिष्यांप्रमाणेच आपल्या वाट्याला येणारे काम नम्रतेने केले. पाणी वाहणे, लाकडे फोडून देणे, स्वयंपाकात मदत करणे आणि केरकचरा काढण्यापासून सर्व तऱ्हेची कामे करून गुरूसेवा केली. गुरूपत्नींनी परीक्षा घेण्यासाठी हलकी कामेही सांगितली. पण विष्णुबुवा परीक्षेत उतरले आणि गुरू आणि गुरूपत्नी या दोघांचीही मर्जी त्यांनी संपादली.

त्या काळात गाण्याचे शिक्षण घ्यायचे म्हणजे ते गुरूमुखातून श्रवण करून आत्मसात करावे लागे. आजच्यासारखी कोणतीच अद्यावत् साधने तेव्हा नव्हती. गाणे अतिशय कष्टसाध्य होते. त्यांतून विष्णुबुवांचा आवाज अजिबात लवचिक नव्हता. बराचसा सपाट आणि जाडा होता. पण बुवांनी आपला दैनंदिन शिकवणीचा कार्यक्रम आटोपल्यावर आवाज मनासारखा वळावा म्हणून व 'मुरक्या', 'हरकती' आदी स्वरालंकार गळ्यातून हुकमी यावेत म्हणून गुप्तपणे रोज तीन तीन तास खाजगी मेहनत करायला सुरुवात केली. काही वर्षे तर सायंकाळी सात वाजल्यापासून सकाळी सात वाजेपर्यंत बारा बारा तास रियाज जारी ठेवला. फलतः त्याचे परिश्रम सार्थकी लागले. दहा वर्षे अविश्रांत मेहनत करून ते तयार झाले.

एक गोष्ट विष्णुबुवांच्या मनाला फार जाचत असे. आपण श्रीमंतांचे आश्रित म्हणून भोवतालच्या लोकांनी आपणाशी मर्यादेने



पं. विष्णु दिगंबर पलुस्कर

वागावे आणि आपले गुरू दरबारचे नोकर म्हणून आपल्या देखत त्यांच्याशी वरचढपणाने वागावे हे त्यांना सहन होत नसे. या उच्चनीचपणाने वागण्याचा एकदा तर कळसच झाला. बुवा आणि गुरू बाळकृष्णबुवा गाण्यावर चर्चा करीत रस्त्यातून चालले असताना श्रीमंतांची बगी आली आणि त्यांनी विष्णुबुवांना जवळ बोलवून बगीत आपल्या शेजारी बसविले आणि बाळकृष्णबुवांना पायी यायची आज्ञा केली. अशा काही गोष्टींमुळे विष्णुबुवांना गुदमरल्यासारखे होई ; पण नाइलाजाने ते गप्प बसत असत. यावर उपाय एकच होता आणि तो म्हणजे मिरज सोडून जाणे, या सामाजिक विषमतेचा बिमोड करणे आणि गायनाचा जोरदार प्रचार करणे. आपला हा विचार ते आपल्या सहाध्यायापाशी बोलून दाखवीत असत. एक दिवस त्यांनी निश्चय केलाच आणि त्या दोघा सहाध्यायांना बरोबर घेऊन मिरजेची हद्द ओलांडली.

फिरत फिरत लहान सहान मुक्काम करीत ते साताऱ्याला आले आणि काही दिवसांनी त्यांनी बडोदे गाठले. बडोद्यात त्यावेळी ख्यातनाम गवय्ये-बजवय्ये होते. ते दरबारी कलावंत होते. तंबोरी काखोटीस मारून "माझे गाणे ऐकता का हो ?" असा प्रश्न श्रीमंतांघरी जाऊन करणे हे विष्णुबुवांना लाजिरवाणे वाटले. तशा दीनवाण्या वृत्तीची त्यांना मुळापासून चीड होती. 'तंबोरा काखोटीस मारून मी आयुष्यात कधी दारोदार भीक मागत हिंडणार नाही !' अशी त्यांनी प्रतिज्ञाच केली होती. त्यांनी एक वेगळाच मार्ग काढला. तेथील एका देवालयात त्यांनी गावयाचे ठरविले आणि गावातील प्रतिष्ठित लोकांना आमंत्रण दिले. त्यांचे गाणे लोकांना इतके आवडले की त्यांची कीर्ती राजघराण्यापर्यंत जाण्यास वेळ लागला नाही. श्रीमंत जमनाबाई राणीसाहेबांनी बुवांना बोलावून ताबडतोब गाणे करविले आणि दोन महिने बडोद्यातच राहावयाची विनंती केली. पुढे

सयाजीराव महाराजांनी राजवाड्यात त्यांची खास बैठक करून त्यांना मोठी बिदागी दिली. संस्थानाधिपतींनी बुवांना बडोदा दरबारात नोकरीस राहाण्याची विनंती केली; पण बुवांचे ध्येय ठरलेले असल्याने त्यांनी ती नोकरी साभार नाकारली आणि बडोद्याहून त्यांनी राजकोटला प्रयाण केले.

राजकोट, जुनागड, मांगरोड इत्यादी ठिकाणी विजयपताका रोवून आणि आपली आर्थिक बाजू भक्कम करीत पंडितजी प्रवास करीत असताना जुनागडमधील गिरनार पर्वतावर श्री दत्तात्रेयांचे एक जागृत स्थान असल्याचे त्यांच्या कानावर आले. पंडितजींची वंशपरंपरागत दत्तभक्ती उफाळून आली व ते त्या स्थानाच्या दर्शनाला गेले असताना तिथे त्यांना एका सिद्धपुरुषाचे दर्शन झाले. त्या सिद्धपुरुषाने आशीर्वाद देऊन सांगितले की, "तुम्ही आता पंजाबात जाऊन तिकडे संगीत प्रचाराचे कार्य सुरू करा!" त्यावर पंडितजींनी शंका व्यक्त केली की,—आम्ही महाराष्ट्रीय माणसे; पंजाबसारख्या परप्रांतात टिकाव कसा धरू? त्यावर ते सिद्ध म्हणाले की,—"तूं काळजी करू नकोस. तुला कोणतीही अडचण पडणार नाही. परमेश्वर तुझ्या पाठीशी आहे! जा!"

सिद्धपुरुषाने आशीर्वाद दिला त्या क्षणापासून पंडित विष्णु दिगंबरांचा सर्वत्र विजय होऊ लागला. सबंध मध्य आणि उत्तर हिंदुस्थान पंडित पलुस्करांच्या नांवाने दुमदुमला. जिथे जात तिथे सभा जिंकीत. खुद्द ग्वाल्हेरात—म्हणजे जिथून विष्णुबुवांच्या गुरूजींनी—बाळकृष्णबुवांनी—विद्या संपादन केली, तिथे तर त्यांची फारच वाहवा झाली. चार महिने त्यांचा ग्वाल्हेरात मुक्काम झाला; पण हे चारही महिने निरनिराळ्या सरदार-दरकदारांच्याकडे व सार्वजनिक मिळून त्यांचे खूप कार्यक्रम झाले. त्यानंतर मथुरा, भरतपूर, दिल्ली, अमृतसर, लाहोर, रावळपिंडी, मुलतान इत्यादी ठिकाणीही अपूर्व यश मिळाले.

मथुरेतील मुक्कामात त्यांनी वक्तृत्वाची साधना केली. कारण आपल्या प्रचारकार्याला उत्तम वक्तृत्वाची अत्यंत आवश्यकता आहे हे त्यांना पटले होते. प्रथम प्रथम ते लिहिलेले भाषण वाचीत. पण नंतर मात्र ते स्वतंत्रपणे अस्खलीत बोलू लागले. जसे उत्तम गाणे तसेच उत्कृष्ट वक्तृत्वही ईश्वरी दयेने त्यांना लाभले.

अलिगडच्या मुक्कामात एका नापिताने त्यांना काही धृपदे गाऊन दाखवून लगेच त्यांची 'स, र, ग, म' ही करून दाखविली. त्याचप्रमाणे रागाचे विवेचन करणारे संस्कृत श्लोकही म्हणून दाखवून पंडितजींना चकित केले. विष्णुबुवांच्या शिक्षणात या गोष्टी आल्याच नव्हत्या. गुरूमुखांतून श्रवण केलेले गाणे त्यांनी घोटविले होते. एवढेच ज्ञान! त्याचा गर्भितार्थ, शास्त्रार्थ, विश्लेषण इत्यादी गोष्टी त्यांना येतच नव्हत्या. कुठून येणार? रागाचे नांव विचारणे, त्याची उत्पत्ती किंवा त्या रागाच्या स्वरांचे आरोह, अवरोह याबद्दल चर्चा करणे हा तत्कालात अपराध मानला जात होता. गुरूजनांना शिष्याचे तसे वर्तन अपमानास्पद वाटत होते. शिष्याच्या तशा चौकस बुद्धीला 'फाजील' हे विशेषण लावले जात असे. यांत गुरूंचा दोष होता असेही म्हणता येणार नाही. तिथपर्यंतची परंपराच तशी होती. तसा कुणी प्रयत्न केलाच तर त्याची हकालपट्टी व्हायची; किंवा खुशीत असले तर एवढेच उत्तर यायचे की,—"तुला काय करायचे आहे रागाबिगाचे नांव. मी जी चीज शिकवतो ती चांगली घोटव, आणि त्या चिजेच्या अंगाने गा. रागाचे नांव आपोआप कळेल तुला!"

विष्णुबुवांनी धाकू न्हाव्याकडून संगीतातील ती शास्त्रशुद्ध मीमांसा ऐकल्यानंतर आपण याबाबतीत अनभिज्ञ आहोत ही गोष्ट त्यांच्या जिव्हारी लागली आणि त्यांनी तावडतोब त्या गोष्टींचा अभ्यास करण्याचा संकल्प करून आपले पुढील सर्व कार्यक्रम बंद करून टाकले. जलशांना चाट दिली आणि संगीतशास्त्राच्या संशोधनात खोल बुडी मारली.

नऊ महिनेपर्यंत अविश्रांतपणे त्यांनी हा अभ्यास केला. स्वरलेखन पद्धतीचे संशोधन केले. त्यासाठी पाश्चात्य स्वरलेखन पद्धतीचा आधार घेऊन, तालदर्शनासाठी वेगवेगळी चिन्हे तयार करून भारतीय संगीत लिपीबद्ध करण्याचे एक आम माध्यम त्यांनी तयार केले. त्यांना अविश्रांत श्रम करावे लागले खरे, पण एक फार चांगले कार्य त्यांच्या हातून झाले. या पद्धतीच्या आधारे पुढे आपल्या गांधर्व महाविद्यालयाची क्रमिक पुस्तकमालाही त्यांनी छापली. कांही चांगल्या चांगल्या चिजा लिपिबद्ध करून त्याचे एक पुस्तक छापावे म्हणून पंडितजी लाहोर येथे आले व पुढे लाहोर हीच आपली कर्मभूमी त्यांनी ठरविली.

स्वर आणि श्रुती यांच्या संशोधनात पंडितजींनी बराच काळपर्यंत डोके खुपसून आपल्या ज्ञानात खूपच भर घातली. त्यासाठी अनेक विद्वान व्यासंगी लोकांच्या गाठीभेटी त्यांनी घेतल्या शास्त्र्यांबरोबर रात्रंदिवस चर्चा केली. या चर्चेत त्यांना अनेकांकडून अनेक चांगल्या गोष्टींचा संग्रह करता आला.

पंडितजींच्या कर्तृत्वाचा यापुढचा टप्पा म्हणजे संगीत प्रचाराचा. त्यासाठी त्यांना एक स्थिर अशी पीठिका हवी होती. एक दिवस लाहोर येथील सर्व हितचिंतक स्नेह्यांच्या संगतीत विचार करून त्यांनी ५ मे १९०१ या दिवशी आपल्या ‘ गांधर्व महाविद्यालय ’ या संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या उर्जितावस्थेला अनेक अडचणी आल्या ; पण महत्त्वाकांक्षी विष्णुबुवा डगमगले नाहीत. त्यांनी नेटाने आपले कार्य पुढे नेले आणि ते यशस्वी झाले. लाहोरला यश मिळाल्यानंतर त्यांनी आपली दुसरी शाखा मुंबई येथे काढली. तिचा विस्तार वाढल्या-नंतर पुण्यात काढली व त्यानंतर नागपूरलाही काढली. दिवसेंदिवस या संस्थेचा विस्तार शुक्लेंदुवत वाढत होता. नको नको म्हणताना सर्व जातींच्या विद्यार्थ्यांचा लोंढा विद्यालयात लोटू लागला होता.

संगीत परीक्षांची अभिनव कल्पना पंडितजींनीच प्रथम स्वीकारली.

'प्रवेशिका' व 'प्रवीण' अशा पदव्या त्यांनी निर्माण केल्या. पदवीदान समारंभासाठी खास गव्हर्नरांना बोलावून त्यांच्या शुभहस्ते त्यांनी त्या विद्यार्थ्यांना देवविल्या. परंपरानिष्ठ लोक पंडितजींच्या कार्याला नाके मुरडू लागले. एका प्रतिष्ठित माणसाने जरा कुत्सितपणेच विचारले— "काय बुवा, किती तानसेन तयार केलेत?" बुवाही काही कमी तिखट नव्हते. देशाटन, शास्त्रग्रंथ विलोकन, बुद्धिमंतांच्या सहवासादी गोष्टींनी त्यांच्याही अंगात चातुर्य आलेच होते. त्यांनी त्याच मापाने उत्तर दिले—"माझ्या विद्यालयातून 'तानसेन' नसले तरी 'कानसेन' मात्र निश्चित तयार झालेले आहेत!"

सभागृहांतून जलसे लावण्याची प्रथा विष्णु दिगंबरांनीच प्रथम सुरू केली आणि अतिशय लोकप्रिय केली. आपल्या जलशाच्या आधी ते संगीताच्या महत्त्वासंबंधीचे अत्यंत सुंदर भाषण करीत. त्यांच्या वाणीवर लोक फिदा असत. ठरलेल्या वेळी जलसा सुरू करणे आणि योग्य वेळी बंद करणे या बाबतीत ते काटेकोर-पणे वागत असत. आपल्या विद्यार्थ्यांना इतर गवय्यांची गाणी ऐकविणे, त्याचप्रमाणे थोर थोर कलावंतांना आपल्याकडे बोलावून त्यांचा सत्कार करणे याबाबतीत ते अतिशय दक्ष असत. संगीत परिषदाही त्यांनी भरविल्या आणि यशस्वी केल्या. 'विश्वविद्यालयीन आणि तत्सम अन्य पढिक शिक्षणापेक्षा संगीताचे शिक्षण खास कमी दर्जाचे नाही', असे त्यांनी या परिषदांतून आवर्जून प्रतिपादिले.

यानंतर मात्र पंडितजींवर अनेक संकटे आली. त्यांच्या विद्यालयाची इमारत कर्जापायी लिलावात गेली. अनंत खटपटी करूनही त्यांना ती वाचविता आली नाही. त्यामुळे ते फार दुःखित झाले. मनःशांतीसाठी ते ईश्वरभक्तीत अधिक विलीन झाले. एकदा श्रीदत्तात्रेयाचे दर्शन घ्यावे म्हणून नृसिंहवाडीस गेले. तिथे सात दिवसपर्यंत रामायणावर संगीत प्रवचन केले. आठव्या दिवशी निरोप घेऊन जन्मग्रामी जायला निघाले

असता तेथील पुजारी मंडळींनी सांगितले की, " आज पहाटे आम्हाला श्री दत्त महाराजांचा दृष्टांत झाला. त्यात प्रभूंची आज्ञा झाली की आपल्या अंगावरची छाटी विष्णुबुवांना प्रसाद म्हणून द्यावी !" पंडितजींनी ती छाटी ईश्वरी प्रसाद म्हणून घेतली आणि पुढे निरंतर तिचा उपयोग केला. नाशिकला ' श्रीराम नाम धाम आधार ' नांवाचा आश्रम त्यांनी स्थापन केला आणि ते तेथेच राहिले.

जीवनाच्या उत्तरांगाला पंडितजींनी कीर्तनाची जोड दिली आणि कीर्तनांतून ते संगीताचा प्रचार करू लागले. " रघुपति राघव राजाराम " हे भजन त्यांनी इतके लोकप्रिय केले की हिंदु तर राहोच, पण मुसलमान, यहुदी, पारसी, ख्रिस्ती आदी लोकांत ते प्रेमाने म्हटले जाऊ लागले. महात्मा गांधींनी ते भजन आश्रम भजनावलीत दाखल करून घेतले आणि पुढे भारतभर त्याचा प्रचार झाला.

स्वातंत्र्याच्या आंदोलनात पंडित विष्णु दिगंबरांनी विविध तऱ्हेने गुप्तपणे मदत केली. आपल्या संगीत विद्यालयात क्रांतिकारक तरुणांना त्यांनी आश्रय दिला होता. राष्ट्रगीते, देशभक्तीची गौरवगीते त्यांनी जाहीर मैफलींतून गायला सुरुवात केली. नोटेशनसह ती छापून लोकांना वाटली. त्यांतल्या गोड चालीमुळे उत्तम प्रचार होऊ लागला. " वंदे मातरम् ", " भारत हमारा देश है " ही पदे पंडितजींनी लोकप्रिय केली. त्यांच्या स्वातंत्र्यवादी वृत्तीमुळे सर्व थोर पुढाऱ्यांचा त्यांच्यावर लोभ जडला होता.

१९२१ सालच्या अहमदाबाद काँग्रेसच्या अधिवेशनाच्या वेळी मंडपाबाहेर एवढी तोबा गर्दी झाली की महात्मा गांधींसहित इतर पुढाऱ्यांना मंडपात प्रवेश मिळणे पंचाइतीचे होऊन बसले. अशा वेळी व्यासपीठावर जाऊन पंडितजींनी आपले लोकप्रिय भजन सुरू केले आणि काय आश्चर्य—क्षणार्धात सर्व लोक ' रघुपति राघव ' या भजनाला साथ करता करता स्वतःलाच विसरले. या गडबडीत महात्माजी व इतर

केव्हा जाऊन व्यासपीठावर बसले हे कळले देखील नाही. पुढे अशा मोठ्या अधिवेशनांना नियमितपणे पंडितजींना आमंत्रणे येऊ लागली.

पंचम जॉर्ज बादशहाची मिरवणुक पाहायला पंडितजींना बोलविले असताना "माझा हिंदुस्थानचा राजा मंडालेच्या तुरुंगात असताना या राजाचे मी तोंडदेखील पाहाणार नाही", असे बाणेदारपणाचे उत्तर देऊन लोकमान्यांवरचे आपले प्रेम पंडितजींनी व्यक्त केले होते.

आपल्या शिष्यांना त्यांनी सर्व दृष्टींनी लायक बनविण्याचे प्रयत्न केले. गायकाने केवळ गायकच असून चालणार नाही. तो उत्तम वक्ता असावा, त्याला प्रसंगी लिहिता यावे, त्याचप्रमाणे इतर गुणही त्याजपाशी असावेत अशी त्यांची शिकवण होती. ती त्यांच्या बहुतेक शिष्यांनी अंगी बाणविल्याचे दिसून येते.

१९१८ साली आपल्या विद्यालयातर्फे एक फार मोठी संगीत परिषद भरवून आपल्याबद्दल विनाकारण गैरसमज बाळगून असलेल्या थोर थोर गवय्यांना एका ठिकाणी आणून त्यांच्या मनांतील किल्मिषे दूर करून त्यांचा सत्कार केला. पं. भास्करबुवा बखले यांना या परिषदेस मुद्दाम बोलाविले होते. भूगंधर्व रहिमत खाँसाहेब, गायनाचार्य बाळकृष्णबुवा, गायनाचार्य गुंडा महाराज इत्यादी इत्यादी बड्या बड्या संगीत तज्ज्ञांसमोर भास्करबुवांचे गाणे झाले आणि ते फारच रंगले; जाताना भास्करबुवा म्हणाले—"बुवा, तज्ज्ञ मंडळींनी तर गाण्याचा रस घेतलाच; पण इतर सर्वसामान्यांना गाणं इतकं समजतं याची मला कल्पना नव्हती. हा सर्व प्रताप तुमचा आहे बुवा! तुम्हीच सभ्य लोकांत शास्त्रीय गाण्याचा प्रचार केलात!"

१९२६ सालीं गांधर्व महाविद्यालयाचा रजत जयंत्युत्सव अत्युत्साहाने साजरा करून पंडितजी फिरून संगीत प्रचाराला निघाले. सबंध हिंदुस्थान भ्रमण करून सिलोन, मंडाले, बर्मा इकडेही त्यांनी भारतीय संगीताचा प्रचार केला आणि ते नेपाळात गेले. ही दगदग

इतकी झाली की त्याचा परिणाम त्यांच्या प्रकृतीवर होण्यात झाला आणि दिवसेंदिवस ती अधिकाधिक खालावत चालली. रामनाम हेच एक औषध पंडितजींनी चालू केले. नेपाळहून ते संपन्न स्थितीत परत आले; पण येताना स्वास्थ्य गमावून आले. तशाही परिस्थितीत त्यांनी आपली संगीताचा प्रचार करणारी व्याख्याने, गाणी, कीर्तने थांबविली नाहीत. तो धडाका चालूच होता. अखेर शरीर थकले. ते कोसळले. अखेरच्या दिवसांत श्रीमंत बाळासाहेब मिरजकरांनी आपल्याजवळ आणून ठेवून इलाज सुरू केले; पण काही उपाय चालला नाही. शुक्रवार दिनांक २१ ऑगस्ट १९३१ रोजी या थोर गुणसंपन्न कलाचार्यांनी इहलोक सोडला.

संगीत सृष्टीत हरिदासस्वामीपासून भास्करबुवा बखल्यांपर्यंत अनेक थोर विभूती होऊन गेल्या. त्यांच्या अद्वितीय कलासाधनेने दिपून जावे; परंतु संगीताचे लोण सामान्यांपर्यंत पोहोचवून संगीतकलेला प्रतिष्ठा मिळवून देणारा, आपल्या शिष्यांच्या चारित्र्याला व चरित्राला उजाळा आणणारा, आपल्या गुरूचे ऋण फेडणारा आणि आपला ध्येयवाद पुरा करून त्यावर सुवर्णकलश चढविणारा व त्यासाठी आयुष्याच्या अखेरीपर्यंत सतत प्रयत्न करणारा कलावंत एकच झाला. तो म्हणजे संगीताचार्य पंडित विष्णु दिगंबर पलुस्कर!

पं. विनायकबुवा पटवर्धन, पं. ओंकारनाथ ठाकूर, पं. नारायणराव व्यास, प्रो. बा. र. देवधर या व आणखी अनेक शिष्यांनी पंडित विष्णु दिगंबरांचे संगीतप्रसाराचे कार्य त्यांच्या पश्चात नेटाने चालू ठेवले. पंडितजींच्या आशीर्वादाने आणि पुण्याईने ते आजतागायत तसेच चालू आहे आणि पुढेही राहील.

● ● ●

# संगीत संशोधक चतुर पंडित विष्णु नारायण भातखंडे

ग्वाल्हेरहून पंडित बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर गुरूंची आज्ञा घेऊन महाराष्ट्रात आले आणि संगीताचा प्रचार करायला त्यांनी प्रथम सुरुवात केली ; पण त्यांचे प्रचारकार्य कळसाला नेले त्यांचे शिष्य पंडित विष्णु दिगंबर पलुस्करांनी. संगीताची पेठ त्यांनी आम लोकांना खुली केली. आपल्या गांधर्व महाविद्यालयाचा प्रसार त्यांनी ' आसेतु हिमाचल ' केला. प्रचंड संप्रदाय निर्माण करण्याकरिता आयुष्यातली पन्नास वर्षे सतत परिश्रम केले.

पंडित विष्णु दिगंबरांचा संगीतप्रचार धडाक्याने चालू असतानाच संगीतशास्त्राचे पायाशुद्ध उत्खनन करण्याची प्रेरणा ज्या आणखी एका सुशिक्षित विद्वान गृहस्थांना झाली त्यांचे नांव पंडित विष्णु नारायण भातखंडे, बी.ए., एल्.एल्.बी. भातखंड्यांसारख्या विचारवंत आणि बुद्धिमान गृहस्थांनी हा खटाटोप केला म्हणून संगीतशास्त्राचा उगम आणि

विकास कळला. इतरांना ते शक्य नव्हते. इतर हे गुरूसेवा करून विद्या मिळविणारे, गुरूंनी घालून दिलेल्या मर्यादा पाळणारे आणि परंपरेला जराही न दुखविणारे भाविक होते; पण भातखंड्यांचे तसे नव्हते. ते अंधश्रद्धांना जुमानणारे नव्हते. 'बाप दाखव, नाही तर श्राद्ध कर!' असा सडेतोड सवाल करण्याइतकी धमक त्यांच्या अंगात होती. ते वकील होते. त्यांची प्रभावळ फार मोठी होती. महान महान लोकांचे त्यांना पाठबळ होते. त्यांना कुणीही नकार देऊ शकत नव्हते, फसवूही शकत नव्हते. त्यामुळे भातखंडे अलिबाबाच्या गुहेत बेधडक शिरले. त्या गुहेच्या दरवाजाचा मंत्र त्यांना माहीत होता. त्यांच्याजवळ अनेक गुरूकिल्ल्या होत्या. विद्या चोरून ठेवणारे अनेक मी मी म्हणणारे गवय्येही त्यांच्याजवळ मोकळे झाले. त्यांनी आपल्याजवळची 'कोठी' त्यांना खुली करून दाखविली.

भातखंड्यांनी शास्त्रीय संगीताच्या संशोधनाचा ध्यास घेतला त्याची कारणेही तशीच होती. अकबर बादशहाच्या अमदानीपासून तो नंतरच्या सर्व मुगल सम्राटांच्या कारकीर्दीपर्यंत संगीताच्या दुनियेला भरभराटी आली खरी, पण हेही खरे की संगीतकला ही केवळ राजे-महाराजे यांच्या नाटकशाळेतील खाजगी दौलत झाली होती आणि राजदरबाराच्या उंबरठ्यावर ती अटकून पडली. राजसत्तेच्या किंवा धर्मसत्तेच्या लहरीवर संगीतकलेला नाचावे लागत होते. सामान्य जनसंपर्कापासून ती कित्येक योजने दूर होती. त्यांतून परंपरायुक्त अंध-श्रद्धा इतकी बळकट होती की संगीताचा कोश समजला जाणारा एखादा गायक थोडीशी विद्या देणे किंवा तिच्यातील कांही इंगिते सांगणे ही गोष्टच निषिद्ध मानीत होता. राजाश्रय म्हणजेच सारसर्वस्व, अन्य बाबी खोट्या आहेत या कल्पनेवर शतकानुशतके शिक्कामोर्तब झाले होते. संगीत सोडून इतर कसलेही शिक्षण वा संस्कार नसल्याने बाह्य जगातील सामाजिक चालीरीतींशी त्यांचा काडीमात्र संपर्क नव्हता. तो असण्या-

नसण्याची फिकीरही नव्हती. रुढीप्रियतेत त्यांना आनंद होता. आपले खानदान प्राणापलीकडे संभाळणारे हे गायक-वादक दिल्लीपद-पातशाहीच्या आसपासच्या शेष संस्थानांत उत्तरेतच ठाण मांडून बसलेले होते. कळपातून चुकावा तसा एखादा नशेत चुकलेला गायक दख्खन देशात आला की महाराष्ट्रातले कलासक्त लोक त्याच्यावरून जीव ओवाळून टाकीत. असे गायक-वादक जे सांगतील ते प्रमाण होते. त्यावर आक्षेप घेण्याची कुणाची ताकद नव्हती. पण अशी ताकद असलेला आणि खरे कोणते आणि नकली कोणते हे निकषाला लावणारा असा जो एक थोर चिकित्सक महाराष्ट्रात जन्माला आला त्याचे नांव पं. विष्णु नारायण भातखंडे.

भातखंड्यांचा जन्म १० ऑगस्ट १८६० रोजी गोकुळ अष्टमीच्या दिवशी झाला. पंडित पलुस्करांपेक्षा हे बारा वर्षांनी वडील होते. मुंबईतील वाळ्केश्वर येथे राहणाऱ्या या उच्च वर्णीय गृहस्थाघरची सर्व माणसे सुदैवाने संगीतप्रेमी होती. प्राथमिक विद्यालयात असताना विद्यालयातील विशेष समारंभांत गुरूजन आणि इतर प्रतिष्ठितांना आपल्या गोड आवाजाने मोहित करून अनेक वेळा पुरस्कार मिळविणाऱ्या या मुलात ईश्वरी देणगीचा एक फार मोठा अंश आहे हे त्याच्या पालकांनी जाणले होते. समाजातील उत्सवाप्रित्यर्थ होणारी नाटके, छोटी छोटी संमेलने अशा प्रसंगोपात सार्वजनिक कार्यक्रमांत विष्णुपंत भाग घेऊ लागले व त्यांचा गळा हा विशेष कौतुकाचा विषय झाला. ते बांसरीही उपजत चांगली वाजवीत असत.


या दैवी देणग्यांचा विकास व्हावयाला थोडेसे शिक्षण दिले तर ते अधिक चांगले होईल म्हणून पालकांनी विष्णुपंतांचे कॉलेजचे शिक्षण चालू असतानाच पंडित वल्लभदास नांवाच्या संगीत शिक्षकाकडे सतारीचे शिक्षण घ्यायला अनुमती दिली. काही काल पंडित वल्लभदासांकडे प्राथमिक शिक्षण झाल्यावर विशेष गोडी लागून

पंडित गोपालगिर जयराजगिर यांच्याकडे ते शिकू लागले. या नादातच आपल्या कॉलेज शिक्षणातील प्रगतीकडेही विष्णुपंतांचे कटाक्षाने लक्ष असे.

वयाच्या पंचविसाव्या वर्षी ते बी.ए. झाले व एल्फिन्स्टन स्कूलमध्ये शिक्षक म्हणून राहिले. संगीताचा व्यासंग या काळात तात्पुरता सुटल्यासारखा झाला; कारण राहिलेल्या वेळात अभ्यास करून त्यांनी पुढील दोन वर्षांत एल्.एल्.बी. ची परीक्षा दिली व त्यानंतर सनद घेऊन ते वकिलीही करू लागले.

त्या काळात 'गायन उत्तेजक मंडळी' या नांवाची एक संस्था मुंबईतील प्रतिष्ठित पारशी समाज चालवीत असे. संगीतप्रेमी व धनाढ्य अशा पारशी लोकांचा या संस्थेला फार मोठा आश्रय होता. भारतातील श्रेष्ठ गायक-वादकांना बोलावून त्यांचे कार्यक्रम या संस्थेतर्फे सादर केले जात असत. या संस्थेचा सभासद असणे हे देखील त्या काळात प्रतिष्ठितपणाचे समजले जाई. भातखंड्यांना या संस्थेचे सभासदत्व मिळवावयाला वेळ लागला नाही. सभासद झाले त्या दिवसापासून नियमितपणे ते कार्यक्रम ऐकू लागले.

कॉलेजातील शिक्षण चालू असताना थोडेसे सतारीचे शिक्षण घेतलेले असल्यामुळे त्यांना स्वरज्ञान चांगले झाले होते. ठराविक साच्याचे गाणेही त्यांना समजत होते; परंतु 'मंडळांत' ज्या थोर थोर कलावंतांच्या गायन-वादनाचे कार्यक्रम त्यांना ऐकायला मिळाले ते आकलन होण्याइतके संगीताचे ज्ञान त्यांच्यापाशी नव्हते. त्या काळातले ते कलावंत थोर होते. आपल्या विद्येला ते प्राणापलीकडे जपत असत. पण एखाद्या त्रयस्थाने कुतूहल म्हणून चौकसबुद्धी दाखविली, काही गोष्टीबाबत स्पष्टीकरण विचारले तर सांगत नसत. ते चिजेचे शब्ददेखील तोंडातल्या तोंडात म्हणत असत. एखादा श्रोता ज्ञानजिज्ञासेने विशेष लक्षपूर्वक ऐकतो असे त्यांच्या



पं. विष्णु नारायण भातखंडे

घ्यानी आल्यास ते ताबडतोब पवित्रा बदलीत असत. एखाद्या मांत्रिकाने आपली मंत्रविद्या गुप्त ठेवावी तशी ते ठेवायचा प्रयत्न करीत. त्यांच्यात अनेक घराणी होती. अनेक वाद होते. एकाची संगती दुसऱ्याला लागत नव्हती. एकाचा कायदा दुसरा मानीत नव्हता. अनेक मतभेदांचे ते एक जाळे होते.

भातखंडे सुशिक्षित आणि वकील. त्यांना ही असली कृपणवृत्ती कशी सहन व्हावी? त्यांच्यांतला बाल्यावस्थेतला संगीतांकुर हळुहळू फोफावू लागला. वकिलीचा व्यवसाय चालू असतानाच त्यांनी जुन्या पिढीतील त्या काळातील विख्यात ध्रुपदिये रावजीबुवा बेलबागकर यांच्याकडे ध्रुपद-धमाराचे शिक्षण घ्यायला सुरुवात केली. विष्णुपंतांची ज्ञानजिज्ञासा इतकी वाढली की हे शिक्षण अपुरे वाटल्याने घरंदाज ध्रुपद गायक अलिहुसेन व विलायतहुसेन यांच्याकडेही ते शिक्षण घेऊ लागले. अर्थातच अशा बुद्धिमान रसिक वकिलाला गायन उत्तेजक मंडळातील चालकांनी आपल्यात सामावून न घेणे हे चुकीचे किंवा अव्यवहारीही ठरले असते. त्यांनी विष्णुपंतांना मंडळातील चालकत्व तर बहाल केलेच पण शिवाय मंडळात कार्यक्रम ठरविणे आणि घडवून आणणे हीही गोष्ट त्यांच्यावरच सोपविली. कलावंत उत्तम कोणता आणि सामान्य कोणता याची माहिती विष्णुपंतांना याच कालात अनायासे मिळाली. शिवाय कार्यक्रम देणे न देणे सर्वथा त्यांच्याच हाती असल्याने काही घरंदाज कलावंत त्यांना मुजरा करू लागले, त्यांना हवी ती माहितीही सांगू लागले. ही मिळालेली माहिती विष्णुपंतांनी वाऱ्यावर सोडून दिली नाही, किंवा राहील लक्षात म्हणून ते बेसावध राहिले नाहीत. जे जे ऐकले ते ते त्यांनी व्यवस्थितपणे नोंदून ठेवले.

जे मिळत होते तेवढ्याच भांडवलावर भातखंड्यांना थांबायचे नव्हते. संगीतातील घराणी म्हणजे काय? त्यांचा उगम कोठून झाला? गायनविद्या ही या घराण्यांची मक्तेदारी आहे किंवा काय?

'गौडार', 'खंडार', 'नोहार', 'डागुर' अशा ज्या चार 'वानी' आहेत त्या वानींचा अर्थ काय ? प्रत्येक घराण्याचे गायक 'हिंदुस्थानी संगीत' ही आपल्या घराण्याची संपत्ती आहे असे सांगत व या हिंदुस्थानी संगीताचे मूळ--अज्ञानाने—जेथून त्यांचे पूर्वज आले त्या काबूल, कंदाहार, इराण व अरबस्थानापर्यंत पोहोचवीत. म्हणजे नांव 'हिंदुस्थानी संगीत' आणि त्याचा उगम मात्र हिंदुस्थाना-पलीकडे हे समीकरण जमायचे कसे? याचा तपास करायलाच पाहिजे, असे विचार भातखंड्यांना सतावू लागले. विचार करता करता या विषयात ते इतके गर्क झाले की त्यांना आपला वकिलीचा व्यवसाय सुचेना; नित्याचे व्यवहार सुचेनात; जेवणही रुचेनासे झाले. त्यांच्या वृत्ती संगीतमय झाल्या; आणि एके दिवशी वीणावादिनी सरस्वतीदेवीच्या प्रेरणेने या गृहस्थाने आपले बाकी सर्व व्यवहार सोडून देऊन संगीतशास्त्राच्या अथांग सागरात खोल खोल बुडी मारली.

प्रथम 'गायन उत्तेजक मंडळीत' जे थोर थोर गायक-वादक येत त्यांच्याशी त्यांनी वादग्रस्त चर्चा केली. एखाद्या रागाचा निर्माता कोण, हा राग कुठून आला, कोणत्या घराण्याला तो लागू आहे, त्या घराण्याने तो कसा मिळविला याची छाननी ते करू लागले; पण त्यांना समाधान-कारक उत्तरे मिळेनात. जे कलावंत गायन उत्तेजक मंडळात येत ते आपल्या कलेचे प्रदर्शन उत्कृष्टपणे करू शकत होते. परंतु आपण काय करतो याची शास्त्रशुद्ध मीमांसा ते करू शकत नव्हते. भात-खंड्यांचे समाधान तत्कालीन कुणीही विद्यमान कलावंत करू शकत नव्हता. त्यांना एकच मार्ग होता तो म्हणजे संगीतावरील जुन्या ग्रंथांचे संशोधन करणे; मुंबईतच राहून किंवा येथील ग्रंथसंग्रहालयांतील ग्रंथ वाचून हे कार्य पुरे होणारे नव्हते. इतर भारतीय भाषांतील संगीतावरील वाङ्मयाचे परिशीलन होणेही जरूरीचे होते. त्यासाठी

हिंदी, गुजराती, तामीळ, तेलगु व बंगाली भाषांचा अभ्यास भातखंड्यांनी केला. या कार्यासाठी त्याना एक दोन नव्हे तर तब्बल पंधरा वर्षांचा काल घालवावा लागला. मुंबईतच झालेल्या काही संशोधनावर आपल्या 'गायक उत्तेजक मंडळाच्या' सभासदांसमोर संगीतातील काही थक्क करून सोडणाऱ्या गोष्टींवर प्रात्यक्षिकांसह त्यांची बरीच व्याख्याने झाली.

उपरीनिर्दिष्ट ज्या भाषांचा त्यांनी अभ्यास केला, त्या भाषांतील ग्रंथांत संगीतावरील चर्चा कितपत सत्य आहे हे पाहण्याकरिता त्या त्या प्रांतात जाऊन तिथल्या विद्वानांशी चर्चा करणे आवश्यक होते. भातखंड्यांनी निश्चय केला व सर्व तयारीनिशी ते प्रवासाला निघाले. प्रथम ते दक्षिण भारतात गेले. मद्रास, तंजावर, मदुरा, रामेश्वर, त्रिवेंद्रम, त्रिचनापल्ली, बंगलोर आदी शहरांतील ग्रंथसंग्रहालयांतील ग्रंथांचे संशोधन करीत असताना तेथील पंडितांच्या गाठीभेटी घेऊन हिंदुस्थानी संगीत पद्धतीवर चर्चा केली. आपल्याबरोबर त्यांनी अनेक स्मरणवह्याही ठेवलेल्या होत्या. त्यांत ते सर्व माहितीची रीतसर नोंद करीत.

दक्षिणेतून परत येऊन त्यांनी गुजरातचा प्रवास केला. सुरत, भडोच, नवसारी, बडोदा, अहमदाबाद, जामनगर, जुनागड आदी शहरांतील ग्रंथालयांतील जुने ग्रंथ मिळवून त्यांचे संशोधन करून व यानंतर हैदराबाद येथीलही ग्रंथ अवलोकून ते उत्तर हिंदुस्थानात गेले. अलाहाबाद, वाराणशी, गया, मथुरा आदी बारा क्षेत्रांतील महापंडितांच्या त्यांनी भेटी घेतल्या व अशा प्रकारे संगीतशास्त्राच्या परिशीलनासाठी सगळा हिंदुस्थान पालथा घातला. बिकानेर येथील ग्रंथसंग्रहालयात संगीतशास्त्रावरील अत्यंत दुर्मिळ असे कांही अमोलिक ग्रंथ त्यांना मिळाले.

या सर्व खटाटोपातून भातखंड्यांनी एकच सार काढले, ते असे की 'भारतीय संगीत' हे भारतीय आहे. त्याचा उगम अरबस्तानात वा इराणात नाही किंवा ती एखाद्या घराण्याचीही मालमत्ता नव्हे.

परदेशीयांचा त्यावर कोणताही हक्क नाही. असे शेकडो संस्कृत ग्रंथ आहेत की त्यांत प्रचारातील किंवा अप्रचारित अशा प्रत्येक रागाची शास्त्रशुद्ध अशी छाननी केलेली आहे. भरत, अभिनवगुप्त, विशाखिल, शार्दुल, विष्णुधर्मोत्तर, राहुल, नंदिन, मतंग, कीर्तिधर, देवराज, ज्ञानदेव, सोमभूपाल, शार्ङ्गदेव, जायन, सोमराजदेव, अशोकमल्ल, रामानंद, नागमल्ल प्रभृती—ज्यांनी संगीतातील प्रत्येक अवयवावर मीमांसा केलेली आहे असे कित्येक महान ग्रंथकार आहेत.

श्रुती, स्वर, राग, आलाप, स्थान, तान, सरगम, गीत, गायकी म्हणजे काय, नायकी म्हणजे काय, तालीम कशी ध्यावी, विद्या कशी ध्यावी इत्यादी सर्व विषयांवरील बारीक विश्लेषण या ग्रंथांत केलेले भातखंड्यांना सापडले. भातखंडे थक्क झाले. आजवरच्या सर्व परिश्रमांचे चीज झाले यामुळे ते कृतकृत्य झाले. त्या कित्येक दुर्मिळ ग्रंथांच्या दर्शनाने त्यांना मनस्वी आनंद झाला.

ग्रंथसंशोधनानंतर ते उत्तर हिंदुस्थानातील घराणेदार गवय्यां-वजवय्यांची भेट घेऊन चिकित्सा करू लागले. एकच राग त्यांनी अनेकांकडून ऐकला आणि त्यावर प्रसंगोपात चर्चा करून वेगवेगळे संस्कार व फरक लक्षात घेतले. यानंतर बुजुर्गांनी निरनिराळ्या रागांत जे कवित्व करून ठेवलेले आहे त्याचे संशोधन करण्याकडे ते वळले. हे सारे कवित्व लिपिबद्ध नसल्याकारणाने शेकडो वर्षांच्या देवाण-घेवाणीमुळे ते बरेचसे अपभ्रंशित झालेले होते. एकाची अस्ताई एक होती तर अंतरा वेगळाच होता. अस्ताईत गणेशाचे वर्णन होते तर अंतऱ्यात श्रीकृष्णाचे वर्णन होते. भातखंड्यांनी त्या त्या घराण्याच्या वारसाकडे चर्चा करून त्या चिजा तपासून घेतल्या. चिजा मिळविण्यात त्यांना बरेच कष्ट पडले; पण ज्या संस्थानाच्या आश्रयाला हे गवयी होते त्या संस्थानाधिपतींच्याच सहाय्याने हे सारे संधान त्यांना बांधावे लागले.

'मनरंग' घराण्याचे एक महान गायक उस्ताद महम्मद अलीखाँ व त्यांचे दोन पुत्र आषक अली व महमद अली यांची व भातखंड्यांची ओळख झाली व स्नेह जमून आल्याने या खानदानी उदार गायकांनी वेगवेगळ्या रागांतील तीनशे दुर्मिळ अस्ताई, अंतरे व द्रुतलयींतील चिजा भातखंड्यांना दिल्या व कित्येक अनवट रागही भातखंड्यांना सांगितले —ज्यांचा संदर्भ त्या जुन्या संस्कृत ग्रंथांत असूनही भातखंड्याना ते समजले नव्हते. अशा रीतीने एक प्रचंड प्रदक्षिणा आटोपून, कठीण परिश्रम करून विष्णुपंत परत आले व या सर्व खटाटोपांची फलश्रुती म्हणून १९१० साली त्यांनी 'श्रीमाल लक्ष संगीतम्' या नांवाने संस्कृत भाषेत एक ग्रंथ लिहिला. पण या ग्रंथाचा उपयोग बहुजन-समाजास होण्यासारखा नसल्याने, ताबडतोब 'हिंदुस्थानी संगीत पद्धति' या नांवाने आपल्या विशाल संगीत यात्रेच्या इतिहासाचे चार भागांत मराठीकरण त्यांनी केले. १९३२ पर्यंत हे चारही भाग छापून प्रसिद्ध झाले. पहिला संस्कृत ग्रंथ 'चतुर पंडित' या नांवाने लिहिला व दुसरे चार भाग 'विष्णु शर्मा' या टोपण नांवाने प्रसिद्ध केले.

'बिलावल', 'कल्याण', 'काफी', 'खमाज', 'भैरव', 'आसावरी', 'भैरवी' इत्यादी दहा थाट त्यांनी शोधून काढले व या दहा थाटांपासून उत्पन्न झालेल्या सलग रागरागिण्यांचे वर्गीकरण करून, देशभर फिरून त्यांनी जे अस्ताई-अंतरे, मध्य-द्रुत लयींतील चिजा गोळा केल्या होत्या, त्या स्वरतालासहित लिपिबद्ध करून 'हिंदुस्थानी संगीत पद्धतीची क्रमिक पुस्तकमालिका' या नांवाने सहा भागांत प्रसिद्ध केली. पुढेही ती क्रमशः प्रसिद्ध होणार होती; पण शरीर दुबळे झाले आणि त्यांच्या संकल्पाप्रमाणे हे महान कार्य पुरे होऊ शकले नाही.

अजून आणखी संशोधन त्यांना करायचे होते. अनेक गोष्टींवर प्रकाश पाडायचा होता; पण आता अशा संशोधनासाठी भ्रमंती करण्यापेक्षा किंवा एकेकट्या कलावंताला भेटण्यापेक्षा, देशातील सर्व

थोर कलावंतांना एकाच ठिकाणीं आणून संगीत संमेलने भरविण्याची कल्पना त्यांच्या डोक्यात आली व हा विचार पक्का होताच शरीराच्या दुबळ्या अवस्थेत पुन्हा अविश्रांत मेहनत घेऊन त्यांनी १९१६ साली बडोदा नरेश श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या अध्यक्षते-खाली एक अखिल भारतीय संगीत परिषद भरविली. या संगीत परिषदेला भारतातील नामांकित गायक-वादक हजर राहिले होते. अशी परिषद तोपर्यंत तरी कधी झालेली नव्हती असा निर्वाळा तज्ज्ञांनी दिला. पंडित भातखंड्यांना या कामी परिश्रम खूप झाले ; पण असीम सफलता मिळाली. संगीतासाठी एक पद्धतशीर शिक्षणपद्धती अंमलात आलीच पाहिजे हे या परिषदेत सर्वांना पटले. श्री. सयाजीराव महा-राजांनी तर आपल्या संस्थानातच प्रथम अशी शिक्षणसंस्था निर्माण करण्यासंबंधी भातखंड्यांना वाटेल ती मदत द्यावयाचे आश्वासन दिले व पुढे ती निर्माणही झाली.

बडोद्याप्रमाणेच ग्वाल्हेरचे महाराजा माधवराव शिंदे यांनी भातखंडे यांना बोलावून ग्वाल्हेरलाही अशी संस्था असावी अशी इच्छा प्रदर्शित केली. भातखंड्यांनी तिथे काही दिवस राहून संस्था स्थापन करून दिली व तिचा पद्धतशीर शिक्षणक्रम सुरू केला. ग्वाल्हेरची ही संस्था ‘ माधव म्यूझिक कॉलेज ’ या नांवाने प्रसिद्ध झाली. श्रीमंत सयाजी-रावांचे भातखंड्यांवर फार प्रेम होते. त्यांच्या कर्तृत्वाबद्दल त्यांना आदर होता. ते आपल्याबरोबर त्यांना विश्रांतीसाठी उटकमंडला घेऊन गेले. तिथे त्यांच्या व भातखंड्यांच्या संगीतावर बऱ्याच चर्चा झाल्या. गुण-ग्राही सयाजीरावांनी भातखंड्यांनी केलेल्या कार्याची खूप प्रशंसा केली.

पहिल्या संगीत परिषदेत यश मिळाल्यानंतर भातखंड्यांनी थोड्याच कालावधीनंतर दिल्ली येथे दुसरे संगीत संमेलन भरविले. यानंतर तिसरे बनारस येथे व चौथे लखनौ येथे अशी चार अत्यंत यशस्वी संमेलने त्यांनी भरविली. रायपूरचे नृत्य-गायन कलानिधी नबाबसाहेब, रायराजेश्वर

राय उमानाथ, उत्तर प्रदेशचे गव्हर्नर सर विलियम मॉरिस प्रभृतींनी पंडित भातखंड्यांना या कार्यात सर्वतोपरी मदत केली. या सर्वांच्या सहकार्याने संगीतशास्त्राचा क्रमिक आणि पद्धतशीर असा अभ्यास करता यावा म्हणून १९२६ साली 'मॉरिस कॉलेज ऑफ हिंदुस्थानी म्युझिक' या संगीताच्या पहिल्या विश्वविद्यालयाची स्थापना झाली व या पहिल्या विश्वविद्यालयाला सरकारने तत्काळ मान्यता दिली. भातखंडे तिथे पहिली दोन वर्षे मार्गदर्शनाकरिता राहिले होते.

संस्कृत, मराठी व इंग्रजी या भाषांत भातखंड्यांनी संगीताचीच चर्चा करणारी अशी बरीच पुस्तके लिहिली. 'अभिनव राग मंजिरी' गीतमालिकेचे दोन भाग, 'लक्षण गीत संग्रह' (तीन भाग), 'स्वर-मालिका' (दोन भाग), 'क्रमिक पुस्तक मालिका' (सहा भाग), 'स्वरमेळ कलानिधि' (संस्कृत), 'संगीत-पारिजात', 'राग विबोध' (मराठी व संस्कृत), 'ताल लक्षणम्', 'राग लक्षणम्', 'चत्वारिंशद-शत-राग निरूपणम्', 'अभिनव ताल मंजिरी', 'सद्राग चंद्रोदय', 'रागचंद्रिका', 'चतुर्दंडी प्रकाशिका', 'संगीत दर्पण' इत्यादी ग्रंथांतून त्यांनी संगीताचे सर्वांगीण विवरण केलेले आहे. आतांपर्यंतच्या गेल्या शंभर-दीडशे वर्षांत तरी कोणत्याही संगीतकाराने केवळ संगीतावर एवढी मोठी ग्रंथरचना केलेली नाही. परंतु भात-खंड्यांच्या सर्व ग्रंथांत क्रमिक पुस्तक मालिकेचे सहा भाग ही महान कामगिरी होय. गेली ४४ वर्षे हजारो संगीतप्रेमी विद्यार्थ्यांना त्या पुस्तकांचा फार मोठा उपयोग झाला. त्या पुस्तकांच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. आता तर ती दुर्मिळही होऊ लागलेली आहेत. या पुस्तकांच्या पाचव्या व सहाव्या भागांत सर्व दहा थाटांतील अनेक अप्रसिद्ध रागांची माहिती, त्यांची लक्षण गीते, अस्ताई-अंतरे, द्रुत लयींतील अनेक चिजा यांचा संग्रह आहे.

रामपूरच्या नबाबसाहेबांकडे वझीरअली खाँसाहेब या नांवाचे एक

मातबर वीनकार होते. तानसेन घराण्यातील अनेक दुर्मिळ चिजा द्यावयाचे त्यांनी भातखंड्यांना कबूल केले होते. परंतु हे कार्य पुरे व्हावयाच्या आतच वझीरअली खाँसाहेब पैगंबरवासी झाले व क्रमिक पुस्तकमालिका एका अनन्यसाधारण ग्रंथाला मुकली. सदारंग, अदारंग, मनरंग, दरसपिया, रंगीले, प्रेमपिया व अलीकडील प्राणपिया, सबरंग यांच्या वजनदार अस्ताई-अंतऱ्यांतील गीतांप्रमाणेच भातखंड्यांनीही 'चतुर' या नांवाने कित्येक गीते रचलेली आहेत व गायकांच्या गेल्या दोन पिढ्या त्या चिजा अत्यंत आवडीने गातात. संगीत विद्यालयांतूनही त्या शिकविण्याची परंपरा आहे.

असे हे अद्वितीय, अत्यंत गुंतागुतीचे व लोकोपयोगी कार्य करता करता पंडित भातखंड्यांच्या वयाची ७३ वर्षे उलटली आणि एकाएकी त्यांचे शरीर रोगग्रस्त झाले. पुढच्या दोन वर्षांतच संगीत सृष्टीतील या थोर संशोधकाला १९ सप्टेंबर १९३६ रोजी गणेश चतुर्थीच्या दिवशी देवाघरचे बोलावणे आले. संगीतातील एक महान पर्व त्या दिवशी संपले. भातखंड्यांच्या नंतर एवढा मोठा संगीत शास्त्राचे उत्खनन करणारा, भारतीय संगीताचा शोध घेणारा, अस्मिता बाळगणारा आणि त्यासाठी उभे आयुष्य पणाला लावणारा सत्पुरुष झाला नाही.

जसा स्वदेशाचा तसाच स्वभाषेचा त्यांना जाज्वल्य अभिमान होता. संगीतकला ही हिंदी लोकांची स्वत:ची कला. तिचा विकास त्यांनीच केला पाहिजे, त्यासाठी त्यांना परक्यांचे दास्यत्व पत्करावे लागता कामा नये अशी भातखंड्यांची निष्ठा होती. 'निदान शास्त्र तरी आपल्या हाती राहावे म्हणून मी हा खटाटोप केला!' असे ते म्हणायचे. एकदा एका गृहस्थाने भातखंड्यांना त्यांनी लिहिलेले संगीतविषयक ग्रंथ इंग्रजी भाषेतही लिहावयाचा आग्रह केला. त्यावर विष्णुपंत म्हणाले, "इंग्लिश लोक आपली शास्त्रे मराठीत लिहितील का? अहो, ज्यांना हिंदुस्थानी संगीताबद्दल प्रेम असेल व

मी काय लिहिले आहे हे समजून घ्यायची उत्कट इच्छा असेल त्यांनी मराठी भाषा शिकावी व मी लिहिलेले मराठी ग्रंथ वाचावेत!"

"संगीताच्या जाणकारांनी संगीतशास्त्राचा सखोल अभ्यास करावा. आपल्या पूर्वजांनी काय काय करून ठेवलेले आहे याची जाणीव त्यांना अवश्य पाहिजे. शास्त्रनियम सांगू लागले तर निदान इतर लोक त्यांना वचकून तरी वागतील आणि पंडित म्हणून मान देतील. एरवी आपल्या नशिबी दास्यत्व आहेच!", असेही उद्‌गार ते काढीत असत. खुद्द भातखंड्यांचा शिष्यसंप्रदाय फार मोठा नाही. त्यांनी खास तालीम दिलेल्या तीनच शिष्यांची नांवे ऐकिवात आहेत. पैकी हयात शिष्य फक्त श्रीकृष्ण नारायण रातंजनकर हे आहेत. हे संगीतातील एक अधिकारी पुरुष म्हणून ओळखले जातात.

भातखंड्यांच्या मित्रमंडळीत पंडित मदनमोहन मालवीयजींसारखे थोर लोक होते. बनारस हिंदु विद्यापीठातील संगीत विषयाचे परीक्षक म्हणून मालवीयजींच्या आग्रहावरून त्यांनी काम केले होते. पुण्याच्या महिला विद्यापीठात संगीत हा विषय त्यांनीच सुरू करून दिला आणि मुंबई विद्यापीठाच्या विद्यमाने महापालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालयांतील संगीत शिक्षकांना काही वर्षे विनामूल्य शिक्षण देऊन तयार केले. भातखंड्यांनी अशा संगीत शिक्षकांसाठी सुलभ शालेय पुस्तके तयार करून ती महापालिकेकडे विनामूल्य दिली. महापालिकेने ती छापलेली आहेत.

पंडित विष्णु नारायण भातखंडे यांच्या जीवनकार्याचे चार भाग कल्पिता येतील. मुसलमानी कारकीर्दीत उन्नत झालेल्या संगीताचे त्यांनी नवीन शास्त्र बनविले हा एक; भारतीय संगीताला मध्यंतरीच्या काळात मनमानी वळण मिळून त्याचे स्वरूप अशुद्ध झाल्याने त्याचे संशोधन करून मूळ शास्त्राचा आधार घेऊन त्याला शुद्ध केले हा

दुसरा; पाच संगीत परिषदा भरवून एक पद्धतशीर अभ्यासक्रम व्हावा म्हणून संगीताच्या विश्वविद्यालयाची स्थापना करून त्याला स्थैर्य प्राप्त करून दिले हा तिसरा; आणि संगीतातील दहा थाटांचे परिशीलन करून, त्याचे योग्य विभाग करून त्याची नियमबद्ध अशी प्रणाली तयार केली व हिंदुस्थानी संगीत पद्धतीच्या क्रमिक पुस्तकांचे सहा भाग निर्माण केले, त्यात जवळ जवळ १८१ रागांचे विवरण असून स्वरलिपीसहित किमान १८७५ चिजांचा साठा आहे. हे त्यांचे चवथे महान कार्य. चालू तसेच कित्येक भावी पिढ्या पं. भातखंड्यांच्या या कार्याबद्दल ऋणाईत राहतील; किंबहुना या कार्यामुळे पंडित भातखंडे अमर झालेले आहेत.

● ● ●

# पंडित भास्करबुवा बखले

केवळ महाराष्ट्रातलीच नव्हे तर उत्तर हिंदुस्थानातली गायनप्रेमी आणि घराणेदार जाणती गवयी मंडळी भास्करबुवासंबंधी विनम्रभावाने बोलतात. हे लोक आजच्या काळातल्या गायकांना कौतुक म्हणून ऐकतात, जणू संगीतातल्या दिव्यत्वाचा साक्षात्कार त्यांना झालेला असतो. आता राहिलेली असतात ती कर्तव्ये. आजचे संगीत ऐकताना त्यांच्या दृष्टीसमोर सदैव गत स्मृती तरळत असतात. मैफल संपल्यावर एक दीर्घ निःश्वास सोडून ते म्हणतात—" अच्छे अच्छे गवय्ये सुने भाई! मगर भास्करबुवाने जो सुनाया उसका जवाब नहीं!"

मग त्यातला एक जण बोलू लागतो. त्याचे बोलणेही असे जिवंत की नुसते ऐकत रहावे. एक एक आठवण साकार होत जाते. जणू ती आताच दृष्टीसमोर घडत आहे असा भास होतो. त्यांच्या रूपाने भास्करबुवाच आमच्याशी बोलत आहेत,

आपला अनुभव सांगत आहेत, इतकेच नव्हे तर मूर्तिमंत गानदेवतेचे आम्हांस दर्शन घडविताहेत......

"की नाही हे ज्याचं त्यालाच! इथे परिश्रमाचं वावड आहे हो!"...... असे कुणालाही न दुखवता नम्रपणे सांगताहेत.

"फार उशीर झाला, आता गेलं पाहिजे!" म्हणून गप्पांच्या अड्ड्यातून हळूच उठताहेत. जरीकाठी रुमाल त्यांनी हातांनी नीट केला, अंगावरचे उपरणे विशिष्ट ठेवणीने ठेवून दिले, बंद गळ्याच्या पारशी फॅशनच्या काळ्या कोटाची बटणे नीट लावली गेली आहेत की नाही ते पाहिले, हातात चांदीच्या मुठीची काठी घेतली, चिरकाल स्मृतीत राहील असे गोड स्मित केले, आणि ती तपस्वी मूर्ती मंद मंद पावले टाकीत दृष्टिआड झाली.

"कपाळावरचा तो उभा लाल गंध त्यांना किती शोभून दिसतो!" असे बैठकीतले कुणीतरी म्हणाले.

भास्करबुवांसंबंधी बोलताना काही घरंदाज कलावंत नुसतेच कोरडे बोलत नाहीत. आसवांच्या साथीने बोलतात. एकदा अफताबे मूसिकी खाँसाहेब फैयाजखाँ कोल्हापूरच्या देवल क्लबमध्ये गवय्यांच्या तसबिरी पहात होते. एक एक चित्र पाहाता पाहाता भास्करबुवांच्या तसबिरी-समोर येऊन ते उभे राहिले. क्षणभर त्यांनी एकटक त्या तसबिरीकडे पाहिले. पाठीमागे त्यांचा शिष्यवर्ग आणि कित्येक चाहते उभे होते. त्यांच्याकडे डबडबलेल्या डोळ्यांनी पाहात ते म्हणाले,

"हिंदुओं में क्या बल्कि मुसलमानों में भी ऐसा गवय्या नहीं हुआ!"

सत्तरी ओलांडलेले व्यासंगी कलावंत लोक तर भास्करबुवांचे नांव निघाले की गहिंवरतात. तेवढ्याच तोलाचा ऐकणारा भेटला तर मग त्यांची भास्करबुवांचे गुण गाणारी रसवंती निर्झरासारखी वाहू लागते, ती थांबत नाही. किती बोलू आणि किती नको असे त्यांना होऊन जाते.

भास्करबुवांसंबंधी मी अमाप ऐकले. त्या ऐकण्यातून निदान माझ्या तरी मनावर असाच परिणाम झालेला आहे की संगीताच्या दुनियेत ते एक अद्वितीय किंबहुना अवतारी पुरुष होऊन गेले. जे करायचे ते त्यांनी संगीतासाठी केले. त्यांनी स्वार्थ पाहिला नाही. संपत्ती जोडून ठेवली नाही. केले फक्त एकच—गुरूभक्ती आणि साधना. संगीतरसात ते बुडून राहिले आणि तो रस त्यांनी आपल्या श्रोत्यांना मोकळ्या मनाने दिला. म्हणूनच माझ्यासारख्याला महाकवी मोरोपंताच्या शब्दांत सांगायचे म्हणजे "वाटे चरित्र त्यांचे काही आपण तरावया गावे." या व्यतिरिक्त दुसरा हेतु नाही.

भास्करबुवा बखल्यांचा जन्म बडोदे संस्थानातील 'कठोर' या एका लहानशा गावात १७ आक्टोबर १८६९ रोजी झाला. घरच्या गरीबीची झळ बाल भास्कराच्या बुद्धिविकासाला लागली, आणि प्राथमिक शालेय शिक्षणानंतर बडोदे येथील संस्कृत पाठशाळेत भास्करला पाठविण्यात आले. इथेदेखील कधी वार लावून तर कधी माधुकरी मागून आपल्या अन्नाची सोय त्याला पहावी लागली. परंतु अशा या दारिद्र्याला देखील छेद देऊन जाणारा आणि चारचौघांत उठून दिसणारा असा एक सद्‌गुणालंकार परमेश्वराने जन्मतःच भास्करच्या कंठात ठेवून दिला होता. भास्करने संस्कृत श्लोकांच्या पठणाला सुरुवात केली रे केली की इतर विद्यार्थी आपले अध्ययन विसरून ते ऐकत राहात. किंबहुना पाठशाळेचे गुरूजी राजारामशास्त्री तिकडून जाताना क्षणभर स्तब्ध होत. पुढे पुढे तर वर्गावर शिकविण्याचे सर्व श्लोक भास्करला बोलावून त्याच्याकडूनच ते वाचून घेऊ लागले. वेगवेगळे श्लोक वेगवेगळ्या रसात म्हणण्याची त्याची हातोटी पाहून त्यांनी पिंगळेबुवा नांवाच्या हरिदासाकडे भास्करची संगीत शिक्षणाची सोय केली.


एकदा शाळेचा वार्षिक समारंभ होता. त्या समारंभाचे अध्यक्ष

बडोदे येथील एक सन्माननीय गृहस्थ श्री. भाटवडेकर हे होते. भास्करने म्हटलेले ईशस्तवन ऐकून भाटवडेकरांना आनंद झाला आणि त्यांनी स्वत: होऊन ' मौलाबक्ष ' याच्या गायनशाळेत भास्कराची सोय केली.

याचवेळी किर्लोस्कर कंपनीला एक बाल स्त्रीपात्राची अत्यंत निकड होती. आण्णासाहेब किर्लोस्करांनी 'रामराज्य-वियोग' लिहायला घेतले होते आणि त्यात कैकयीच्या भूमिकेसाठी त्यांना एक मुलगा हवा होता. भाऊराव कोल्हटकर त्याच कामगिरिवर निघालेही होते. बडोद्याला ते आले असताना त्यांच्या कानावर भास्करच्या गळ्याची तारीफ गेली. भाटवडेकरांनीही त्यांना मुलाला प्रत्यक्ष ऐकविले आणि किर्लोस्कर कंपनीची अडचण चुटकीसारखी सुटली. अण्णासाहेबांना भास्कर पसंत पडला आणि देवल मास्तरांनी त्याला भूमिकेची तालीम दिली. भास्करनेही आपली भूमिका अपेक्षेबाहेर यशस्वी केली. लोकांत मान्यता मिळाली.

एकदा किर्लोस्कर कंपनीचा मुक्काम इंदोरला असताना ख्यातनाम बीनकार उस्ताद बंदे अल्लीखाँ नाटकाला आले होते. भास्करचा आवाज ऐकून ते खूष झाले. नाटक संपल्यावर त्या थोर खानदानी कलावंताला मुजरा करण्यासाठी कंपनीतली लहानथोर माणसे जमा झाली. पण बंदे अल्लीखाँसाहेब बारकाईने एकाच मुलाची चौकशी करीत होते. त्या मुलाचे नांव त्यांना आठवेना आणि भूमिकाही कोणती हे सांगता येईना. शेवटी त्यांनी त्याने म्हटलेले एक गाणेच गुणगुणून दाखविले आणि "ये गाना जिस छोकरेने गाया वो कहाँ है?" अशी चौकशी केली. मग भास्करला बोलाविण्यात आले. खाँसाहेबांना त्याला पाहून आनंद झाला. त्यांना काय वाटले कोण जाणे, म्हणाले, "मी या मुलाला गाणं शिकविणार आहे!"

दुसऱ्या दिवशी स्वखर्चाने त्यांनी 'गंडा' बांधायचे साहित्य आणले. समारंभपूर्वक भास्करला आपला शागीर्द करून घेतले आणि



पं. भास्करबुवा बखले

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र

शिकवायलाही सुरुवात केली. झाले, कंपनीत मत्सराग्नीची पहिली ठिणगी पडली. इतर लोक भास्करचा द्वेष करू लागले व त्यात खुद्द भाऊरावदेखील सामील झाले.

एखादे माणूस नावडते झाले की त्याचा पावलोपावली पाणउतारा करणे, त्याला असह्य करून सोडणे, ही नाटक कंपनीची एक अभिजात पद्धत आहे. भास्करच्या बाबतीत हीच पद्धत अमलात आणली जाऊ लागली. त्याने खाँसाहेबांकडे तालीम घेण्यासाठी जायला निघावे तोच त्याला कसले तरी काम सांगण्यात येऊ लागले. तंबोरा घेऊन रियाजाला म्हणून बसावे तोच भाऊरावांकडून तांतडीचा बोलावण्याचा निरोप यावा. जेवणाच्या पंक्तीला जरा उशिराने यावे तो आचाऱ्याने पाणउतारा करावा. अशी चारी बाजूंनी त्याची कोंडी करायला कंपनीतल्या लोकांनी सुरुवात केली आणि यावर कढी म्हणजे आपला आवाज फुटायच्या बेतात आल्याचीं चिन्हे भास्करला दिसू लागली. अशा वेळी योग्य रियाज करून आवाज वळणावर आणायचा असतो व तसा तो झाला नाही तर आयुष्यभर पश्चात्ताप करायची पाळी येते. भास्करला याची माहिती होती म्हणून त्याने अखंडितपणे तंबोरा घेऊन रियाज करायला सुरूवात केली ; पण दुर्दैव भास्करच्या हात धुवून पाठीस लागले होते.

ज्यांची नायकी मिळावी म्हणून मी मी म्हणणारे गवय्येदेखील वाटेल ते दिव्य करायला तयार असत तो वरदपुरुष—खाँसाहेब बंदेअल्लीखाँ आपण होऊन भास्करला शिकवीत होता. पण याचवेळी कंपनीचा मुक्काम इंदोरहून हलला आणि भास्करचे स्वप्न इथेच भंगले. मात्र त्याने रियाज करणे सोडले नाही. आवाज बोजड झाल्याने नाटकातले त्याचे काम हिरावून घेण्यात आले होते. त्यामुळे इतर हलकी कामे त्याला करावी लागत होती. अशा परिस्थितीत एके दिवशी कळस झाला. रियाजाच्या नादात कंपनीने नेमून दिलेले काम



मराठी ग्रंथ संग्रहालय ठा
१४२०९

तो विसरला आणि बारा वाजता धावत धावत कंपनीत येतो तो भाऊराव जमदग्नीचा अवतार घेऊन त्याचीच वाट पहात असलेले म्हणाले—

" तू आज कामावर का हजर नाहीस ? "

" माझा आवाज फुटायच्या बेतात आला असल्याने मी शक्य तितकी अधिक मेहनत करतो ! "

" आलाय मोठा मेहनत करणारा ! काय दिवे लावणार आहेस ते दिसतेच आहे. मोठा गायनाचार्य होणार आहेस जणू ! ......... जा, तुला आज पंक्तीला बसता येणार नाही."

भास्करला अपरंपार दुःख झाले. ज्या मालकाजवळ आजपर्यंत प्रामाणिकपणाने राबलो त्यांनी माणुसकी सोडून असे वागावे ? उपयोग होता तोपर्यंत राबवून घेतले, आणि आता गरज सरली त्याबरोबर सहानुभूतिशून्य व्हावे ? काय म्हणावे अशा माणसांना ? त्यांच्यातला मानी कलावंत जागा झाला. त्याने फक्त एवढेच उत्तर दिले—

" ठीक आहे. या क्षणापासून तुमच्याकडचे अन्न मी ग्रहण करणार नाही. मी गायनाचार्य होईन किंवा नाही हे आताच तुम्हाला कसं समजणार ? पण एवढं मात्र निश्चित समजा, की भास्करबुवा झाल्याखेरीज मी तुमच्या कंपनीत पुन्हा पाऊल टाकणार नाही."

पाठ फिरवून उपाशी पोटी तो निघून गेला. भाऊरावांना त्याचा तो उद्धटपणा वाटला. त्यांनी चौकशीही केली नाही.

भास्करने थेट बडोदे गाठले. बडोद्यात त्याचे बरेच हितचिंतक होते. त्याची परिस्थिती ऐकून त्यांना फार वाईट वाटले. श्री. भाटवडेकर, श्री. बाळशास्त्री तेलंग यांनी त्याला धीर दिला आणि बडोद्याचे तत्कालीन दरबारगायक खाँसाहेब फैजमहम्मदखाँ यांच्याकडे शिकायची त्याची व्यवस्था केली. श्री. तेलंगांच्या हातात संस्थानचे बरेच अधिकार होते. किंबहुना दरबारच्या आश्रयार्थींची सर्व व्यवस्था त्यांच्याकडेच

होती. त्यामुळे फैजमहम्मदखाँसारखा कर्मठ आणि आपल्या घराण्याखेरीज दुसऱ्याला विद्या न देणाऱ्या कलावंताने तेलंगसाहेबांना भिऊन होकार दिला खरा; पण भूपातल्या एका चिजेखेरीज पुढे कित्येक दिवस ते त्याला काही शिकविनात. उलट गड्यासारखे नित्य राबणे एवढेच काम भास्करच्या नशिबी आले. घर झाडा, कपडे धुवा, मटण आणा, भांडी घासा, सगळा वेळ यातच जाऊ लागला. खाँसाहेब आपल्या पुतण्याला नित्य तालीम द्यायचे, पण नेमक्या याचवेळी भास्करला कुठंतरी लांब कामाला पाठवायला विसरायचे नाहीत. बरे जेवायचे कुठेतरी वार लावून, आणि त्याच-वेळी खाँसाहेबांनी तंबोरा घेऊन बस म्हणून सांगितले तर उंबराच्या फुलासारखी—ती तालीमही बुडायची या भीतीने भास्करला असा कित्येक वेळा उपास घडू लागला. प्रकृतीवर त्याचा विलक्षण परिणाम झाला. एकांतात बसून रडण्यापलीकडे दुसरे काही हाती राहिले नाही.

एके दिवशी तेलंगसाहेब रस्त्यात भेटले. त्यांनी चौकशी केली. भास्करला राहवेना. तेलंगांना घट्ट मिठी मारून तो ओक्साबोक्षी रडू लागला. तेलंगांनी सारी परिस्थिती लक्षात घेतली. भास्करचा हात धरून ते तसेच फैजमहम्मदखाँसाहेबांच्या घरी आले. म्हणाले—"खाँसाहेब मला भास्करचं गाणं ऐकवा." भास्कर गाऊ लागला. त्याला मध्येच थांबवून तेलंग म्हणाले,—"खाँसाहेब सहा महिन्यापूर्वी मी तुमच्याकडे या मुलाला मुद्दाम पाठवला. पण सहा महिन्यांत त्याची काही अंश प्रगती मला दिसत नाही. तुम्ही मला सहा महिन्यांत चांगला तयार करतो असे वचन दिलेत, त्याचा हाच परिणाम काय? तुम्हाला दरबारच्या आश्रयाला ठेवणं किंवा तुम्हांला संस्थानच्या हद्दीबाहेर घालवणं—दोन्ही गोष्टी माझ्या हातात आहेत हे तुम्ही जाणताच आहात. विचार करून निर्णय घ्या!"

खाँसाहेबांना वाईट वाटले. तेलंगसाहेबांची आर्जवे करीत ते म्हणाले, "साहेब झालं ते झालं. आणखी सहा महिन्यांनी तुम्ही याच मुलाला ऐका आणि मग बोला."

फैजमहंमदखाँ म्हणजे मिंडप्रधान गायकीचा बादशहा. त्यांची चीज भरण्याची पद्धत अत्यंत आकर्षक आणि रंगतदार. राग नियम सांभाळणारा असा भरतीदार गवय्या त्या काळात नव्हता. त्यांनी एकदम मनावर घेतले आणि मुक्तमनाने ते भास्करला विद्या देऊ लागले. आधीच कुशाग्रबुद्धीचा, त्यांतून एका ख्यातनाम बीनकाराचा आशीर्वाद लाभलेला भास्कर हौसेने मिळालेले घेऊ लागला. अखंडितपणे मेहनत करू लागला. आणि खाँसाहेबही त्याच्या ग्रहणशक्तीवर खूष झाले. भरभरून देऊ लागले.

गणेशोत्सवाचे दिवस. एका रात्रीची गोष्ट. किर्लोस्कर कंपनी त्यावेळी बडोद्याला आली होती. कंपनीच्या बिऱ्हाडाला लागूनच एका वाड्यात गणपतीसमोर गाणे चालले होते. सुरासुराला दाद घेत गायक अस्ताई भरत होता. भाऊरावांच्या कानांवर ते गाणे पडत होते. ते वजनदार सूर त्यांना स्वस्थ बसू देईनात. त्यांनी डोक्याला रुमाल बांधला, कोट घातला आणि ते तडक त्या शेजारच्या वाड्यात आले. मैफलीतली सगळी माणसे गाण्यात रंगून गेली होती. त्या गाण्यातल्या स्वरांनी भाऊरावांना हळुहळू पुढे खेचून घेतले. गायक तरुण होता; पण वजनदार होता. तशा धुंद स्थितीत भाऊरावांनी न्याहाळून पाहिले. त्यांच्या डोळ्यांवर त्यांचा विश्वास बसेना. 'हा भास्कर तर नव्हे?' भाऊराव बैठकीच्या समोर आले. कुणीतरी त्यांना जागा दिली. ते बसले. मोठमोठ्याने वाहवा देऊ लागले. गाण्यात रंगून गेले. असे गाणे त्यांना कित्येक दिवसांत ऐकायला मिळाले नव्हते. भास्करने पाहिले भाऊराव समोर रंगून गेलेले आहेत. त्याने गाणे थांबविले. भाऊरावांना नमस्कार

केला. भाऊरावांना राहवेना. भरसभेत मोठ्याने म्हणाले, ‘भास्कर केवढा मोठा गवई झालास रे! मला फार आनंद होत आहे. अरे, तुझ्या गाण्याने मला इथे खेचून आणले. केवढे सामर्थ्य हे! तुझ्या म्हणण्या-प्रमाणे तूं बुवा झालास. मीच तुला आजपासून भास्करबुवा म्हणायला सुरुवात करतो. पूर्वी झाले ते सर्व विसरून जा; आणि आम्हाला भेट.”

भास्करच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या. आयुष्याचे सार्थक झाले. प्रतिज्ञेची पूर्ती झाली. गहिंवरून तो म्हणाला, “भाऊराव, या परिस्थितीला तुम्हीच कारणीभूत आहात. तुम्ही त्या दिवशी माझा अपमान केला नसता तर मी तिथेच खितपत पडलो असतो. खरं म्हणजे तुम्ही माझा उद्धार केला. मी तुम्हाला कधीही विसरणार नाही!”

एक दिवस खाँसाहेब फैजमहम्मदखाँ म्हणाले, “भास्कर, माझ्या जवळची बहुतेक विद्या मी तुला दिलेली आहे. तिची जोपासना कर; पण याहून तुला आणखी काही हवे असेल तर खाँसाहेब नत्थनखाँकडे जा. त्यांना माझं नांव सांग. ते तुला प्रेमाने शिकवतील. आता देशभर फिरून मैफली कर. कीर्ती आणि लक्ष्मी दोन्हीही तुला प्राप्त होतील.”

गुरूचा आशीर्वाद घेऊन भास्करबुवा बाहेर पडले. पुढे त्यांनी नत्थनखाँजवळ तालीम घेतली; आणि नत्थनखाँच्या शिफारशीने खाँसाहेब अल्लादियाखाँजवळही शिक्षण घेतले. अशा तीन खानदानी गुरूंजवळ विद्या घेतल्यामुळे त्यांच्या गायनात विविध रंग आले होते.

राग नियम राखून विलंपतीने अत्यंत मोहकपणे चीज सजविणे ही कला त्यांना फैजमहम्मदखाँकडून मिळाली. लयकारी व बोलउपज अंग खाँसाहेब नत्थनखाँकडून मिळाले; व सौंदर्ययुक्त तानेची मुष्किल गुंफण त्यांनी अल्लादियाखाँकडून मिळविली. अशा तीन घराण्यांचे एक अगम्य असे रसायन त्यांनी तयार केले होते. इतकेही करून ते स्वस्थ

बसले नाहीत. इतर गवय्यांजवळ जे जे चांगले दिसले ते ते त्यांनी ग्रहण केले. सर्व गुणी लोकांशी त्यांचे संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे होते.

सबंध भारतवर्षात गाण्याच्या निमित्ताने ते फिरले. त्यांना उदंड कीर्ती मिळाली. गाणे ही आपलीच मिरास आहे, असे मानणारे थोर थोर घरंदाज गायक कोणताही आडपडदा न ठेवता मोकळ्या मनाने त्यांना मानू लागले. त्यांच्या गाण्याला धावून येऊ लागले. कोल्हापूरच्या देवल क्लबातील गोष्ट. तिथे चार दिवसांचा एक संगीतोत्सव होता. खूप गवय्ये-बजवय्ये जमले होते. सभागृहाच्या बाजूच्याच खोलीत भूगंधर्व रहिमतखाँ येऊन तिथल्याच बैठकीवर लांब पाय करून डोळे मिटून पडलेले असत. ते काहीही बोलत नसत. गंभीर चेहरा करून बाहेरचे कार्यक्रम ऐकत असत. दोन दिवस गेले. तिसरा उजाडला. रात्री दहा अकराचा सुमार. नित्याप्रमाणे असेच रहिमतखाँसाहेब लोळत पडलेले होते. एकाएकी त्यांना काही तरी वजनदार असे ऐकू आले. गादी-वरून उठून विवेकानंदासारखे हाताची घडी घालून ते बसले. भोंव-तालच्या लोकांकडे पाहून म्हणाले "कौन गा रहा है जी ?" कुणी तरी उत्तरले, "भास्करबुवा". तो भूगंधर्व लक्षपूर्वक ऐकू लागला. गेले तीन दिवस तो घुमा होता. अस्ताईचा एक वजनदार मुखडा बांधून बुवा ज्यावेळी समेवर आले, त्यावेळी एकदम, "वाहवा!" असे मोठ्याने उद्गारून खाँसाहेब रहिमतखाँ बसल्या जागेवरून एकदम उठले. आपला अस्ताव्यस्त फेटा त्यांनी कसाबसा सावरला, आणि म्हणाले—

"अब गाना शूरु हो गया है। अब मुझे वहाँ महफिल में जाना ही पडेगा!" असे म्हणून ताड ताड पावले टाकीत ते बैठकीच्या समोर येऊन बसले. आणि भास्करबुवांना दाद देऊ लागले.

बुवांच्या आयुष्यात अशा अनेक रसपूर्ण घटना घडल्या. त्या ऐकता ऐकता रात्र संपते ; पण गोष्टी संपत नाहीत. खाँसाहेब अलादियाखाँ

दर वर्षी वसई येथील एका वैद्यांकडे गायचे. त्या वैद्यांनी त्यांना बरे केले होते. मिरजेचे आबासाहेब सांबारे यांच्याकडेही ते असेच गात असत. त्या काळात वसईला दोन दोन तासांच्या अंतराने गाड्या असायच्या. एखाद्या वेळी विस्कळीतपणामुळे तेही निश्चित नसे. एका वर्षीची गोष्ट. खाँसाहेबांनी भास्करला सांगितले, "बेटा भास्कर, तू हे तंबोरे वगैरे घेऊन आधीच्या गाडीने जा ; मी नंतर येतो. तिथं सगळी व्यवस्था ठेव हो!" भास्करबुवा वसईला पोहोचले तेव्हा सर्व श्रोते मंडळी तिथे जमा झालेलीच होती. भास्करबुवांनी सगळी तयारी करून ठेवली आणि ते खाँसाहेबांची वाट पाहू लागले. गंमत अशी झाली की, ज्या गाडीने खाँसाहेब यायचे होते ती गाडी वाहतुकीच्या विस्कळीतपणा-मुळे वेळेवर आलीच नाही आणि ती केव्हा येईल याचा नक्की अंदाज कुणाला लागेना. जमलेले श्रोते तर अधीर झाले होते. सर्व परिस्थिती लक्षात घेऊन, घरच्या यजमानांनी भास्करबुवांना विनंती केली की खाँसाहेबांचे आगमन होईपर्यंत त्यांनी गावे. चांगले चांगले प्रतिष्ठित लोकही भास्करबुवांना गाण्याचा आग्रह करू लागले. बुवा म्हणाले, "ही गोष्ट कदापि शक्य नाही. एरवी मी तुम्हांला वाटेल त्यावेळी गाणं ऐकवलं असतं ; पण खाँसाहेबांच्या स्वभावाची तुम्हाला कल्पना नाही. मी गायलो असे त्यांना कळले तर डोक्यात राख घालून घेतील ; आणि आपण न गाता तावडतोब परत जातील!" यावर यजमानांनी सांगितले की, "त्याची काळजी करू नका. आम्ही त्यांना विनंती करू. आमचं ऐकल्याशिवाय ते रहायचे नाहीत." भास्करबुवा म्हणाले, "अहो तुम्हाला त्यांच्या स्वभावाची कल्पना नाही. त्यांचा स्वभाव मोठा विलक्षण आहे. एकदा का त्यांनी डुख धरला तर जन्मभर मला त्याबद्दल पश्चात्ताप करावा लागेल. तुम्ही मला मागाहून स्वतंत्रपणे बोलवा, तुम्हाला हवा तेव्हा मी येईन, हवा तेवढा वेळ गाईन. पण आज नको. माझ्या गाण्यानं प्रसंग मोठा बिकट येईल. आणि

खाँसाहेबांचं दुर्मिळ गाणं तुम्हाला कधी ऐकायला मिळायचं नाही !" भास्करबुवांनी अगदी कळवळून नाही म्हणून सांगावे आणि यजमानांनीच नव्हे तर तिथल्या सगळ्या श्रोत्यांनी म्हणावे, " तुम्ही खुशाल गा हो; आम्ही त्यांचं पाहून घेऊ !" शेवटी हो ना करता करता अत्यंत नाइलाजाने आणि श्रोत्यांनाही जास्त ताटकळत ठेवणे बरे नव्हे म्हणून भास्करबुवा गायला बसले. पंधरावीस मिनिटे गेली नसतील तोच खाँसाहेब सभागृहाच्या दारात दत्त म्हणून उभे राहिले.

बैठकीवर भास्करबुवांना पाहून त्यांना जे काय वाटायचे ते वाटले. ते लांबूनच म्हणाले, " अच्छा ! भास्कर गा रहा है ? अच्छा ही हो गया। आज हम भास्कर को ही सुनेंगे" असे म्हणून बैठकीसमोर येऊन बसले. भास्करबुवांनी तंबोरे बंद केले, आणि खाली उतरून ते खाँसाहेबांना बैठकीवर बसायची विनंती करू लागले. खाँसाहेब म्हणाले, " वा वा ! असं कसं होईल. अरे, तूं सुद्धा फार मोठा गवय्या आहेस बाबा ! दोन गुरूंचं गाणं तर तुला मिळालंच आहे; आता तिसरा मी आहे, तीन गुरूंकडून गाणं शिकलेला गायक काय लहान सहान असेल ?"

भास्करबुवांना खाँसाहेबांचे ते उपरोधिक बोलणे कळले नाही असे नव्हे, पण त्याकडे दुर्लक्ष करून त्यांनी सर्व परिस्थिती निवेदन केली. आणि हात जोडून पुन्हा पुन्हा ते खाँसाहेबांना बैठकीवर बसण्याबद्दल विनंती करू लागले. यजमानांनी व तिथल्या सर्व प्रतिष्ठित श्रोत्यांनीही सांगून पाहिले; पण खाँसाहेब ऐकेनात. शेवटी भास्करबुवांनी पाय धरले ; पण खाँसाहेबांचे मन वळले नाही. म्हणाले, " बाबा, तुझं गाणं आज मला इतक्या लोकांसमक्ष ऐकायला मिळत आहे हा काय थोडा थोडका लाभ आहे. दोन गवय्यांनी तुला काय दिलं ते तरी पाहू !"

आता मात्र भास्करबुवांना राग आला. वारंवार आपल्या गुरूंचा उद्धार व्हावा, आणि तोही उपरोधिक शब्दांत हे त्यांना खपले नाही.

ते ताडकन उत्तरले, "खाँसाहेब, तुम्हाला माझ्या त्या दोन गुरूंनी काय दिलं हेच ऐकायचं आहे ना ? मग, ऐकाच तर !", असे म्हणून बुवांनी बैठक मंडित केली. प्रथम त्यांनी खाँसाहेबांना वंदन केले, आज्ञा मागितली आणि 'आ'कार लावला.

नत्थनखाँ व फैजमहम्मदखाँ या दोन्ही गुरूंची आलापी आणि नोमतोम यांचा योग्य मेळ घालून त्यांनी प्रथम रागस्वरूप पक्के केले, झुमऱ्याच्या अत्यंत ठाय ठेक्यात ख्यालाला सुरुवात केली. आलाप, मिंड, बेहलावे, स्थाईताना, द्रुतताना, इत्यादी प्रकार थोडी थोडी बढत करून होईपर्यंत एक तास केव्हा लोटला कळले देखील नाही. यानंतर त्यांनी त्याच रागातील ढंगदार अशा द्रुत चिजेला सुरुवात केली. आणि 'गमकीच्या ताना', 'बोलताना' इत्यादी प्रकारांचा नुसता पाऊस पाडला. ती भरतीदार, राजस अस्ताई ऐकून खाँसाहेबांचे डोळे आंसवांनी भरून आले. असा हा पूर्ण झालेला गवय्या आपले शिष्यत्व पत्करतो याचा त्यांना अभिमान वाटला. आनंदाश्रु तसेच वाहू देत ते प्रत्येक गोष्टीला मनःपूत दाद देत होते.

दोन तासांनी एक राग संपला; पण त्याच्यात अखेरपर्यंत जयपूर घराण्याच्या गायकीचा वास आला नाही. केवळ आपल्या पहिल्या गुरूंचे गाणेच भास्करबुवांनी खाँसाहेबांना ऐकविले होते. पहिला राग संपला आणि खाँसाहेबांना आलेला रागही आंसवांच्या सरींबरोबर वाहून गेला. तंबोरे तसेच चालू होते खाँसाहेब म्हणाले "वाहवा ! भास्कर, अरे काय सांगू ! कसे सांगू ! बेटा, तुला हजार गुन्हे माफ आहेत. जे मजजवळ आहे ते तुझ्यासारख्या गुणी शिष्यांचेच आहे. गा, पुढे गा. मला तृप्त होऊ दे !"

आणि मग दुसऱ्या रागात भास्करबुवांनी तिन्ही घराणी एकत्र करून एक आगळाच रंग जमविला. बुवांचे ते गाणे जिद्दीचे होते. परीक्षेचे होते. एका गानभीष्मासमोर प्रसंग होता; परंतु भास्करबुवा

म्हणजे पूर्ण भरलेला घट! तो डचमळणारा नव्हता. त्या दिवशी ज्यांनी त्यांचे गाणे ऐकले ते धन्य! आयुष्यभर त्यांना त्याची आठवण राहिली असेल. गहिवरून त्यांनी ती दुसऱ्याला सांगितली असेल.

गामनखाँ नांवाचे कराचीचे एक गवई होते. आपल्या तीन मुलांना त्यांनी गाणे शिकवून तयार केले होते. ते तिघेही तरुण असल्याने आणि त्यांनी मनापासून रियाज केला असल्याने ते अत्यंत तयारीने आणि जोमाने गात असत; पण त्यांचे गाणे ऐकून त्यांचे वडील त्यांना नेहमीच सांगायचे की, "मुलांनो, तुम्हीं चांगले तयार झालात; मैफलीतही तुम्ही आता चांगले गाता, पण तुम्ही एकदा पंडित भास्करबुवांना ऐका, गाणं कसं गावं हे फक्त त्या पंडिताजवळून शिकावं."

आपला बाप एका हिंदु पंडिताची एवढी तारीफ का करतो, हे त्या तिघांही मुलांना कळत नसे. मी मी म्हणणारे गवय्ये त्यांच्यावर रंग जमवू शकत नव्हते. तेव्हा यःकश्चित एका पंडिताची काय कथा! येईल मोका त्यावेळी आमच्या बापालाही दाखवू आमचा प्रताप, असा विचार ते नेहमी करीत असत. सुदैवाने एकदा भास्करबुवा कराचीला एका मैफलीला आले. ते आल्याचें कळताच गामनखाँ त्यांना मुद्दाम भेटायला गेले. परत आल्यावर ते आपल्या मुलांना म्हणाले, "आज रात्री पंडित भास्करबुवा गाणार आहेत. तुम्ही माझ्याबरोबर चला, त्यांचं गाणं ऐका म्हणजे गाणं कशाला म्हणतात ते तुम्हाला कळेल."

वडिलांचे हे भाषण ऐकून त्या तीन मुलांपैकी मुबारक अल्ली नांवाच्या मुलाला राग आला. त्याने गुपचूपपणे जाऊन मैफलीच्या चालकांना विनंती करून त्याच ठिकाणी बुवांच्या आधी आपले तिघांचे गाणे ठरविले. भास्करबुवांना याची कल्पनाही नव्हती. त्यांना या मुलांच्या गाण्याचे आमंत्रण मात्र मिळाले. ते मुद्दाम गेले. मैफलीत गामनखाँ त्यांच्या जवळच बसले होते. त्या तिन्ही मुलांनी अत्यंत आक्रमक पद्धतीने गाऊन तानांची बरसात केली. अनेक

चमत्कृती केल्या आणि बराच रंग जमविला. त्यांचे गाणे संपल्यावर जरा आतल्या बाजूला जाऊन गामनखाँनी आपल्या मुलांच्या तयारी-विषयी अभिप्राय विचारला. तेव्हा भास्करबुवा म्हणाले, "खाँसाहेब तुम्ही स्वतः चांगले कसबी गायक आहात. त्यामुळे आपल्या मुलांना तुम्ही चांगलीच तालीम दिलेली आहे यांत शंका नाही. आता त्यांना चांगल्या चांगल्या गुणी लोकांनाही ऐकवा. जसजसे ते ऐकत जातील आणि गात राहतील तसतसे त्यांचे गाणे याहून अधिक सुधारेल!"

तिघेही बंधु चोरून हे संभाषण ऐकत होते. त्यांना राग आला आणि हा पंडित आता काय उजेड घालतो याकडे त्यांचे लक्ष लागले. यापुढे काय झाले, ते खुद्द मुबारकअलींनी आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरून काही वर्षांपूर्वी आपल्या मुलाखतीत सांगितले होते. ते म्हणाले होते, "पंडित भास्करबुवांची ती उंच तेजस्वी मूर्ती बैठकीत येऊन बसली आणि तंबोरे वाजू लागताच एक प्रकारचे तेज त्यांच्या मुखावर झळकू लागले. ते जबारदार तंबोरे जसजसे वाजू लागले तसतसा त्यांचा चेहरा प्रफुल्लित होऊ लागला. प्रसन्न मुद्रेने त्यांनी श्रोत्यांवर नजर फिरविली, तेव्हा आमच्यासह सर्व श्रोते एका अज्ञात जादूने भारून गेले. मला तर असं वाटू लागलं की, त्यांच्या चेहऱ्याभोवती एक तेजोवलय फिरते आहे. तंबोऱ्याच्या सुरांत बुवांनी खर्ज मिसळला आणि 'हमीर' रागांतली अस्ताई गायला सुरुवात केली. "सुरझा रही"...........अ हा हा हा! अस्ताईचा मुखडा बांधून निषाद धैवतावरून एक अत्यंत मधुर मिंड घेऊन ते अशा रीतीने आले की आम्हा तिघाही भावांच्या तोंडून नकळत "सुभानअल्ला! ओहो!" असे उद्गार बाहेर पडले. आम्ही वडिलांकडे पाहिले. त्यांचे डोळे पाण्याने भरले होते. त्यांची डोलती मान बुवांच्या घाटदार अस्ताईत विलीन झाली होती." "पंडितजींची स्तुती अब्बाजान का करीत होते हे त्या दिवशी आम्हाला कळले. मागाहून मी

वेड्यासारखा पंडितजींच्या मागून हिंडत होतो आणि वर्षभर त्यांच्या डोक्याला तेल रगडण्यात भूषण मानीत होतो !"

पंडित भास्करबुवा बखले यांना जाऊन आज बेचाळीस वर्षांचा अवधी लोटला. जुने जाणते लोक त्यांच्या आठवणी काढून डोळ्यांच्या भिजलेल्या कडा वारंवार पुसतात तेव्हा ऐकणाऱ्याला देखील गहीवरून येते. वाटते—आम्हाला त्यांना ऐकायचे भाग्य लाभले नाही.

श्रोत्याला व विद्यार्थ्याला बुवांनी कधीही नाही म्हटले नाही. जशी विद्या मिळविली तशीच ती शिष्यांना मोकळेपणाने दिली. कै. ताराबाई शिरोडकर, कै. पित्रे, कै. बागलकोटकरबुवा, मास्तर कृष्णराव, गोविंदराव टेंबे, बालगंधर्व, प्रभृतींना भास्करबुवांकडून तालीम मिळाली. गंधर्व कंपनीच्या 'स्वयंवर', 'विद्याहरण' व 'द्रौपदी' या नाटकांचे संगीत दिग्दर्शन करून शास्त्रीय संगीताचा दरबार त्यांनी मराठी रंगभूमीवर खुलविला. भास्करबुवांनी दिलेल्या चाली अमर झालेल्या आहेत. त्या चालींनी महाराष्ट्रातील लहानथोरांच्या अंत:करणाला शास्त्रीय संगीताने स्पर्श केला.

धारवाडच्या ट्रेनिंग कॉलेजमध्ये बुवांनी काही दिवस संगीताध्यापकाची नोकरी केली तेवढीच. पुन्हा त्यांनी कुणाचीही ताबेदारी पत्करली नाही. 'भारत गायन समाज' ही संस्था त्यांनी स्थापन करून आपले स्मारक ठेवले हे खरे ; पण बुवांच्या पश्चात त्या संस्थेने फारसा संप्रदाय वाढविलेला दिसत नाही. उत्तर हिंदुस्थानात मात्र बुवांनी महाराष्ट्राची मान ताठ ठेवली. तेथील काही संगीत मंडळांत भास्करबुवांनी गायलेल्या रंगतदार रागांची आठवण म्हणून ते राग नव्या गवय्याने त्या बैठकीवर गाऊ नयेत अशी विनंती करण्यात येते असे काहीजण सांगतात. ८ एप्रिल १९२२ रोजी या थोर कलावंताचा अकाली अंत झाला.

● ● ●

# स्वर-साधक खाँसाहेब अब्दुल करीमखाँ

महाराष्ट्र हा राकट आणि कणखर देश. स्वधर्म व स्वदेश यांच्या रक्षणासाठी अनेक संघर्षांना आणि नैसर्गिक संकटांना महाराष्ट्राला सदैव तोंड द्यावे लागले. त्यामुळे रंगेल व विलासी छंदांकडे त्याला कधीच लक्ष देता आले नाही. उत्तर हिंदुस्थानाचे तसे नव्हतें. या देशाचे पंचप्राण अशा पंचनद्यांनी तिथें समृद्धीची खैरात केल्यामुळे व निसर्गाच्या जन्मजात वरदानामुळे तेथील पुष्ट तुष्ट लोकांची वृत्ती रंगेल व विलासी असणे स्वाभाविक होते. उत्तर हिंदुस्थानात गायन-वादन व नृत्य दाही दिशांना भरून राहिले ते याच कारणासाठी; परंतु महाराष्ट्रातील ध्येयवादी लोकांनी उत्तर हिंदुस्थानातून शास्त्रीय संगीत येथे आणून सोडल्यानंतर आणि एकदा त्यात लक्ष घालायचे ठरविल्यानंतर मात्र महाराष्ट्रीय बहुजनसमाज त्यात आकंठ बुडून गेला.

नवल असे की, फारशा धन-कनक

संपन्न नसलेल्या महाराष्ट्रात उत्तरेकडून जे घराणेदार गवय्ये येऊन उतरले ते इथेच राहिले. त्यांनी पुन्हा उत्तरेचे तोंड पाहिले नाही. महाराष्ट्रावर त्यांनी अपार प्रेम केले. संगीतात जी चार मुख्य घराणी आहेत त्यांपैकी तीन घराण्यांतील शेवटचे नायक महाराष्ट्राच्या मातीतच चिरनिद्रा घेत आहेत. ग्वाल्हेर घराण्याचे भूगंधर्व रहिमतखाँ, किराना घराण्याचे बंदे अलीखाँ व अब्दुल करीमखाँ, जयपूर घराण्याचे अल्लादियाखाँ, मंजीखाँ यांच्या समाध्या इथेच आहेत. आग्रा घराण्याच्या काही नायकांनीही इथेच देह ठेवलेला आहे.

या सर्वांनी महाराष्ट्रीय जनतेवर एवढे प्रेम का करावे कळत नाही. एक मात्र खरे की, उत्तरेकडे मोहाची अनेक आमिषे असताना महाराष्ट्रियांच्या उदात्त भक्तीप्रेमाला भुलून हे खानदानी नायक इथेच गुंतले. आपल्या जन्मभूमीची देखील त्यांना आठवण झाली नाही. उत्तरेकडील राजेरजवाड्यांकडून त्यांची कदर होत नव्हती असे नाही; पण त्यांना हवी असलेली मन:पुत दाद इथे मिळाली. महाराष्ट्रियांच्या संगीत भक्तीकडे पाहून पाकिस्तानातील पतियाळा घराण्याचे रसिले गायक बडे गुलामअलिखाँ येथील नागरिक झाले. इंदोर घराण्याचे अमीरखाँसाहेब, मैहर घराण्याचे तंतकार, मेरठ व दिल्ली घराण्याचे बजवय्ये, लखनौ घराण्याचे नर्तक हे सारे बऱ्यावाईट परिस्थितीचा अनुभव घेत येथेच राहिलेले आहेत.

ग्वाल्हेर घराण्याची मर्दानी पण बरीचशी कष्टकारक गायकी महाराष्ट्रात रुजली आणि फोफावली. तशी जात्याच कुशाग्र बुद्धीच्या मराठी माणसाचे मन संगीतातील वैविध्याचा शोध घेऊ लागले. मराठी रंगभूमीवरील नवनवीन प्रयोगांनी अभिरुची बरीचशी रुंदावलेली होती. अशा वेळी एका वेगळ्याच ढंगाची, कारुण्याने थबथबलेली व काळजाचा ठाव घेणारी वेधक गायकी घेऊन जो एक गवय्या महाराष्ट्रात उतरला त्याचे नांव खाँसाहेब अब्दुल करीमखाँ.

ग्वाल्हेर घराण्यातील गायकीचे सर्व कायदे त्यांच्या गायकीत होतेच; पण शास्त्राबरोबरच रंजन आणि रसपरिपोष करणारी, भावना आंदोलित ठेवणारी व अंतःकरणाला स्पर्श करणारी ती नवीन गायकी ऐकून महाराष्ट्रीय संगीत रसिकांना एक नवा ठेवा सांपडल्यासारखे झाले. ते त्या नव्या गायकाचे आगत स्वागत करण्यात गर्क झाले व थोड्याच अवधीत त्यांनी त्याला आपल्यांत मिसळून टाकले.

खाँसाहेब अब्दुल करीमखाँ 'किराना' घराण्याचे गायक होत. संगीत क्षेत्रात आज घराणी अनेक आहेत; पण पूर्वी मुख्य अशी घराणी चारच मानली जात. 'ग्वाल्हेर', 'जयपूर', 'आग्रा' व 'किराना'. या चारही नांवांचा अर्थ उघड आहे. जे ग्वाल्हेरचे राहणारे त्यांचे घराणे 'ग्वाल्हेर घराणे' या नांवाने ओळखले जाते. जे आग्र्याचे त्यांच्या घराण्याचे नांव 'आग्रा घराणे' पडले. म्हणजे मुख्य नायक किंवा गायक ज्या प्रांतातला किंवा गावचा असेल त्या प्रांताचे किंवा गावाचे नांव त्यांच्या घराण्याला दिले गेले. अब्दुल करीमखाँ हे कुरुक्षेत्रा-जवळील 'किराना' या गांवचे म्हणून ते किराना घराण्याचे मानले गेले. या चारही घराण्यांपैकी प्रत्येकाला एक स्वतंत्र असा इतिहास आहे. आता अब्दुल करीमखाँसाहेबांच्या घराण्याचेच पहाना—

या घराण्याचे मूळ पुरुष 'नायक धोंडू' व 'नायक भन्नू' पैकी नायक धोंडू यांनी वृंदावनात जाऊन तपस्या केली. भगवान श्रीकृष्णाच्या मंदिरासमोर उभे राहून अत्यंत कारुण्यपूर्ण स्वरात ते मनोभावाने आळवणी करावयाचे, "हे श्रीकृष्णा एक वेळ मला दर्शन दे आणि पावन कर!—" अशा आर्तरवाने श्रीकृष्णाला हाका मारायचे. अखेर भगवंतांनी त्यांना दर्शन देऊन त्यांची इच्छा विचारली त्यावर धोंडू म्हणाले, "परमेश्वरा, मला तुमच्या मुरलीतला मधुर षड्ज द्या. माझ्या कंठात मी तो धारण करीन. आणखी मला काही नको!" भगवंतांनी तथास्तु म्हटले व ते अंतर्धान पावले. परिणाम असा

झाला की नायक धोंडू गाऊ लागले की त्या परिसरातील सर्व गायी, वासरे तिथे येऊन उभी राहात आणि मंत्रमुग्ध होऊन, कान टवकारून धोंडूचे गाणे ऐकत असत. तेव्हापासून 'किराना' घराण्याच्या गायकीला 'गोहरणबानी' असे नांव पडले. अर्थातच अब्दुल करीमखाँसाहेबांच्या घराण्यातील मूळ पुरुष हिंदु होते हे स्पष्ट होते. त्यानंतर केव्हातरी परिस्थितीनुरुप त्यांच्या तिसऱ्या किंवा चौथ्या पिढीतील वंशजांनी धर्मांतर केले असावे.

जसे गायक तसेच तंतकारही या घराण्यात जन्माला आले. जशी पिढी वाढली तसे या घराण्यातील तयार झालेले वारस दिल्लीपासून म्हैसूरपर्यंत कर्तबगारी गाजविण्याच्या निमित्ताने पसरले. जशी नायक धोंडूची संतती तशीच नायक भन्नूचीही संतती होती. नायक धोंडूचे पणतु सदारंगाच्या काळात नांव गाजवीत होते व ते दिल्ली दरबारचेही गायक होते. प्रसिद्ध गायक अब्दुल वहीदखाँ याच घराण्याचे. नायक धोंडू यांच्या याच घराण्यातील कालेखाँ यांच्या तीन चिरंजिवांपैकी अब्दुल करीमखाँ हे जेष्ठ चिरंजीव होत. महाराष्ट्रात किराना घराण्याच्या गायकीचा प्रचार त्यांनीच केला व फार मोठा संप्रदाय निर्माण केला.

एक काळ असा होता की, किराना घराण्याचा मधुर व करुण रसप्रधान गाण्याशिवाय इतर कुठल्याही घराण्याचे गाणे महाराष्ट्रीय संगीत रसिक ऐकायला तयार नव्हता. त्या गाण्याने त्याला मंत्रमुग्ध करून टाकले होते. एखाद्या संस्थेचा वाढदिवस समारंभ असो, शनिवार-रविवारचे 'म्युझिक सर्कलचे' कार्यक्रम असोत, गणेशोत्सवातील गाणी असोत, त्या कार्यक्रमांत जो गायक किंवा गायिका निवडली जाई ती हटकून 'किराना' घराण्याची असायची हे ठरलेले होते. साऱ्या महाराष्ट्रावर या करुणरसप्रधान गायकीने विलक्षण मोहिनी घातली होती. मुंबईतल्या गणशोत्सवात हे विशेष जाणवत



खाँसाहेब अब्दुल करीमखाँ

असे. ज्या गल्लीत या घराण्याच्या गायिकेचे गाणे असे ती गल्ली माणसांनी फुलून जाई आणि इतर ठिकाणच्या कार्यक्रमांत शुकशुकाट असे. भावनेचा जिवंतपणा, सार्थ सुरेल शब्दोच्चार व रसपरिपोष या गुणांमुळे श्रोत्यांचे अंतःकरण हालवून सोडायचे कसब या गायकीत प्रकर्षाने होते. गायकाच्या भावनेशी श्रोता समरस होई; देहभान विसरे.

खाँसाहेब अब्दुल करीमखाँ यांचे गायनाचे शिक्षण त्यांचे वडील कालेखाँ व चुलते अब्दुल्लाखाँ यांच्याकडे झाले. याशिवाय हैदरबख्श या नांवाचे त्यांचे चुलत चुलते नामांकित सारंगिये होऊन गेले. त्यांनी हद्दू-हस्सूखाँ, तानरसखाँ, उमरावखाँ, रहिमतखाँ इत्यादी श्रेष्ठ गवय्यांची साथ करून बरेच ज्ञान मिळविले होते. त्यांच्या-कडूनही बालपणात अब्दुल करीमखाँसाहेबांना पुष्कळ चांगल्या गोष्टी कळल्या असे जाणते लोक सांगतात. वयाच्या सहाव्या वर्षीच खाँसाहेब मैफलीत गायले आणि मी मी म्हणणाऱ्यांना, गायन श्रेष्ठींना त्यांनी थक्क करून सोडले होते. तत्कालिन पद्धतीप्रमाणे रात्रंदिवस रियाज करून अवघ्या पंधराव्या वर्षी ते देशभ्रमण करायला बाहेर पडले. फिरत फिरत ते बडोद्याला आले आणि बडोदा नरेशांनी त्यांचे गाणे ऐकून दरबार गायक म्हणून त्यांची नियुक्ती केली.

दरबार गायक म्हणून नियुक्ती होईपर्यंत खाँसाहेबांचे गाणे हे इतर भरतीदार गवय्यांसारखेच खुल्या आवाजाचे सणसणीत गाणे होते; परंतु बडोद्यात जमलेल्या एका मोठ्या मैफलीत ग्वाल्हेर घराण्याचे ख्यातनाम गायक भूगंधर्व रहिमतखाँ यांना ऐकल्यानंतर त्यांच्या मनावर विलक्षण परिणाम झाला. रहिमतखाँचे ते भूगंधर्व या पदवीला सार्थ करणारे, भावना हालवून सोडणारे शुद्ध स्वरेल गाणे ऐकून त्यांनी त्यांना मनहीमन आपल्या स्वरसाधनेतील गुरू मानले आणि स्वरसाधना करण्यास प्रारंभ केला. या स्वरसाधनेत ते इतके विलीन झाले, की बाराही सूर

वीन वाजल्यासारखे गळ्यात उतरावेत यासाठी त्यांनी अफाट मेहनत केली. त्यांचे मुळचे पाणीदार मोठे डोळे स्वरांचा शोध घेण्यात किलकिले झाले. त्यांची सारी इंद्रिये स्वरलीन झाली. आणि या तपस्येतून एक नवीन गायकी निर्माण झाली.

बडोदा सरकारकडे फक्त तीनच वर्षे नोकरी करून अब्दुल करीमखाँसाहेब १८९८ च्या सुमारास महाराष्ट्रात आले. ते जसे बुद्धीने कुशाग्र तसेच बरेचसे भाविकही होते. 'पीर ख्वाजा शमना मिराचा दर्गा' महाराष्ट्रात मिरजेला आहे हे खाँसाहेबांना माहीत होते. खाँसाहेब व त्यांचे सर्व घराणे पिढ्यान पिढ्या 'ख्वाजा चिस्तियां' घराण्याचे भक्त होते. मिरजेच्या दर्ग्याचे दर्शन घेण्याकरिता ते मिरजेला आले आणि एकाएकी त्यांना प्लेगाने पछाडले. आजार वाढत चालला तशी सर्वांनाच काळजी वाटू लागली. इतक्यात सायंकाळच्या वेळी एका फकिराने ललकार दिली आणि आजारी खाँसाहेबांना पाहून तो म्हणाला—"फिक्र मत करो। अच्छा हो जायगा। लेकिन ख्वाजा शमना मिराके दर्गा में जाकर हाजरी दो।" त्या फकिराची आज्ञा प्रमाण मानून खाँसाहेब तशाच ग्लानीच्या अवस्थेत दर्ग्यात गेले आणि गाणे गाऊन सेवा करू लागले. आश्चर्य असे, की थोड्याच वेळात त्यांना तरतरी वाटून बरे वाटू लागले व एकदोन दिवसात त्या साथीच्या रोगापासूनही ते बरे झाले.

त्या दिवसापासून आपल्या त्या श्रद्धास्थानाला त्यानी कधीही सोडले नाही. पहिल्यापहिल्याने ते फक्त वार्षिक 'उरुसाला' हजर राहायचे. शेकडो गोरगरिबांना, फकिरांना त्यांच्याकडून अन्नदान होत असे. देशाच्या कुठल्याही कोपऱ्यात असले तरी आपली महत्त्वाची कामे वा जलसे सोडूनही ते त्या उत्सवाला हजर रहायचे. पुण्याला त्यांनी 'आर्य संगीत विद्यालय' नांवाचे संगीताचे सर्वांगिण शिक्षण देणारे विद्यालय काढले. आणि त्याची दुसरी शाखा मुंबईला काढली. त्या काळात आताच्या सारखे संगीत विद्यालयाला विद्यार्थी मिळत नसत. जे मिळत

ते परिस्थितीने अडलेनडलेले असत. अशा विद्यार्थ्यांचा सर्व खर्च 'आर्य संगीत विद्यालय' चालवी. उत्पन्नाची तूट भरून काढायला गावोगावच्या थिएटरात तिकिटे लावून जलसे करून ते उत्पन्न खाँसाहेब विद्यालयाला देत. अशा रीतीने सात वर्षेपर्यंत खाँसाहेबांनी नग धरला ; पण प्रकृतीअस्वास्थ्यामुळे अगदीच निरुपाय झाला. तेव्हा या दोन्ही विद्यालयांचा व्याप सोडून ते मिरजेला जाऊन राहिले आणि अखेर-पर्यंत मिरज हेच त्यांनी आपले वसतीस्थान ठरविले. खाँसाहेबांनी स्थापिलेली दोन्ही विद्यालये त्यांचे शिष्य चालवीत असून ती आता चांगल्या स्थितीत चालू आहेत.

राजाश्रय सोडून लोकाश्रयाला येऊन राहिलेल्या कोणत्याही कलावंताच्या अंगात तसे विशिष्ट गुण असल्याशिवाय बहुजनसमाजात त्याला स्थान मिळणे ही गोष्ट अतिशय कठीण आहे. खाँसाहेबांचे महाराष्ट्रात आगमन झाले त्यावेळी अनेक खानदानी गवय्यांनी इथे आपला चांगलाच जम बसविलेला होता. ज्याने त्याने आपले विश्व निर्माण केले होते. होतकरू माणूस तिथे आकर्षिला गेला होता. क्वचित अभिमानीही झाला होता; परंतु खाँसाहेब जे गाणे घेऊन आले ते गाणेच असे विलक्षण आणि वेगळे होते, की त्या सहजमधुर, रंजक व काळजाला स्पर्श करणाऱ्या गाण्याने लोहचुंबकासारखे लोकांना आपल्याकडे आकर्षित केले.

सद्‌गुण झगझगीत असला की त्याच प्रमाणात शत्रूही निर्माण होतात. खाँसाहेबांना मिळू लागलेले घवघवीत यश इथे स्थायिक झालेल्या अन्य गवयांना सहन झाले नाही. असुयेने ते जळू लागले. त्यांच्या गाण्यात खाँसाहेबांचा रंग नसल्यामुळे त्याबाबतीत ते त्यांचा पाणउतारा करायची संधी शोधू लागले ; पण तशी संधी त्यांना सांपडेना तेव्हा त्यांनी लगेच दुसरी आघाडी उघडली आणि आपल्या चाहत्यांकडून निंदेचा मारा करायला सुरुवात केली.

'खाँसाहेबांचे घराणे हे खानदानी गवय्याचे घराणे नसून ते तंतकाराचे घराणे आहे व हे गाणे बनावटी आहे', अशी नाचक्की त्यांनी आरंभिली. आणि खाँहेबांच्या घराण्यात बीनकार, सारंगीये कर्तृत्व गाजवून गेलेले असल्याने संगीत प्रांतात वावरणाऱ्यांना हा प्रचार पटणे फारसे अवघड गेले नाही; पण मुठभर मत्सरी लोकांचे विश्व सोडले तर संगीत षौकीन समाजाने या गोष्टीला दाद दिली नाही. ते दाद देत राहिले खाँसाहेबांच्या गोड मुलायम सुरांना. त्या सूरसागरात त्यांनी डुबी घेतली होती. बाहेरच्या वादळाची त्यांना यत्किंचितही जाणीव नव्हती. ज्यांच्या लवचिक स्वरेल गळ्याला ती गायकी पेलू शकली त्यांनी त्यांनी बिनदिक्कत त्या गायकीचा स्वीकार केला; 'किराना' घराण्याचा विस्तार होऊ लागला. 'तया महापुरुषाकारणे धुंडित येती' या संतवचना-प्रमाणे दूरदूरचे संगीतप्रेमी विद्यार्थी मिरजेकडे धांव घेऊ लागले. सेवा-भावाने विद्या मिळवू लागले.

खाँसाहेबांचा आशीर्वाद ज्या विद्यार्थ्यांना लाभला आणि त्या आशीर्वादाच्या बळावर ज्यांनी ज्यांनी हिंदुस्थानभर कीर्ती गाजविली आणि किराना घराण्याचे नांव राखले त्यांत श्री. रामभाऊ कुंदगोळकर उर्फ सवाई गंधर्व, सुरेशबाबू माने, बाळकृष्णबुवा कपिलेश्वरी आणि त्यांचे बंधु, बेहेरेबुवा, विश्वनाथबुवा जाधव, श्रीमती रोशनआरा बेगम, शंकरराव सरनाईक, तबलिये बळवंतराव रुकडीकर, तबला नवाज शमसुद्दीनखाँ इत्यादी गायक-वादक आहेत. या खाँसाहेबांच्या शिष्यांनी किराना घराण्याचा संप्रदायही वाढविलेला आहे. या प्रत्येकांचे शिष्य ख्यातनाम आहेत आणि आज देशभर त्यांचाही लौकिक आहे. या घराण्याचे पथिकही अनेक आहेत. त्यांत सौ. हिराबाई बडोदेकर, सौ. सरस्वती राणे, सौ. माणिक वर्मा इत्यादी गायिका अतिशय लोकप्रिय आहेत. सवाई गंधर्वांचे शिष्य भीमसेन जोशी आज किराना घराण्याची ध्वजा उंच उभारून आहेत. गंगूबाईही किराणा घराण्याचेच गाणे गातात.

सुरेशबाबू मान्यांचे शिष्यशिष्यिणी अनेक आहेत. त्यांत प्रभा अत्रे, माणिक वर्मा यांनी बराच लौकिक कमावला. कपिलेश्वरीबुवांचे शिष्य कै. यशवंतराय पुरोहित व फिरोज दस्तुर प्रसिद्ध आहेत.

आपल्या शिष्यांना खाँसाहेबांनी मुक्त मनाने विद्या दिली. 'आपणासारखे' केले. "गानविद्या ही कुणाची खाजगी मालमत्ता नाही. जो करील त्याची आहे. ती घेण्याची ज्याची पात्रता असेल त्याला ती निस्पृहपणे दिली पाहिजे! अहो, शिष्यांमुळे गुरू जिवंत राहातो. पुढे येतो." असे खाँसाहेब अल्लादिया नेहमी सांगत असत. अब्दुल करीमखाँसाहेबांनी या दोन्ही गोष्टी केल्या. त्यांनी शिष्यांना विद्या दिली, मैफलीत कसे गावे हे शिकविले आणि आपले नांव अमर केले. भारतात गवय्यांची आणखी अशी काही घराणी शिष्यरूपाने जिवंत आहेत की त्यांतले मूळ पुरुष गेले आणि त्या घराण्याच्या गायकीचा मात्र त्यांच्या शिष्यांनी विचका करून ठेवला; परंतु 'किराना' घराण्याच्या गायकांचे तसे नाही. ते आपल्या घराण्याच्या गायकीशी एकनिष्ठ राहिले आणि म्हणूनच आज त्यांच्या—महाराष्ट्रातील—तिसऱ्या पिढीतील गायकही मैफलीत बडबड केल्याशिवाय रंग जमवू शकतात.

अब्दुल करीमखाँसाहेब जलतरंग, तबला, वीन, सारंगी इत्यादी वाद्येही उत्तम वाजवीत. गाण्याप्रमाणे त्यांच्या वीनवादनाचीही एक ध्वनिमुद्रिका आहे. जलशांसाठी सबंध भारतातून त्यांना आमंत्रणे येत. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत त्यांची अखंड भ्रमंती असे. जसे उत्तरेकडे तसेच दक्षिणेकडेही ते अतिशय लोकप्रिय होते. दाक्षिणात्य संगीतातील जे काही राग उत्तर भारतीय संगीताशी एकरूप होतात ते त्यांनी आत्मसात करून त्याचा प्रचार धूमधडाक्याने केला. (उदा० 'अभोगी') हे कार्य करणारे खाँसाहेब हे या कालातील पहिले गायक असावेत. स्वरसाधना त्यांनी आयुष्यभर अखंडितपणे केली. मुख्य स्वर आणि त्या स्वराच्या आसपासचे सूक्ष्म स्वर-श्रुति शोधण्यात ते गुंग होऊन गेले

होते. स्वरावर त्यांनी इतका तावा मिळविला होता की, गळ्याने तंबोऱ्यावर षड्ज लावून नंतर तो तंबोरा गवसणीत घालून ठेवून देऊन, त्यानंतर नुसताच तंबोऱ्याशिवाय स्वर लावून तो तितकाच जवारदार व गंधारयुक्त स्वरेल ते लावीत असत. त्यांच्या स्वरज्ञानाची दुसरी किमया सांगण्यासारखी आहे. एक तंबोरा ते स्वरात लावीत आणि गवसणीत बंद करून ठेवून देत. त्यानंतर बराच वेळ जाऊ देऊन ते दुसरा तंबोरा लावीत आणि गवसणीत ठेवलेला तंबोरा काढून तो वाजवायला लावीत. आश्चर्य असे की दोन्ही तंबोरे किंचितही फरक न दाखविता एका स्वरात वाजत असत.

बावीसही श्रुती ते आपल्या गळ्यातून लावून दाखवीत असत. श्री. देवल व क्लेमंट साहेबांच्या 'फिल हार्मोनिक सोसायटी' चे ते सभासद असल्याने त्यांच्या सहकार्याने आधी त्यांनी अनेक प्रयोग करून, मागाहून जाहीररीत्या त्यांची प्रात्यक्षिकेही केली होती. स्वराचा आत्मा शोधण्यात आणि त्याचा साक्षात्कार घडावा म्हणून जन्मभर त्या स्वराभोवती त्यांनी पिंगा घातला, आणि स्वरसिद्धी प्राप्त करून घेतली. श्रुतिसंशोधनाच्या या वेडाबद्दल शिष्ट समाजात त्यांची उपेक्षा बरीच झाली. उघड उघड त्यांची नालस्ती होऊ लागली; पण खाँसाहेबांनी त्यांना दाद दिली नाही. त्यांनी आपले संशोधन चालूच ठेवले. "भाई, हलवाईसे बैर करो; उनकी बनायी हुई मिठाई से क्यूं करते हो?" असा शांत सवाल ते करीत असत.

ललत, आसावरी, जोगिया, तोडी, मुलतानी, दरबारी कानडा, श्री, पूरिया, मारवा, पिलू, खमाज, मांड इत्यादी राग-रागिण्या ते अप्रतिम गात असत. रागदारीप्रमाणे इतर गायनपद्धतीही त्यांनी वर्ज्य मानल्या नाहीत. ठुमऱ्या, दादरे, भावगीते आणि मराठी रंगभूमीवरील गाजलेली पदे देखील ते मोठ्या प्रेमाने गात असत. या सर्व गायनपद्धतीच्या त्यांच्या उत्कृष्ट आणि अत्यंत लोकप्रिय ध्वनिमुद्रिका डझनांनी आहेत. संगीत

प्रांतात अनेक वादळे आली आणि गेली; पण खाँसाहेबांच्या या ध्वनिमुद्रिकांची लोकप्रियता किंचितही कमी झालेली नाही.

असेच जलशांसाठी आणि श्रुतिदर्शनाच्या प्रयोगांसाठी देशभर फिरत असतांना उत्तरेचा व कलकत्ता-हैदराबादचा दौरा आटोपून ते मद्रासला आले. मद्रासला त्यांचे बरेच जलसे झाले. तिथे योगी अरविंदांना त्यांचे गाणे ऐकण्याची इच्छा झाली व खाँसाहेबांनीही तावडतोव रुकार कळवून ते पांडिचेरीला जायला निघाले. वाटेत त्यांची प्रकृती बिघडू लागली. रात्री ११ वाजता ते पुढे जाण्याऐवजी 'सिंगापेरुमल कोइलम्' स्टेशनवर उतरले. त्यांनी काही फेऱ्या घातल्या आणि लगेच हातपाय धुवून ते स्थानकावरच नमाज पढू लागले. नमाज पढल्यानंतरही त्यांची अस्वस्थता अधिकाधिक वाढू लागली. त्यांना काय वाटले कोण जाणे पण प्रभुनाम घेऊन 'दरबारी कानड्याची' अलापी त्यांनी एकसारखी चालू ठेवली. थोड्या वेळाने ते तिथेच झोपी गेले. आणि पुन्हा कधीही उठले नाहीत. एका अत्यंत सुरेल, लोंचदार, चिवट गायकीच्या नायकाचा अंत झाला. तो दिवस २७ आक्टोबर १९३७ हा होता. तिथून त्यांचे शव मिरजेला आणण्यात आले आणि ख्वाजा मिरा-साहेबांच्या दरग्याशेजारीच त्यांचे दफन झाले.

काही दिवसांपूर्वी जुन्या पिढीतील गवय्यांबद्दल आदराने बोलताना आग्रा घराण्याचे सुप्रसिद्ध गायक श्री. अझमत हुसेनखाँ म्हणाले— "अब्दुल करीमखाँसाहेबांची आठवण झाली की त्यांनी माझ्या मनावर जबरदस्त परिणाम करून ठेवलेले तीन राग मला आठवतात. मुंबईतील 'फॉर्बस हॉल' मधील 'पूरिया', 'जहांगीर हॉल' मधील 'तोडी' आणि बेळगांवच्या मैफलीत गायलेला 'मालकंस'—ओहो होहो; असा पूरिया, अशी तोडी आणि असा मालकंस अजून ऐकलेला नाही. 'सूरोंका सन्नाटा ऐसा मालूम होता था, कि मानो सब जगह पूरिया ही पूरिया भरा हो!' सुरांचा लगाव असा होता, की इतरांनी बरोबरी करूच

नये. बिलंपतीच्या स्वरांशी त्यांनी जीवनभर गुंजन केले. त्यांची अस्ताई रात्र संपून उषःप्रभा हळूहळू फाकते तशी फाके आणि संपूर्ण अस्ताई प्रकाशमान होत असे. तोडी, पूरिया, मुलतानी, जौनपुरी, आसावरी, दरबारी कानडा, शुद्धकल्याण इत्यादी प्रचलित रागच ते गायचे; पण बिलंपत अशी करावयाचे, की शहाण्या माणसाने मैफलीत त्याच्यानंतर कधीही गायला बसू नये!"

अझमत हुसेनखाँसारख्या चोखंदळ गायकाचे हे उद्‌गार मी मुद्दाम इथे देत आहे. खाँसाहेबांच्या तनायतीबाबत मात्र खानदानी गवयांत मतभेद होते. त्यांची बिलंपत जशी निर्दोष आणि काळजाला स्पर्श करणारी होती, तशी त्यांची द्रुततान किंवा फिरत निर्दोष होती किंवा काय याबाबतीत अन्य घराण्यांचे एकमत नाही. एवढे बरिक खरे की त्यांच्या स्वर विस्तारात जेवढे राजस सौंदर्य आढळते तेवढे त्यांच्या तानेत आढळत नाही; हे त्यांच्या अनेक ध्वनिमुद्रिका ऐकून पटू लागते; पण तो दोष खाँसाहेबांचा नसावा. कारण या ध्वनि-मुद्रणाच्या वेळी ते श्रुतिविषयक संशोधनात इतके एकजीव झाले होते की बावीस श्रुतींशिवाय आणखी सूक्ष्म स्वर कुठे आढळतात किंवा काय या संशोधनातच ते मग्न होते. तो त्यांचा निदिध्यास होता. अशा वेळी कदाचित् त्यांचे ध्वनिमुद्रण झालेले असल्यास, अनवधान होणे शक्य नाही असे नव्हे. असो!

गाणे हे स्वरांचे काम आहे, भावनेचे काम आहे, वाद्यातला स्वर आणि गळ्यातला स्वर एकरूप झाला पाहिजे. ते आर्जवी असावे, त्यांत भक्तिभाव असावा, त्यातील कारुण्याने श्रोत्यांचे काळीज हालले पाहिजे, गदगदले पाहिजे; श्रोत्याने त्या गाण्यावर प्रेम केले पाहिजे—या सर्व जाणिवा अब्दुल करीमखाँसाहेबांच्या आगमनानंतर सर्व सामान्यात अधिक झाल्या.

जसा महाराष्ट्रात तसाच उत्तर हिंदुस्थानातही 'किराना' घराण्याचा

मोठा संप्रदाय आहे. त्यात गायक आहेत तसेच तंतकारही आहेत. खाँसाहेबांच्या नात्यातले श्री. नियाज अहमदखाँ व फैयाज अहमदखाँ हे गायक बंधु महाराष्ट्रातच वास्तव्य करून राहिलेले आहेत. ते लोकप्रिय असून शिष्यवर्गही तयार करीत आहेत. महाराष्ट्रात ग्वाल्हेर घराण्याच्या खालोखाल किराना घराण्याच्याच संप्रदायाचा क्रमांक लागतो आणि तशी मोजदाद केली तर आज घडीला कदाचित् तो तीन-चतुर्थांश बरोबरीलाही राहील. अब्दुल करीमखाँसाहेबांनी 'किराना' घराणे मिरजेत आणले. आणि किराना ऐवजी 'मिरज' घराणे म्हणावे इतके ते महाराष्ट्रात एकजीव झाले.

● ● ●

# संगीतातील क्रांतिपुरुष गायनाचार्य रामकृष्णबुवा वझे

**गायनाचार्य** रामकृष्णबुवा वझे यांचे व्यक्तिमत्व पैलू पाडलेल्या हिऱ्यासारखे आहे. त्यांच्या जीवनात सोशिकपणाचा कळस दिसतो. असह्य अपमान आणि गुदमरून टाकणारा तेजोभंग ध्येयसिद्धी होईपर्यंत त्यांच्या वाटयाला आला. तरीही नीतीचे प्राणपणाने रक्षण करीत अभिजात संगीतातले शिष्टांना मान्य होईल असे पूर्णत्व त्यांनी मिळविले. बुवांचे कर्तृत्वपूर्ण चरित्र अशा काही विलक्षण घटनांनी भरलेले आहे की ते कितीही वेळा सांगितले तरी पुनःपुन्हा ऐकावेसे वाटते. त्यांच्या आयुष्यातील कित्येक घटना अशा आहेत की त्यांतील प्रत्येक एकेका स्वतंत्र लेखाचा विषय व्हाव्यात. "जिहीं उदंड कष्ट केले। ते भाग्य भोगून गेले॥" अशांपैकी वझेबुवा होते. वझेबुवा म्हणजे उदंड कष्टाचे आगर. टाकीचे घाव सोसून देवत्व पावलेल्या महाराष्ट्रीय थोर पुरुषांच्या मालिकेत वझेबुवांची गणना होते.

एकोणीसशे चाळीस-एकेचाळीसच्या सुमारास वझेबुवांचे गाणे मी ऐकले होते. या दिग्गजाचे गाणे ऐकायला थोर थोर मंडळी समोर बसली होती. 'सखी मुखचंद्र' व 'बोल रे पपहिरा' या दोन चिजा फारच सुंदर रंगल्या होत्या, त्या तेवढ्या अजून आठवतात. त्यावेळी माझे गाण्याचे ज्ञान अत्यंत तुटपुंजे होते, त्यामुळे त्या दिवशीच्या बुवासाहेबांच्या गाण्यातली खरी लज्जत मला चाखता आली नसली तरी समाधान झालेले होते. आपण काहीतरी चिंतनीय व श्रेष्ठ प्रतीचे ऐकले असे सारखे वाटत होते. कृतार्थता वाटत होती.

त्यांचा भरतीदार व उंचउंच आवाज अजून आठवतो. अजून ती मध्यम उंचीची रुबाबदार गुबगुबीत मूर्ती डोळ्यांसमोर येते. गाता गाता थोडेसे मिष्किल पण दुसऱ्याला खदखदा हसायला लावणारे बोलणे—त्यांच्या द्रुतलयीतील रंगतदार चिजेइतकेच—हवेहवेसे वाटे. सुदैवाने अनेक सुंदर सुंदर चिजांच्या त्यांनी ध्वनिमुद्रिका दिल्या असल्याकारणाने त्यांच्या कसदार उन्मेषी गाण्याची थोडीशी कल्पना येते. एक मात्र निश्चित की बुवांचे गाणे घोटीव आणि एकाच सांच्याचे वाटत नाही. त्यात विलक्षण बुद्धिमत्ता आहे. नवीनता आहे. कल्पनेची भरारी आहे. सतेज मार्मिक सौंदर्यदृष्टी आहे.

मधमाशीच्या वृत्तीने बुवांनी ते सारे गोळा केले. ते करताना त्यांना सगळा उत्तर हिंदुस्थान पायी पालथा घालावा लागला. बुवांनी ज्यांच्या-कडून चिजा घेतल्या नाहीत असा एकही गवय्या राहिला नाही आणि त्या मिळवायला जरी त्यांना पर्वताएवढे कष्ट पडले तरी त्यांनी विद्यार्थ्यांना त्या देण्यात कंजूषपणा केला नाही. उदारपणे त्यांनी आपण मिळविलेली विद्या आपल्या शिष्यांना वाटली. जसे ज्ञानभांडार मिळविले तसे ते खुलेही केले. बुवांनी शागिर्दी ग्वाल्हेर घराण्याचीच केली. गायनाचार्य बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, पंडित विष्णु दिगंबर पलुस्कर यांच्याप्रमाणे तेही ग्वाल्हेर घराण्यानच गाणे शिकले; पण त्यांची गायकी मात्र ग्वाल्हेर

घराण्यासारखी सरळ नव्हती, त्यांत विविध रंग होते. अनेक घरंदाज गायकांच्या गायकीतील उत्तम गुण त्यांनी वेचले असल्याकारणाने त्यांची नकळत एक स्वतंत्र पद्धत निर्माण झाली होती. त्यांच्या ध्वनिमुद्रिका ऐकताना त्याची प्रचीती येते. आणि असे बोलउपज अंग आजच्या काळात क्वचित ऐकू येते. अशा या पुरुषार्थी गायनाचार्याला विद्या मिळविताना कोण यातना सोसाव्या लागल्या आणि किती ताप सहन करावे लागले हे लक्षात घेण्यासारखे आहे.

सावंतवाडी संस्थानातील 'ओझरे' हे बुवांचे जन्मग्राम. दहा महिन्यांचे वय असतानाच त्यांचे वडील वारले आणि जेमतेम प्रपंच चालविणारा आधारस्तंभच कोसळल्यामुळे बिचाऱ्या लेकुरवाळ्या माउलीला उद्याच्या तजविजीसाठी गांवातल्या गावात मोलमजुरी करून जगावे लागले. अशी चार वर्षे गावात काढून चार वर्षांच्या रामकृष्णास घेऊन ती माउली 'कागल' येथे आली आणि महिना तीन रुपये पगारावर स्वयंपाकीण म्हणून राहिली. आपल्या पोटच्या आशांकुराचा विकास व्हावा हाच कागल येथे येण्याचा तिचा हेतू होता. रामकृष्ण शिकेल, मोठा होईल आणि आपण चांगले दिवस पाहू अशी स्वप्ने ती मनाशी रंगवीत होती.

सहाव्या वर्षी रामकृष्ण शाळेत जाऊ लागला आणि जेमतेम चौथ्या इयत्तेपर्यंत त्याने कशीबशी मजल मारली; परंतु एके दिवशी शाळेचे मुख्याध्यापक आले आणि त्यांनी—"या मुलाचे शाळेतील शिक्षणाकडे अजिबात लक्ष नाही. हा दिवसभर ताना मारीत असतो. याला तुम्ही गाणे शिकवा; शाळेत याचा मुळीच उपयोग नाही!" अशी खणखणीत तक्रार केली. माउली विचारी काय करणार होती आणि तीन रुपये पगारात ती फाटक्या आभाळाला कुठे कुठे म्हणून ठिगळ लावणार होती?

बळवंतराव पोहोरे हे दरबार गायक त्यावेळी कागल येथे होते.

बाईने त्यांचे पाय धरून मुलाला गाणे शिकविण्याची व्यवस्था केली. दोन वर्षे त्यांच्याकडे शिक्षण मिळविल्यावर बुवा मालवण येथे आले आणि ग्वाल्हेर घराण्यात इचलकरंजीकरांच्याही आधी शिकून आलेल्या विठोबाअण्णा हडपांजवळ गाणे शिकू लागले.

एक वर्ष लोटताच मुलाचा विरह आईला सहन होईना. मुलगा मालवणात व ती कागल येथे असल्याने झाले एवढे संगीताचे शिक्षण खूप झाले अशा कल्पनेने तिने मुलाला परत बोलावले आणि तत्कालिन पद्धतीप्रमाणे मुलाचे अवघ्या बाराव्या वर्षी लग्नही करून टाकले. मुलाच्या बाबतीतले आपले कर्तव्य संपले; सूनमुख पाहून कृतकृत्य झालो असे तिला वाटले; पण बुवांची वृत्ती मात्र पूर्णपणे बदलली. आपण एका स्त्रीचा पती; मातोश्रीने मोलमजुरी करून आपल्याला पोसावे आणि परान्नावर आपला जीव जगावा याची खंत बुवांच्या मनाला लागली. आपण काहीतरी केले पाहिजे, मातोश्रीला दास्यातून सोडविले पाहिजे, तिला व पत्नीला मानाचे जिणे जगू दिले पाहिजे असा ध्यास त्यांच्या मनाला लागला; पण मिसरुडही न फुटलेला हा मुलगा कुठे जाणार होता? काय करणार होता? पदराला एक फुटकी कवडी नसताना संकल्प तरी कोणता करणार होता? एकच उपाय होता, बाहेर पडणे, पायी चालत जाणे........ बुवांनी मनाशी प्रतिज्ञा केली—
"पडेल ते कष्ट करीन, ते करता करता देह पडला तरी हरकत नाही, पण उद्दिष्ट गाठायचेच!"


या भावनेने प्रेरित होऊन एके दिवशी बुवांनी घर सोडले. पायी प्रवास करीत करीत बुवा पुण्यास आले व पुण्याहून त्यांनी मुंबई गांठली. दोन पंडितांनी शिकविलेले गाणे पदराला असल्याने त्या जोरावर मुंबईत काही दिवस काढणे अवघड झाले नाही. दहा बारा रुपयांची पुंजीही पदराला जमा झाली. नानासाहेब पानसे यांचे नांव मुंबईत बुवांनी फार वेळा ऐकले होते. संगीत क्षेत्रातील ती एक अधिकारी व्यक्ती

असून या विषयातील जिज्ञासू विद्यार्थ्यांबद्दलचे नानासाहेबांचे प्रेम पोटच्या पोरापेक्षाही अधिक अशीही माहिती बुवांना मिळाली होती; पण पानसे मुंबईत नसून इंदूर येथे राहातात असे कळले तेव्हा तिथे जाऊन त्यांना गाठावे असा विचार बळावला.

बुवांजवळ थोडीशी पुंजी होतीच. ते थेट इंदूरास गेले आणि नानासाहेब पानशांना गाठून त्यांचे पाय धरून "मला गाणे शिकवा" अशी विनंती केली; पण "तुला पखवाज अगर तबला या दोहोंपैकी एक शिकवीन. गाणे शिकायचे असेल तर ग्वाल्हेरास जा! तिथे चांगले गवई आहेत, ते तुला गाणे शिकवतील", असा नानासाहेबांनी जबाब दिला. पण मुलगा इतक्या दुरून आलेला आहे म्हणून त्यांनी त्याला चार महिने ठेवून घेतला.

नानासाहेब पानशांकडचे हे चार महिने फुकट गेले नाहीत. या अवधीत नानासाहेबांकडे आश्रयाला आलेल्या अनेक थोर थोर कलावंतांचे दर्शन बुवांना होऊन त्यांच्या अभिजात कलेचेही थोडे बहुत श्रवण घडले. संगीतातील तीन महाप्राणांचा किंचित सहवास घडला व तो पुढील मार्गक्रमणाला शुभसूचक ठरला. ख्यातनाम बीनकार बंदेअलीखाँ व त्यांची पत्नी चुन्ना यांच्या दिव्य कलेचा साक्षात्कार इथेच घडला व तानरसखाँ या घराणेदार गवय्याचे गाणेही इथेच ऐकायला मिळाले.

इंदौरहून बुवा पानशांच्या सल्ल्याने उज्जैन येथे आले व नानासाहेब अष्टेकर यांच्याकडे राहिले. अष्टेकर त्यांना घेऊन बनारसला गेले व विष्णुपंत छत्रे यांच्या बिऱ्हाडी उतरले. बुवांना आपल्या परम गुरूंचे पहिले दर्शन इथेच घडले. खाँसाहेब निसार हुसेनखाँ छत्र्यांचा पाहुणचार घेत त्यावेळी सर्कशीच्या बिऱ्हाडीच होते. भूगंधर्व रहिमतखाँ यांचा मुक्कामही सर्कशीतच होता. त्यामुळे इथेही अनेक गुणी लोकांचे गायन-वादन ऐकण्याचा योग बुवांना अनायासे आला. अष्टेकरांनी बुवांची तळमळ छत्र्यांच्या कानावर घातली. छत्र्यांनी निसार



गायनाचार्य रामकृष्णबुवा वझे

हुसेनखाँसाहेबांना विनंती केली आणि निसार हुसेनखाँसाहेबांनी मुलाला शिकविण्याचे कबूल केले.

बुवांना अपार आनंद झाला. वाटले, दैव अनुकूल झाले. आता काय, सुलभतेने विद्या मिळेल. आयुष्याचे ताप लवकर संपले; पण संकटाच्या वादळापूर्वीची ती शांतता होती हे कोवळ्या रामकृष्णाला कळले देखील नाही. एके दिवशी छत्रे, रहिमतखाँ आणि निसार हुसेनखाँ यांच्यासह ते ग्वाल्हेरला आले आणि त्या क्षणापासून त्यांच्या वनवास-पर्वाला सुरुवात झाली.

कडक थंडीच्या-उन्हाच्या निवाऱ्याला अंगावर पुरेसा कपडा नाही. फक्त एक लंगोटी अंगावर. माधुकरी मागून दोन वेळची भूक भागवायची. माधुकरीही पुरेशी मिळाली तर मिळाली, नपेक्षा अन्न-छत्रात वार लावून दिवस कंठावे लागत. तिथे उशिराने पोहोंचले तर तेही मिळत नसे. कधी अर्धपोटी तर कधी पोटभर, कधी घटाघट पाणी पिऊनही बुवांनी दिवस काढले. कडाक्याच्या थंडीत पोटात भुकेची आग उठे ... अशावेळी बुवांना वाटे, उगाच आपण इतक्या दूर आलो. डोळ्यांत आसवांची गर्दी होई. परत जावे असेही वाटे; पण त्याचवेळी दुसऱ्याच्या घरी स्वयंपाक करून कष्ट उपसणारी माउली त्यांच्या डोळ्यां-समोर उभी राही. तिची दास्यातून सोडविण्याची प्रतिज्ञा विजेसारखी तळपत राही तेव्हा पडेल ते कष्ट उपसण्याचे नवे चैतन्य बुवांच्या अंगात संचारे.

बरे, उस्ताद निसार हुसेनखाँ तरी कसे—अत्यंत लहरी वृत्तीचे. एखाद्या वेळी ते शिकवायला बसायचे. मागाहून आठवडेच्या आठवडे नुसती वाट पहात बसावे लागे. गुरूगृहींची कामे मात्र रगड असायची. त्यातून गुरूंच्या आज्ञेने अभक्ष्याला-अपेयालाही स्पर्श करावा लागे; पण ध्येयाकडे दृष्टी ठेवून बुवांनी सर्व काही निमुटपणे केले. त्यावेळी नुसतेच कष्ट नव्हेत, तर मानभंगही बुवांच्या वाट्यास फार आला. ग्वाल्हेरचे काही

कुत्सित स्वभावाचे लोक बुवांना कारणाशिवाय छळीत असत. एक म्हणायचा—"अरे ए, तूं इथं कशाला आलास? तुला गाणं येणं शक्य नाही. तुझा चेहरा चांगला आहे. तूं नाटकात जा!" बुवांना वाईट वाटे. ते म्हणत—"माझी गरिबाची तुम्ही थट्टा करता हे बरे नाही. इथं पन्नास-साठ लोक गाणं शिकतात; पण त्या सर्वांत मीच गाणार हे लक्षात ठेवा!"

कुणी "या तानसेन!" म्हणत, तर कुणी "हा मुलगा वेडा आहे, लंगोटी लावून गावात ताना मारीत फिरतो", असे आपापसात कुजबुजत. पण बुवांनी हे सारे मुकाट्याने सहन केले, ध्येयावर दृष्टी ठेवून. कधीतरी अपेक्षिलेली सुखदशा येईल आणि कष्टांच्या वाळवंटातला आपला हा प्रवास संपेल अशा आशेवर एक एक वर्ष संपत होते; पण असली ही जाचक दशा चालू असतानाच बुवांवर आणखी एक संकट कोसळले. आपला आवाज फुटला आहे याची त्यांना जाणीव झाली. झाले. टवाळखोरांचे अधिकच फावले. 'या तानसेन' ही बिरुदावली कायमची चिकटली. बुवांचा स्वाभिमान जागृत होई; उत्तर द्यावे असेही वाटे; तसे एकदा दिलेही—"तानसेन काही जन्मतःच गायक झालेले नाहीत, तर करणी करे सो नर का नारायण हो जावे!" असे त्यांनी खरमरीत उत्तर दिले. त्यामुळे आपण समजतो तसा मुलगा अगदीच वेडा नाही हे त्या कुत्सित मंडळीस पटायला लागले. आणि रात्रंदिवस मंद्रसाधना करून बुवांनी आपला फुटलेला आवाज जेव्हा जाग्यावर आणला तेव्हा तेच लोक "याने आवाज काढला बुवा!" असे गौरवाचे उद्गार काढू लागले. बुवांची कदर करू लागले.

पाच वर्षे लोटली. बुवांनी विचार केला, पदरी विद्येचा काय लाभ झाला याचा हिशेब करावा. आणि तो केल्यानंतर त्यांना असे आढळून आले, की एकंदर दोनशे साठ आठवड्यांत त्यांना फक्त चारच चिजांची

प्राप्ती झालेली होती व अशा हिशोबाने गवय्या व्हावयाला जन्म पुरणार नव्हता. अशा रीतीने विद्या मिळणे शक्य नाही. त्यासाठी वेगळा मार्ग आचरला पाहिजे हे बुवांच्या मनाने घेतले. स्वत: विद्या शिकून तरबेज होण्याखेरीज आता गत्यंतर नव्हते. तपःश्चर्या करीत इथेच राहाणे म्हणजे सारे उमेदी आयुष्य चिरडले जाण्याचे भय होते. त्यांच्या आधी ग्वाल्हेरात विद्यार्जन केलेल्यांनी अशी साधना केली होती. पण तो काळ वेगळा होता, त्यांची ध्येये वेगळी होती व ती परिस्थितीही पालटली होती. त्यावेळी अस्फूट हुंदक्यांचे मोठे पडसाद उमटत, आणि आंसवे पुसायला हजार हात पुढे येत. पण बुवांना स्वतःचे अश्रू स्वतःच पुसण्याखेरीज गत्यंतर नव्हते. ते गुरूगृहातून बाहेर पडले. नवा गवई दिसला रे दिसला की त्याच्या पाठी राहून, पडेल ती कामे करून, त्याच्या गाण्यात साथीला तंबोऱ्यावर बसून, त्याची साथ करता करता जे मिळेल ते साठवायचा त्यांनी सपाटा चालविला. मधमाशीसारखी वृत्ती ठेवली.

रात्रंदिवस जे मिळेल ते साठवून ठेवण्यात, त्यावर मनन करण्यात व पुढील संचयासाठी शोधन करण्यात बुवा क्षणाक्षणाला झटू लागले. गल्लीगल्लीतून, बोळाबोळातून, कुठे राजपथावर तर कुठे राजगृहात, कुठे झोंपडीत तर कुठे एखाद्या गटारातदेखील उभे राहून नवे स्वरालंकार किंवा गीताचे शब्द ऐकू येतील तसे ते टिपले. त्यांतले नाविन्य तेवढे उचलले, अशा वेळी पिकदाणीतला मुखरस किंवा स्वयंपाक घरातले मांडपाणी, झाडलोट केलेला कचरा इत्यादींनी त्यांना सचैल स्नान घडे; पण बुवा डगमगले नाहीत. त्यांनी आपली साधना चालू ठेवली.

फिरत फिरत ते जयपूरला गेले तिथे त्यांची व ‘मनरंग’ घराण्यातील महम्मद अलीखाँची भेट झाली. जयपुरातील ते एक विद्वान व घरंदाज गायक होते. चिजांचे त्याच्याजवळ विशाल भांडार असल्याने त्यांना गायक वर्गात ‘कोठीवाले’ ही संज्ञा प्राप्त झाली होती. याच महम्मद

अलीखाँसाहेबांनी पंडित भातखंड्यानाही त्यांच्या ग्रंथरचनेत बरीच मदत केली व असंख्य चिजा दिल्या होत्या. या उदार गवय्याने वझेबुवांना आपल्या घराण्याची गायकी व अनेक सुंदर सुंदर चिजा शिकविल्या. चिजा म्हणजे गवय्याचे धन, पंचप्राणाइतकेच त्या चिजांना जपायचे अशी परंपरा. त्यामुळे एखादा स्वर टिपून ठेवताना किंवा चिज लिहिताना आढळणे म्हणजे केवढा मोठा गुन्हा होता. असले हे चौर्य-कर्म म्हणजे खजिन्यावर दरोडा घालण्याइतके मोठे. तसे कुणाच्या नजरेत आले की ताबडतोब चौकशी होई... "अबे लिखनेसे गाना कभी नहीं आ सकता!" असे खणखणीत उद्गार यायचे. प्रसंगी तो शापही वाटे. एखाद्या वेळी जे नवे आढळले त्याच्याबद्दल माहितीघ्यायला जावे तर... "क्या तेरे बाप के हम नौकर हैं? निकल जाय यहां से!" असा कडकडाट होई. बुवांनी मुकाट सारे सहन केले; पण महम्मद अली-खाँसाहेब एक असे भेटले की बुवांचे कुलदैवत यावेळी आपल्या मठीतल्या या बालकावर दयेची दृष्टी ठेवून राहिले; आणि खाँसाहेबांनी बुवांना ते जे मागतील ते दिले.

साठविलेली विद्या घेऊन बुवा ब्ऱ्हाणपुरला आले व तेथील सरदार दादासाहेब भुस्कुटे या धनिक गृहस्थाकडे आश्रयाला राहिले आणि दैवयोग असा विलक्षण की बुवांचे गुरूदैवत खाँसाहेब निसार हुसेनखाँ त्यांना ब्ऱ्हाणपुरात पुन्हा भेटले. गुरूचरणी बुवांनी मस्तक ठेवले आणि आज-पर्यंत मिळविलेली विद्या गुरूचरणी सादर केली. शिष्याची ती कमाई आणि विद्या मिळविण्याकरिता त्याने आतापर्यंत केलेले परिश्रम ऐकता ऐकता ती लहरी गुरूमाउली अत्यानंदित झाली आणि आपल्या कसोटीला उतरलेल्या या शिष्याला पुढच्या दोनच वर्षात त्यानी तीनशे अस्ताई अंत्रे शिकविले व त्याला आशीर्वाद देऊन दिग्विजयार्थ बाहेर जायची परवानगी दिली ज्या निसार हुसेनखाँनी त्यांना पाच वर्षांत चारच चिजा शिकविल्या होत्या त्याच निसार हुसेनखाँनी त्यांना दोन वर्षांत तीनशे

अस्ताई अंत्रे दिले. बुवांवर झालेली ही नियतीची कृपा लक्षात ठेवण्यासारखी आहे.

येथून पुढे बुवांनी देशाटणाला सुरुवात केली. सारा उत्तर हिंदुस्थान बुवा फिरले. अनेक गवय्या-बजवय्यांशी व पंडितांशी त्यांनी मैत्री केली. स्वामी विवेकानंदांबरोबर ते पंधरा दिवस राहिले. त्यांच्या दिव्य मंत्रोपदेशाचा लाभ बुवांना झाला. स्वामीजींचा संगीताचा व्यासंग फार मोठा होता. संगीत विषयातील अधिकारी व्यक्तींत त्यांची गणना होती. संगीत विषयाचे सुलभ रीतीने विवरण करणारे अनेक 'दोहरे' स्वामीजींनी बुवांना सांगितले. बुवांनीही ते टिपून ठेवले. आतापर्यंतच्या भोगलेल्या विपत्तीत या जगद्वंद्य योग्याचा सहवास म्हणजे बुवांच्या आयुष्यांतील अमृतयोगच म्हटला पाहिजे. त्या सहवासाची आठवण म्हणजे जन्मजन्मांतरीच्या पुण्याईचे फळ. संगीत विद्या मिळविताना बुवांचे मन भाजले-पोळले. विद्याव्यासंगाच्या त्या आठवणी अंगावर काटा उभा करणाऱ्या. पण ही एक आठवण अशी की त्याने उभ्या कर्तबगारीला टवटवी आणली. विपरीतातून जन्मलेला तो असामान्य योगायोग. सदैव चेतनामय! स्वामी विवेकानंदाचा आशीर्वाद घेऊन बुवा अधिक पुढे सरकले. ते नेपाळात गेले व नेपाळ दरबारी नोकरीला राहिले.

नेपाळात दरबार गायकाचा मान मिळाल्यावरदेखील बुवांनी आपला संगीत व्यासंग सोडला नाही. लखनौचे घरंदाज गायक इनायत हुसेनखाँसाहेब व वीणावादक सादिक अलीखाँसाहेब दोघेही त्यावेळी नेपाळातच होते. सादिक अलीखाँसाहेब जसे श्रेष्ठ तंतकार होते तसेच उत्कृष्ट गायकही होते. लखनौचे नबाब वजिदअली शहांच्या दरबारातही त्यांनी काही दिवस नोकरी केली होती. सादिक अलीखाँसाहेबांजवळ रंगतदार चिजांचा व असंख्य ठुमऱ्यांचा साठा होता. या दोन्ही उस्तादांकडून बुवांना ढंगदार अस्ताई अंत्रे मिळाले. 'सारंग' रागाचे

अनेक प्रकार, 'कानडा', 'मल्हार', 'तोडी' या रागांतीलही कित्येक प्रकार बुवांनी मिळविले. मल्हारातील रंजक प्रकार आणि अस्ताई अंत्रे वझेबुवांकडूनच ऐकावे असे कित्येक थोर गवई सांगत असत.

अशा प्रकारे अविश्रांत परिश्रम करून, विद्या, लौकिक व अर्थसाधना करून गायनाचार्य रामकृष्णबुवा वझे बारा वर्षांनी आपल्या मायभूमीस परत आले आणि आपल्या कित्येक पिढ्यांचा उद्धार करणाऱ्या या कर्तृत्ववान गुणवान सुपुत्राने जेव्हा जन्मदात्रीच्या चरणावर मस्तक ठेवले तेव्हा त्या माउलीला काय झाले असेल! बारा वर्षेपर्यंत पुत्रवियोगाचे दुःख सहन करीत, चिंता करीत राहिलेली ती आई आणि बारा वर्षांचा विरह सहन करून धैर्याने राहिलेली बुवांची अर्धांगी त्या दोघींचाही आनंद शब्दांपलीकडचा आहे.

आयुष्यातली काही वर्षे वझेबुवा गोमंतकात राहिले. ती त्यांची तात्पुरती कर्मभूमी होती. गोमंतकातल्या प्रतिष्ठित समाजाला गाण्याची गोडी बुवांनी लावली. तिथे अनेक शिष्य-शिष्यिणी त्यांनी तयार केल्या. पं. भास्करबुवा बखल्यांनी शास्त्रीय संगीताची खाण मराठी रंगभूमीवरील नाटकांना चाली देऊन बहुजनसमाजासमोर खुली केली व शास्त्रीय संगीताची रुचीही लोकांत वाढविली. भास्करबुवांच्या नंतर वझेबुवांनी अनेक नाटकांना आपल्या संगीताचा साज चढविला. आपल्याजवळ असलेल्या सुंदर सुंदर चिजांच्या चाली त्यांनी सढळ मनाने नाटकांतील पदांसाठी वापरल्या व ती पदे लोकप्रिय केली. 'ललितकलादर्श' व 'बलवंत संगीत मंडळी' या दोन नाट्य संस्थांच्या अनेक नाटकांचे यशस्वी संगीत दिग्दर्शन बुवांनी केले. त्यांतल्या काही चाली महाराष्ट्रातील संगीतप्रेमी लोकांच्या ओठावर सहज खेळल्या, अमर झाल्या. बुवांनी दिलेल्या चालीत बुद्धिवैभव दिसते. त्यांतील काही अशा आहेत की त्या चांगल्या चांगल्या नटांना पेलत नाहीत; पण ऐकणाऱ्याच्या बुद्धीला चालना देणाऱ्या अशा मात्र त्या आहेत.

व्हायोलिन व सतार ही दोन वाद्ये बुवांची अत्यंत आवडती. फावल्या वेळात बुवा त्यांवर रियाज करीत व ही वाद्ये ते तयारीने वाजवीत असत. बुवांचा शिष्यपरिवारही मोठा आहे. कै. केशवराव भोसले, बापुसाहेब पेंढारकर, मास्टर दीनानाथ, चाफेकर, कागलकरबुवा, हरिभाऊ घांग्रेकर, दत्ती-बाई, बुवांचे चिरंजीव शिवरामबुवा वझे, तानीबाई इत्यादी बुवांचे शिष्य नामवंत झाले. बुवांच्या ध्वनिमुद्रिकाही पुष्कळ आहेत, त्यामुळे त्यांचे गाणे कसे होते याची आजच्या श्रोत्याला सहज कल्पना येईल. त्यांनी आपल्याला मिळालेल्या सुरेख चिजांची नोटेशनसह 'संगीत कला प्रकाश' या नांवाने दोन विभागांत पुस्तके छापून प्रसिद्ध केलेली आहेत.

आयुष्याच्या अखेरीच्या काळात बुवा रेडियोवर मोठ्या प्रेमाने गात असत. असंख्य लोकांनी त्यांचे गाणे मनमुराद ऐकले. बुवांचे मार्मिक आणि विनोदप्रचूर संभाषण ऐकणे म्हणजे एक मेजवानीच वाटे. त्यांच्या आयुष्याला विशाल अनुभवांची जोड होती. त्यांना फक्त दोनच व्यसने होती. एक गाण्याचे आणि दुसरे खाण्याचे. 'जो गवय्या है सो खवय्या भी होता है' हे त्यांचे आवडते वाक्य होते आणि त्याप्रमाणे ते अखेरपर्यंत वागले. उधळेपणा बुवांनी कधी केला नाही. त्यामुळे अखेरच्या आयुष्यात आर्थिक दैन्यावस्था त्यांना भोगावी लागली नाही. दुर्मिळ चिजांचे दोन संग्रह प्रसिद्ध करून भावी पिढ्यांवर त्यांनी उपकार करून ठेवलेले आहेत. अमाप कष्ट करून बुवांनी पुरुषार्थ आणि लौकिक साधला आणि या श्रेष्ठ कलावंताने ५ मे १९४५ रोजी पुणे मुक्कामी देह ठेवला. वझेबुवा म्हणजे प्रखर ध्येयवादी कलावंताचा आदर्श नमुना. महाराष्ट्राला त्यांच्याबद्दल अभिमान वाटतो.

• • •

# संगीतसम्राट अल्लादिया खाँसाहेब

शास्त्रीय संगीताची साधना करताना महाराष्ट्रातील लोकांना जे कष्ट उपसावे लागले आणि आपल्या अर्ध्याअधिक आयुष्याची वाट लावावी लागली तसे कष्ट किंवा दगदग उत्तर हिंदुस्थानातून जे घरंदाज गायक-वादक महाराष्ट्रात येऊन स्थायिक झाले त्यांच्या वाट्याला आले नाहीत. एकतर गायन-वादन-नृत्याबद्दल महाराष्ट्राला आस्था कमीच होती. या गोष्टींना सोवळ्याचाही कडक अडथळा होता आणि अशा परिस्थितीतही जे महाभाग विद्या मिळवायला गेले ते अकिंचन अशा स्थितीत. त्यामुळे अशा साधकांची उमेदीची वर्षे गुरूसेवा करण्यात आणि चिंता वाहण्यात खर्ची पडली. उत्तर हिंदुस्थानी गायकांचे तसे नव्हते. त्यांची घराणीच कलावंताची. गायन-वादन हे त्यांचे खानदान. त्यांचे आईकडूनचे, वडिलांकडूनचे आणि अवतीभवतींचे सर्व आप्त-नातलग गायक-वादक! संगीत विद्या हेच प्रत्येकाचे धन, आणि 'देता किती घेशील' अशी

त्यांच्या घराण्यात जन्माला आलेल्या मुलांची परिस्थिती.

वाडवडील अहर्निश संगीत साधनेत निमग्न असलेले. घरचे वातावरण असे की राजकारण, समाजकारण, अर्थकारण इत्यादी सर्व 'कारणे' गाण्याची. श्रीमंती मोजायची रुपया-मोहरांनी नाही, तर किती हजार अस्ताई-अंतरे आणि ध्रुपदे याद आहेत या संख्येवर. त्यांचा खानदानाचा इतिहास वाचताना 'मुलीच्या लग्नात जावयाला हुंडा म्हणून अमुक शेकडे अस्ताई-अंतरे दिले' असाच इतिहास वाचायला मिळतो. ज्यांनी 'फरुखाबादी' घराणे जन्माला घातले त्या विलायत अलीखाँसाहेबांना त्यांच्या लग्नात हुंडा म्हणून लखनौ घराण्यातील (तबल्यातील) तीनशे कायदे मिळालेले होते. विलायत अलींनी त्यावर वेगळ्या रीतीने मेहनत करून आपला असा एक नवा बाज तयार केला आणि ते फरुखाबादचे असल्याने तो बाज 'फरुखाबादी' या नांवाने प्रसिद्धीला आला. हा तबल्यातला इतिहास उदाहरण म्हणून सांगितले. तर सांगायचे तात्पर्य असे, की संगीताची तशी पिढिजात घराणी महाराष्ट्रात नसल्यामुळे व ही भूमी तसल्या गोष्टींना पोषकही नसल्यामुळे मराठी लोकांना अभिजात संगीताची ती गंगा महाराष्ट्रात आणावयाला भगीरथ प्रयत्न करावे लागले.

पण ती एकदा आल्यानंतर अभिजात संगीताची श्रवणभक्ती ईश्वर-भक्तीइतकीच महाराष्ट्रात वाढू लागली आणि महाराष्ट्रातील प्रमुख ठिकाणे ही उत्तर हिंदुस्थानातील श्रेष्ठ गवय्यांची उतारपेठच झाली. अनेक घरंदाज गायकांनी इथे येऊन मुक्काम ठोकायला प्रारंभ केला. महाराष्ट्रीय रसिक त्यांना सन्मानाने वागवू लागले. उत्तरेकडे सरंजामशाहीच्या लहरीवर या कलावंतांना नाचावे लागत होते; पण महाराष्ट्राने मात्र त्यांच्या मर्जीला येईल तसे त्यांना वागू दिले. त्यात व्यत्यय आणला नाही. गवय्या-बजवय्यांची सेवा महाराष्ट्राने जशी केली तशी ती इतरांनी केली असेल असे वाटत नाही. उत्तरेकडील राजेरजवाडे धन देत होते; पण तशी सेवाही करून घेत होते. तिथे नर्तकींना रत्नहारांची बिदागी

मिळाली; पण केव्हा? हातावर आणि डोक्यावर एकाच वेळी मद्याचे घडे घेऊन त्यातील मद्य न सांडता तोल सांभाळून उत्तानपणे नाचल्या तेव्हा! नृत्यशिक्षकांची कदर दास म्हणूनच व्हायची; पण महाराष्ट्राने त्यांना गुरू मानून सांदीपनीचा मान दिला. उत्तरेकडचे गायक-वादक व नर्तक महाराष्ट्रावर प्रेम करून इथेच राहिले ते त्यामुळे.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस उत्तरेकडून जे अनेक गायक-वादक महाराष्ट्रात आले त्या सर्वांनीच आपापल्या कलागुणांनी कमी अधिक प्रमाणात महाराष्ट्रात लोकप्रियता मिळविली. पण अचाट कल्पनाविलास, असामान्य प्रतिभाशक्ती व श्रोत्यांच्या बुद्धीला गुंग करून सोडणारी अशी गायकी घेऊन १८९३–९४ सालाच्या सुमारास आणखी एक घराणेदार गवय्या महाराष्ट्रात उतरला. त्यांचे नांव खाँसाहेब अल्लादियाखाँ. गायनातील जाणतेपणाने रस घेणाऱ्या लोकांना तर त्यांच्या गायकीने बुचकळ्यात पाडलेच पण त्यांच्या बैठकीत, येथील गवयी लोकदेखील प्रश्नचिन्हांकित चेहरा ठेवून बसू लागले. ते गात होते ते राग प्रचारातील रागांपैकी नसत. त्यांच्या अस्ताई-अंत्राची बंदिप लयबद्ध आणि झोकदार असे. त्यांची 'बोलतान' आणि 'बोल-उपज' अंग इतके विलक्षण बांधेसुद असे की त्याची नक्कल करणे किंवा ते आकलन होणे कठीण जाई. जसे त्यांचे बिलंपत आलापचाहीचे अंग चिवट होते तसेच एखाद्या गोफासारख्या गुंफलेल्या तानेची फेक सुरू झाली की तान संपून मुखडा घेऊन समेवर येईपर्यंत श्रोत्यांचा श्वास रोधला जाई इतका दम श्वास दीर्घ असे. तानेच्या त्या उंच फेकीकडे लक्ष देऊन आग्रा घराण्याचे गायनसम्राट नथ्थनखाँसाहेबांनी म्हणावे—"भय्या, जहां तुम्हारा गला जाता है वहां हमारी नजर भी नहीं ठहरती!"

अल्लादियाखाँसाहेबांचे गाणे ऐकल्यानंतर महाराष्ट्रात बुद्धिमान लोकांची पिढीच्या पिढी दिपून गेली. कुणी त्यांना 'संगीत सूर्य' म्हटलेले आहे, तर कुणी 'संगीतातील भगीरथ' म्हटलेले आहे; कुणी 'गायन महर्षि'

म्हटलेले आहे, तर कुणी 'गायन सम्राट' म्हटलेले आहे. संगीतकला मर्मज्ञ अशा डॉ. बाबासाहेब जयकरांनी तर अल्लादियाखाँ यांना 'गायन-कलेतील गौरीशंकर' अशा विशेषणांनी गौरविलेले आहे. नामदार बाबासाहेबांसारख्यांनी अशा शब्दांनी खाँसाहेबांचा गौरव करावा याहून भाग्य ते दुसरे कोणते? खाँसाहेबांची गायनकला तितकीच थोर होती म्हणूनच या चिकित्सक बुद्धिमान पिढीने तशा स्तुतिसुमनांनी त्यांचा गौरव केला, अन्यथा नाही.

खाँसाहेब अल्लादियाखाँ यांचा जन्म जयपूर संस्थानातील उनियारा या लहानशा जहागिरीत १८५५ साली झाला. त्यांचे वडील ख्वाजा अहमदखाँ हे त्या उनियारा जहागिरीतच दरबार गायक होते. खाँसाहेबांचे पाळण्यातले खरे नांव 'गुलाम अहमद'; पण खाँसाहेबांच्या आधी एकामागून एक अशी पांच मुले गेल्यामुळे खाँसाहेबांना 'अल्लादिया' असे घरची मंडळी संबोधू लागली, आणि पुढे तेच नांव सर्वांच्या तोंडी झाले.

खाँसाहेबांच्या घराण्यातला मूळ पुरुष 'नाथ विश्वंभर' हे संत वृत्तीचे आणि गायनवादनात पारंगत होते. हे शांडिल्य गोत्री आद्य गौड ब्राह्मण. स्वामी हरिदासांचा जन्मही याच कुळात झालेला होता. या हिंदु संगीतकारांनी कालांतराने मुसलमानी धर्म स्वीकारला त्याला कारणही तसेच विलक्षण घडले. नाथ विश्वंभराच्या घराण्यातील गायक 'अनूप' नांवाच्या संस्थानात दरबार गायक होते. अनूपचा राजा या गायकांना गुरूस्थानी मानीत असे. एकदा काय झाले की दिल्लीच्या तख्तावर बसलेले तत्कालिन बादशहा शहाजहान यांचे व अनूप संस्थानाधिपतीचे काही वाकडे आले आणि बादशहाने त्यांना पकडून आणून कैदेत ठेवले. अनेकांनी नाना परीने खटपटी लटपटी करून पाहिल्या पण बादशहा त्यांची सुटका करीना.

संस्थानच्या आश्रयाला असणाऱ्या या गायकांना ही गोष्ट अधिक लागली व "आह्मी राजाची सुटका करू" अशी प्रतिज्ञा करून हे गायक संस्थानातून निघाले. मजल दरमजल करीत व जाताना गाण्यात दिग्विजय करीत ते दिल्ली येथे आले व मध्यवर्ती वस्तीत जागा घेऊन तिथे जलसे करण्याचा त्यांनी धूमधडाका चालविला. ही वार्ता दिल्लीभर पसरावयाला वेळ लागला नाही. शहरातील अमीर-उमराव या बैठकांना गर्दी करून सोडू लागले. अर्थातच ही गोष्ट बादशहाच्या कानावर गेली. बादशहांकडून दरबारात गाण्याकरिता रीतसर आमंत्रण आले. अनूप दरबारच्या या गायकांना हवी होती ती संधी आली.

दरबारात हे गायक इतके सुंदर गायले, की शहाजहान बादशहा खूष झाले आणि 'चाहेल ते मागा' असा सवाल त्यांनी गायकांसमोर टाकला. गायक मोठे हिकमती. त्यांनी चिंताग्रस्त चेहरा करून चुळबुळ केली; पण बादशहाला वाटले याचक घाबरताहेत, आपल्या दानतीबद्दल शंका घेताहेत. त्यांनी पुन्हा अधिक जोरदारपणे सांगितले—"मागाल ते देईन!" गायकांनी मोका साधला. म्हणाले—"बादशहा, आम्ही मागू ते तुम्ही द्याल आणि दिला शब्द कल्पांतीही मागे घेतला जाणार नाही म्हणून या ठिकाणी आम्ही एवढेच मागतो की, तुमच्या कैदेत असलेल्या आमच्या अनूपच्या राजांची तुम्ही सोडवणूक करा. बस्स. एवढेच!"

शहाजहान बादशहा हसला; पण मागणी मंजूर करताना त्याने आणखी एक अट घातली. म्हणाला—"तुमची मागणी मी मंजूर करतो; पण माझी एक शर्थ आहे?" गायकांनी उत्सुकतेने विचारले—"कोणती शर्थ? आपण घालाल ती शर्थ मानायची आमची तयारी आहे!" आनंदाच्या भरात ते गायक हे वाक्य सहज बोलून गेले, पण एका राजनीतिज्ञ व चाणाक्ष असामीच्या जाळ्यात त्या शब्दांनी आपण पुरते अडकले गेलो आहोत याची जाणीव त्यांना झाली नाही. शहाजहान



संगीतसम्राट अल्लादिया खाँसाहेब

बादशहाने सवाल टाकला—" गायकहो, माझी शर्थ एवढीच आहे, की तुम्ही मुसलमानी धर्म स्वीकारून माझ्याच दरबारात गायक म्हणून राहावे व आमच्या पंक्तीला नित्य जेवावे!" झाले. दरबार बरखास्त झाला. बादशहाने दिला शब्द पाळून अनूपच्या राजाला सोडले आणि गायकांनाही 'शर्थ' पाळल्याशिवाय गत्यंतर राहिले नाही. आपल्या प्रतिज्ञापूर्तीसाठी या राजनिष्ठ गायकांना धर्मांतर करावे लागले व तेव्हापासून आद्यगौड ब्राम्हणांचे ते गायक घराणे मुसलमान झाले. हिंदुस्थानातील अशा अनेक विद्यमान ख्यातनाम खानदानी गायकांची, बजवय्यांची व नर्तकांची घराणी मूळ हिंदू होती असे इतिहास सांगतो; किंबहुना त्यांचे वंशजही अभिमानाने सांगतात.

अल्लादियाखाँसाहेब स्वतःला 'डागूर बानीचे' गायक म्हणवीत असत. 'बानी' म्हणजे वाणी. अकबर बादशहाच्या आश्रयाला असलेल्या ध्रुपद गाणाऱ्या चार कलावंत ब्राम्हणांच्या मूळ निवास्थानांच्या नांवावरून या बानी निर्माण झालेल्या आहेत. अशा मुख्य बानी चार आहेत—'गौडार बानी', 'खंडार बानी', 'नौहार बानी' व 'डागुर बानी'. जशी त्या त्या गांवाच्या नांवावरून घराणी ओळखली जातात, तशाच त्या त्या मूळ पुरुषांच्या गावावरून बानीही ओळखल्या गेल्या. उदाहरणार्थ—गौडार बानीचे जनक तानसेन धरले जातात. तानसेनचे पुढील वंशज गौडारीला पिढ्यान्‌पिढ्या राहिल्यामुळे त्यांची वाणी गौडारी म्हणून ओळखली जाऊ लागली. डागुरी बानीचा जनक ब्रजचंद ब्राह्मण डागर देशीचा राहाणारा. खण्डार बानीचा जनक राजा समोखनसिंह राजपूत. हा खंडारचा निवासी. नौहार बानीचा श्रीचंद राजपूत हाही नौहार निवासी. म्हणजे ज्यांच्या त्यांच्या वसतीस्थानावरून घराणी किंवा बानींची नांवे पडली. पुढे ज्यांना जी वाणी अधिक प्रिय वाटेल तिचे ते अनुयायी झाले व आपल्याला त्या त्या वाणीचे अनुयायी म्हणवून घेण्यात अभिमान मानू लागले. अल्लादियाखाँसाहेबांच्या पूर्वजांनी डागुरी बानीचा स्वीकार

केला. त्यांचे हे सर्व पूर्वज ध्रुपद गायकीत तरबेज व ख्यातनाम असे होऊन गेले. अफाट विद्वत्तासंपन्न असे हे लोक शेवटपर्यंत फकिरी वृत्तीने राहिले आणि आयुष्यभर त्यांनी संगीत साधना केली. या घराण्यातील नथ्थूखाँ व मानतोलखाँ हे दोघे बंधू म्हणजे संगीतातील दोन योगीपुरुष होऊन गेले. ते कंठसिद्ध-साक्षात्कारी गायक होते असे संगीताच्या इतिहासात नमूद आहे.

अल्लादियाखाँसाहेबांचे वडील अहमदखाँ व चुलते जहांगीरखाँसाहेब. अहमदखाँसाहेब सुरुवातीला उनियारालाच दरबार गायक होते; पण पुढे त्यांना 'टोक' दरबारात मानाचे स्थान मिळाल्याने ते तिथे गेले. आपल्या लाडक्या मुलावर त्यांचा फार जीव होता. थोड्याशा लिहिण्या-वाचण्याबरोबर ते त्याला आपल्या घराण्याची गायकीही शिकवीत होते; पण अल्लादियाखाँसाहेबांच्या वयाच्या १५ व्या वर्षीच ते एकाएकी वारले. त्यामुळे चुलते जहांगीरखाँ यांच्यावर मुलांना वाढविण्याची सर्व जबाबदारी येऊन पडली. ही मुले म्हणजे त्यांचा लहान भाऊ हैदरखाँ आणि पाठच्या दोन बहिणी; पण जहांगीरखाँसाहेबांनी मुलांना पित्याची उणीव भासू दिली नाही. त्यांनी मायेची पाखर अशी घातली की, मुलांना आपण पोरके आहोत असे कधीही वाटले नाही.

अहमदखाँ व जहांगीरखाँ हे दोघे भाऊ कोठीवाले गवय्ये म्हणूनच ओळखले जात होते. जहांगीरखाँ यांना वीस-पंचवीस हजार चिजा याद होत्या असे म्हणतात. जहांगीरखाँ यांचा एकेक स्वर म्हणजे जणू एकेका उंच मिनारासारखा, त्यांचे गमकेचे अंग म्हणजे उफाळलेल्या दर्यावरील लाटांसारखे, असे वर्णन जाणते लोक करीत असतात. अशा या कंठसिद्ध गवय्याने आपल्या पुतण्याला तयार केले. त्यांची करडी नजर पुतण्याच्या वर्तनावरदेखील असे. घरंदाजपणाला बाद येईल असे वर्तन त्याच्या हातून लवमात्रही घडू नये याबाबत ते दक्ष असत. वयाच्या एकविसाव्या वर्षी एकदा अल्लादियाखाँ काही उनाडटप्पू मुलांबरोबर

थोडेसे हुंदडले. एके दिवशी याच मित्रांबरोबर गमजा करता करता बाहेर केवढा वेळ गुजरला हे त्यांना कळले नाही. अपरात्री धावत ते घरी आले. जहांगीरखाँसाहेब पुतण्याची वाट पहात बसले होते. त्यांच्या रागाचा पारा बराच चढलेला होता. पुतण्या डोळ्यांसमोर आला तसा आपल्या पायातला चढाव काढून त्याच्या मस्तकावर कोरडे ओढायला सुरुवात केली आणि मस्तक जमिनीला टेकेपर्यंत त्यांनी त्याला फोडून काढला; पण अल्लादियाखाँनी हूं की चूं केले नाही, की प्रतिकार केला नाही. शेवटी त्यांची आई मध्ये पडली. तिने मुलाला सोडवून घेतले. त्यानंतर उभ्या आयुष्यात घराण्याच्या प्रतिष्ठेला बाध येईल असे वर्तन त्यांच्या हातून घडले नाही.

जहांगीरखाँसाहेबांनी अल्लादियाखाँसाहेबांना बारा वर्षे तालीम दिली आणि खाँसाहेबांनी आपल्या विलक्षण बुद्धिमत्तेने विद्या कमावली. तत्कालिन मोठमोठ्या गवय्या-बजवय्यांच्या मैफली त्यांनी मन लावून ऐकल्या. चुलत्यांकडे येणाऱ्या खानदानी कलावंतांच्या चर्चा तासन्‌तास ऐकल्या. मनन केले, रियाज केला व थोरांचा आशीर्वाद घेऊन अजयगड संस्थानात आयुष्यातल्या पहिल्या मैफलीसाठी बंधू हैदरखाँसह ते गेले. त्यांची ती पहिली मैफल अतिशय वाखाणली गेली व संस्थानाधिपतींकडून बक्षिसही चांगले मिळाले. तिथेच त्यांना बाहेरची गाण्यांची आमंत्रणेही मिळाली. आपल्या घरच्या प्रपंचाचा भार आता आपण उचलला पाहिजे ही आच त्यांना कित्येक दिवसांपासून लागली होती; पण वेळ येत नव्हती. आता बाहेर पडलोच आहोत तर मिळविता येईल तेवढे मिळवून परत जाऊ असा विचार करून, जिथून आमंत्रणे येतील ती ती स्वीकारीत अनेक लहानमोठ्या संस्थानातून फिरत पाटणा, अलाहाबाद, कलकत्ता आदी शहरांतून नांव कमवीत ते नेपाळपर्यंत गेले.

नेपाळच्या महाराजांनी त्यांचे गाणे ऐकून दरमहा तीनशे रुपये तनख्यावर त्यांना हत्तीचे वाहन देऊन आपल्या पदरी ठेवले. नेपाळात

त्यांनी दोन वर्षे काढली. लोकप्रियता खूप वाढली होती. राजाची खास मेहरबानी होती. पक्वान्नाचे ताट रोज पुढे येई व वाहनालाही हत्ती होता; पण घरातून बाहेर पडून सहा वर्षांचा अवधी लोटला होता. आता त्यांना घरची ओढ लागली. इतकी वर्षे बाहेर राहिल्याने तारुण्याला तडा जाणे, हातून नसता प्रमाद घडणेही अशक्य नव्हते. खाँसाहेबांनी विचार केला आता घरी परतलेच पाहिजे आणि थोड्याच दिवसात त्यांची इच्छा पुरी झाली. नेपाळच्या महाराजांच्या बंधूबरोबर ते लौकिक व धन घेऊन गावी परत आले.

सहा वर्षांच्या या दौऱ्यात जसे खाँसाहेबांनी लोकांना ऐकविले तसेच त्यांना ऐकावयालाही मिळाले. घरंदाज गवय्ये, घरंदाज पखवाजी, घरंदाज तबलिये, तंतकार निरनिराळ्या राज्यांत त्यांना ऐकायला मिळाले. त्यांचा थोडाफार सहवासही झाला. दृष्टी विशाल झाली. अनेक सुंदर चिजा ज्यांनी बांधलेल्या आहेत आणि गेल्या तीन पिढ्या ज्या आवडीने गातात असे एकाहून एक विद्वान 'दरसपिया', 'रंगीले', जयपूरचे बहिराम-खाँसाहेब, रामपूर दरबारचे वझीरखाँ बीनकार, इत्यादी श्रेष्ठ लोकांशी खाँसाहेबांचा निकटचा संबंध आला. गावी आल्यानंतर त्यांच्या चुलत्यांनी पहिली गोष्ट कुठली केली असेल तर त्यांनी खाँसाहेबांचा—त्यांच्याच घराण्यातील मुलीशी—विवाह करून दिला. खाँसाहेबांना दोन दोन वर्षांच्या अंतराने तीन मुलगे झाले. थोरला नसिरुद्दीनखाँ, दुसरा मंजीखाँ व तिसरा भूर्जीखाँ. विवाहानंतर सात आठ वर्षे खाँसाहेब आपल्या कुटुंबियांसमवेत राहिले. या कालावधीत बुंदी संस्थानातही त्यांनी दोन वर्षे नोकरी केली. पुन्हा एकदा दिग्विजयाला बाहेर पडावे असे त्यांच्या मनाने घेतले. उत्तर दिग्विजय त्यांनी केला होता, तेव्हा आता दक्षिणेस जावे असा विचार करून व त्याचवेळीं अहमदाबादच्या एका परिचित धनिकाच्या आमंत्रणावरून ते प्रथम अहमदाबादला आले. तिथे काही दिवस राहून ते बडोद्याला आले. बडोद्यात त्यांचा फार

लौकिक झाला; पण तिथले एकंदर वातावरण त्यांना न आवडल्याने ते महाराष्ट्रात उतरले.

१८९३ साली अल्लादियाखाँसाहेबांनी महाराष्ट्रात पाऊल ठेवले व आपल्या आयुष्याच्या अखेरीपर्यंत म्हणजे तब्बल पन्नास वर्षे ते महाराष्ट्रात राहिले. महाराष्ट्रातून ते पुन्हा उत्तरेकडे गेलेच नाही. महाराष्ट्राशी ते इतके एकरूप झाले की एखाद्या त्रयस्थाला वाटावे–अल्लादियाखाँसाहेबांचे 'उनियारा' नांवाचे गाव कुठेतरी महाराष्ट्रातच असावे. मराठी भाषिक राज्यात आपण आलेलो आहोत, तेव्हा मराठीशी आपला पूर्ण परिचय हवा म्हणून मराठी भाषा खाँसाहेब लिहिण्यावाचण्यापासून शिकले; आणि पुढे संतवाङ्मयाचा व्यासंग करण्यापर्यंत त्यांची मजल गेली. जसजसा त्यांचा अभ्यास वाढू लागला तसतसे महाराष्ट्राबद्दल प्रेम आणि अभिमानही त्यांना वाटू लागला. 'महाराष्ट्रियांसारखे रसिक व मर्मग्राही श्रोते इतर कोणत्याही प्रांतात आढळले नाहीत' असें ते स्पष्ट सांगत असत. 'कलाविलासाची पारख महाराष्ट्रालाच अधिक' 'उत्तर पैदा करती है। लेकिन दख्खन दाद देती है' असे ते सदोदित म्हणायचे.

खाँसाहेब ज्यावेळी मुंबईत आले त्यावेळी अशा श्रेष्ठ दर्जाच्या कलावंतांची पारख आणि कदर करणारी घराणी गोमंतकीय कलावंतांची होती. खाँसाहेबांचे पहिले गाणे बापू तारा या प्रसिद्ध गोमंतकीय कलाकारांच्याच घरातील दिवाणखान्यात झाले. बापू तारा यांच्याकडे त्या दिवशी एक मोठा जलसा आयोजित केलेला होता. मुंबईतील ख्यातनाम कलावंतांचा तो एक मेळावाच होता. अनेक गायक-गायिका त्या रात्री तिथे गायल्या. त्यात खाँसाहेब, नथ्थनखाँ, आग्रेवाल्यांच्या शिष्या बाबलीबाई पालकर अप्रतिम गाऊन गेल्या. वास्तविक बाबलीबाईंच्यानंतर कुणीही गात नसत. बाईंची प्रतिष्ठाही तशीच होती. गाण्यासाठी ही गोमंतकीय बाई आजन्म ब्रह्मचारिणी राहिली आणि सतत बारा वर्षे तिने नथ्थनखाँसाहेबांजवळ तालीम घेतलेली होती.

बावलीबाईंनी बैठक संपविली तेव्हा पहाट झालेली होती. यानंतर आता कोण काय गाणार आणि कसा रंग जमविणार असे प्रश्नचिन्ह सर्वांच्याच चेहऱ्यावर होते; पण बावलीबाई उठल्या आणि अल्लादियाखाँ-साहेबांजवळ जाऊन म्हणाल्या–" खाँसाहेब, माझ्या गुरूंकडून मी आपली फारच तारीफ ऐकलेली आहे. आपलं गाणं ऐकावं म्हणून मी माझं गाणं लवकर आटोपलं. आपण माझी निराशा करू नये. आपल्यासाठी मी थांबून राहिलेली आहे!" खाँसाहेबांनी बैठक मंडित केली आणि थोड्याच वेळात चैतन्याचे फवारे उधळले. आळसावलेले कलावंत टवटवीत झाले. एका नवीन गायकीने त्यांना विस्मयचकित केले. पहिली चीज संपली तशी बावलीबाई भर मैफलीत उभी राहून म्हणाली– "क्षमा करा मला; पण मला बोलल्यावाचून राहवत नाही. माझे गुरू नथ्थनखाँ यांच्यापर्यंतच गायनकला संपलेली आहे असं आतापर्यंत मला वाटत होतं; त्यांच्या हयातीपर्यंत ती जिवंत राहील अशी माझी कल्पना होती. पण हे गाणं ऐकल्यानंतर आपण होऊन मी कबूल करते की माझी ती कल्पना चुकीची होती. अल्लादियाखाँसाहेब, आपलं गाणं ऐकून वाटतं गायनकला अमर आहे!"

बावलीबाईसारख्या ख्यातनाम गायिकेचे उद्गार आणि खाँसाहेबांचे अनाकलनीय उत्कृष्ट गाणे याची चर्चा मुंबईतील कलाप्रेमी लोकांत होऊ लागली. मुंबईतील बुद्धिमान सुशिक्षित रसिक वर्ग खाँसाहेबांचा चाहाता झाला आणि त्याबरोबर इतरांत मत्सराग्नीची ठिणगी पडली. 'कोण कुठला, काल येतो आणि आज थोरपदाला चढतो म्हणजे काय? इतकी वर्षे मुंबईत काढून जे आपल्याला पाहायला मिळू नये ते याने दुसऱ्याच दिवशी पटकवावे म्हणजे हा आहे तरी कोण?' मुंबईतील स्थानापन्न झालेले गायक-वादक द्वेष करू लागले, उघड उघड आव्हाने करू लागले. पण हा विरोध खाँसाहेबांना फार काळ सहन करावा लागला नाही. कोल्हापूर संस्थानातील जहागिरदार श्री. बापूसाहेब कागलकर

यांच्यापाशी नोकरीला असलेल्या तानीबाई या गायिकेला शिकविण्यासाठी म्हणून बापूसाहेब त्यांना घेऊन कोल्हापूरला आले आणि छत्रपती शाहू महाराजांनी खाँसाहेबांचे गाणे ऐकून त्यांना आपल्या दरबारातच नोकरीला ठेवले.

राजर्षी शाहू महाराजांनी खाँसाहेबांना सर्व सवलती दिल्या व काहीही उणे पडू दिले नाही. अतिशय प्रेमाची वागणूक देऊन या थोर गवय्याची कदर केली. कोल्हापुरातील अन्य गायक कलावंतांनी उठविलेल्या एका वादळालाही खाँसाहेबांना तोंड द्यावे लागले; पण प्रतिपक्षच तोंडघशी पडला. खाँसाहेब घराणेदार कलावंत नाहीत असे या प्रतिपक्षाचे म्हणणे होते; पण खाँसाहेबांनी आपल्या पूर्वजांनी मिळविलेला ताम्रपट आणि वंशावळ आणून दाखवून शाहू छत्रपतींना थक्क केले व असले हे अमूल्य रत्न आपल्या दरबारात ठेवण्यात आपण मुळीच चूक केली नाही याची महाराजांना खात्री पटली. असल्या या घटनांचा मात्र खाँसाहेबांना उद्वेग आला.

कोल्हापुरात असताना त्यांना अनेक प्रलोभने दाखवून इतर ठिकाणी बोलावणी आली पण खाँसाहेबांनी कोल्हापूरची नोकरी सोडली नाही. जवळ जवळ दोन तपे ते कोल्हापुरात राहिले. शाहू छत्रपतींच्या मृत्यू-नंतर १९२२ मध्ये खाँसाहेबांनी कोल्हापूर सोडले आणि ते मुंबईत आले. कोल्हापुरात असतानादेखील त्यांना अन्य ठिकाणी जलशांना वगैरे जायला मुभा होतीच. पं. भास्करबुवा बखले यांना खाँसाहेबांनी कोल्हापूर दरबारच्या नोकरीत असतानाच तालीम दिली होती; पण १९२२ सालीच भास्करबुवा गेले आणि खाँसाहेबांना पहिला धक्का बसला. आपले नांव भारताच्या कानाकोपऱ्यात गाजविणारा एक विद्वान् शिष्य गेला याचे त्यांना फार दुःख झाले.

खाँसाहेब मुंबईत कायमचे राहायला आले त्यावेळी त्यांचे वय सत्तरीच्या आसपास होते. पुढच्या काही वर्षांतच त्यांच्यावर दुःखाचे

पहाड कोसळले आणि या गानभीष्माचे अंतःकरण मूकपणाने जळत राहिले. मुंबईतील २४ वर्षांच्या मुक्कामात त्यांनी आपल्या घराण्याच्या कलेतील इंगिते संगीत रसिकांसमोर खुली केली. सूरश्री केसरबाई केरकरांना जवळ जवळ सव्वा तपपर्यंत तालीम देऊन एक अजोड गायिका त्यांनी निर्माण केली. श्रीमती मोगूबाई कुर्डीकर, सर्वश्री गोविंदबुवा शाळिग्राम, शंकरराव सरनाईक, निवृत्तिबुवा सरनाईक, शेट गुलूभाई जसदनवाला, सारंगिये मजीदखाँ, कुमारी लीलाबाई शिरगांवकर, सौ. सुशीलाराणी पटेल इत्यादी गायक-गायिकांना त्यांच्याकडून कमी अधिक प्रमाणात तालीम मिळाली. खाँसाहेबांच्या तिन्ही मुलांना त्यांच्याकडूनच तालीम मिळाली होती.

उत्तरीय आयुष्यात खाँसाहेबांना पुत्रप्रपौत्रांच्या वियोगाचा दारुण शोक सहन करावा लागला. त्यांचे धैर्य खचले. त्यांचे मधले पुत्र मंजीखाँसाहेब असामान्य गायक होते. आपल्या घराण्याची विद्या त्यांच्याकडे सुरक्षित राहून घराणे जिवंत राहील असा त्यांना सुप्त विश्वास होता; पण त्यांच्या डोळ्यादेखत मंजीखाँ गेले तेव्हा आता आपले घराणे संगीताच्या बाबतीत उजाड होणार अशी खात्री पटून ते अधिकाधिक खचत चालले. पण मुंबईतील वास्तव्यातली शेवटची काही वर्षे त्यांच्या तपःश्चर्येची योग्य कदर करणारी ठरली. या अवधीत त्यांच्या चाहत्यांनी त्यांच्या सत्काराचे मोठमोठे समारंभ घडवून आणून गायन क्षेत्रातील या महापुरुषाचा गौरव केला. जिथे त्यांनी आयुष्यातली पंचवीस वर्षे नोकरी केली त्या कोल्हापुरात त्यांचा प्रचंड सत्कार होऊन छत्रपती ताराबाई राणीसाहेबांच्या हस्ते त्यांना एक हजार रुपयांची थैली व मानपत्र करवीर निवासी जनतेने दिले. आणि पुढे कोल्हापुरातील एका चौकास खाँसाहेबांचे नांव देऊन मध्यवर्ती ठिकाणीं मोठा समारंभ करून खाँसाहेबांचा एक अर्धपुतळाही बसविला.

आयुष्यातील शेवटच्या दहा वर्षांत महाराष्ट्रातील कलारसिकांनी

१४२०९



जितके गौरविता येईल तितके खाँसाहेबांना गौरविले. उत्तुंग अशा सर्व पदव्या त्यांना बहाल केल्या व आपले कर्तव्य पुरे केले. महाराष्ट्रीय संगीत रसिकांनी दिलेल्या प्रेमाच्या अखंड छायेत १६ मार्च १९४६ रोजी खाँसाहेब अल्लादियाखाँ यांचा आत्मा पैगंबरस्वरूपी विलीन झाला. एका घरंदाज, विद्वान व श्रेष्ठ गायकाला गायनकलासृष्टी पारखी झाली.

खाँसाहेबांपासून खास तालीम घेतलेल्या शिष्यांव्यतिरिक्त या घराण्याच्या गायकीचे पथिकही महाराष्ट्रात अनेक आहेत. श्रीमती लक्ष्मीबाई जाधव, वामनराव सडोलीकर, मल्लिकार्जुन मन्सूर, बालाजी, कृष्णराव चोणकर, श्री. टिळक, पोतदार, आजमबाई, सरदारबाई कटदगेकर इत्यादी व नव्या पिढीतील श्रीमती किशोरी आमोणकर, कु. कमल तांबे, सुहासिनी मुळगांवकर, रत्नाकर पै, कमल पाठारे, इत्यादी गायक प्रसिद्ध आहेत. खाँसाहेबांचे एक नातू अजिजुद्दीनखाँ कोल्हापुरात असतात. त्यांच्याजवळ खाँसाहेबांचे काही कवित्व सुरक्षित आहे. त्यांना खाँसाहेबांनी थोडी तालीमही दिली होती.

ग्वाल्हेर घराण्याची गायकी कष्टांनी व सेवाभावाने मिळवून जे साधक महाराष्ट्रात परतले, ज्यांनी त्या गायकीचा प्रचार केला आणि शास्त्रीय संगीताचे स्वरूप बहुजन समाजाला समजाविले, त्यांच्याविषयी महाराष्ट्रीयांच्या मनात पूजनीय भाव उत्पन्न झाला. जे मार्ग त्यांनी दाखविले ते रुळले गेले. एक महान संप्रदाय त्यांनी महाराष्ट्रात निर्माण केला. हा संप्रदाय म्हणजे एक फार मोठा इतिहास आहे. जिथे रिघाव नव्हता, तिथे तिथे गायनविद्येला त्यांनी प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. पण मराठी रसिकांचे मन जात्याच बुद्धिनिष्ठ. जितके ते परंपरेचे अभिमानी तितकेच नित्य नवे शोधणारे. जुन्याला सोने म्हणणारे पण नवे तेही हवे असे आवर्जून प्रतिपादणारे. त्यामुळे एकदा शास्त्रीय संगीतातील खाचाखोचा समजून घेतल्यावर, त्यांना

अधिकाधिक कूट समस्या सोडवाव्याशा वाटणे स्वाभाविक होते. 'किराना' घराण्याने स्वर, बोल व मांडणीतील सौंदर्यदृष्टी दिली. गाणे हे केवळ घोटीव कसरत नसून ते भावनेचे, रसिकतेचे व ममतेचे काम आहे, आणि शास्त्राला कलात्मक चौकटीत बसवून ते व्यवस्थितपणे मांडल्याने श्रोत्यांवर अधिक परिणाम होतो हे दाखवून दिले.

परंतु याहून पलीकडची दृष्टी जयपूर घराण्याने दिली. जयपूर घराण्याची नागमोडी वळणाची, रंगीबेरंगी गोफ विणण्यासारखी बरीचशी कठीण गायकी आणि त्यांचे अपरिचित नवे राग ऐकून महाराष्ट्रातील बुद्धिमान पिढी गायकीचा तो नवा प्रकार समजून घेण्यासाठी अहमहमिकेने पुढे आली. ज्यांची ग्रहणशक्ती मोठी होती व जे अधिक चतुर होते त्यांनी हा गायन प्रकार आत्मसात केला. ज्यांना ते जमले नाही ते त्या गायकीचे भक्त झाले. 'हे तर्काच्या पलीकडचे आहे' असे म्हणूनदेखील त्यात गुंजन करू लागले.

अल्लादियाखाँसाहेब महाराष्ट्रात येण्याआधी त्यांनी प्रचारात आणलेले अवघड असे राग संगीत रसिकांच्या माहितीत नव्हते. खटतोडी, खट, खोकर, हुसेनी तोडी, मालीगौरा, बिहागडा, पूर्वा, सावनी, सावनीनट, हेमनट, भूपनट, कामोद नट, सावनी कल्याण, बसंती केदार, रायसा कानडा, हुसेनी कानडा, काफी कानडा, बागेश्री कानडा, गारा कानडा इत्यादी रागांची नांवे ऐकून हे काय प्रकार आहेत, असा प्रश्न जसा श्रोत्यांना तसाच गायकांनाही पडे. "अहो, आम्हालाच जिथे अगम्य आहे तिथे इतर सामान्यांची काय कथा!" असे उद्गार पंडित भास्करबुवा बखल्यांसारखे गायनाचार्य काढीत असत; मग इतरांनी काय म्हणावे! परंतु असे हे अगम्य भासणारे स्वरूपदेखील महाराष्ट्रातील लोकांनी आत्मसात केले—नव्हे पचनी पाडले.

स्वातंत्र्योत्तर काळातील गेल्या सतरा-अठरा वर्षांत उत्तर हिंदुस्थानातून

जलशाच्या निमित्ताने अनेक कसबी गायक-वादक इथे आले; पण अल्लादियाखाँसाहेबांनी प्रसारीत केलेल्या गायकीचा यथातथ्य अनुकार करणारा—जाणत्याच्या बुद्धीला थक्क करणारा असा—त्या संप्रदायाचा एकही गवय्या किंवा बजवय्या दिसला नाही. जयपूरचे म्हणून जे गवय्ये येतात—व जे जयपूर घराणे असे नांव सांगतात—ते चक्क पतियाळा घराण्यांच्या गायकांचे अनुकरण करताना दिसतात. किंवा असेही असेल की जयपूर घराण्याची गायकी म्हणून जी आम्ही ओळखतो त्या घराण्याचे अल्लादियाखाँसाहेब हे शेवटचे गायक असून तेच महाराष्ट्रात आल्याने व उत्तरेकडे या उनियारा घराण्याचा प्रचारकच कुणी नसल्याने तिथे संप्रदाय निर्माण व्हावयाला आधारच राहिला नसावा. काय असेल ते असो पण महाराष्ट्र खेरीजकरून अन्य प्रांतांतील लोकांकडून ही गायकी ऐकायला मिळाली नाही हे मात्र खरे आहे!

महाराष्ट्रातदेखील विशेष करून बुद्धिवादी व सुविद्य माणसेच या संप्रदायात अधिक दिसतात. गायनात ज्यांचे विचार प्रगल्भ झालेले होते, किंवा ज्यांचा अन्य घराण्यांतील संगीताचा प्राथमिक अभ्यास पुरा झालेला होता असे अभिरुचीसंपन्न लोकच मागाहून त्या गायकीकडे वळले. म्हणजे बुद्धीला धक्का देणारे आणि विचारात पाडणारे असे काहीतरी वेगळे वैशिष्ट्य या गायकीत आहे हे निश्चित. न पेक्षा पंडित भास्करबुवा बखले यांच्यासारखे आधी दोन घराण्याची गायकी पचविलेले थोर व अष्टपैलु गायक या गायकीकडे वळते ना? स्वतःच्या वडिलांजवळची आणि अन्य ठिकाणची विद्या मिळवून सुविख्यात व्हायोलिनवादक व गायक गजाननबुवा जोशी यांनीही या गायकीचा अभ्यास केला. आधी अनेक ठिकाणी व्यासंग करून चार्टर्ड अकौंटंट श्री. वामनराव देशपांडे या गायकीकडे वळले. कोल्हापूरचे वकील श्री. बाबूराव जोशी यांनी या गायकीचा अभ्यास केला. आकाशवाणीचे श्री. मधुकर कानीटकर, धोंडूताई कुळकर्णी, श्री. पटवर्धन

इत्यादी याच घराण्याच्या गायकीचे अनुयायी आहेत. अशी आणखी कित्येक उदाहरणे देता येतील.

ज्यांना विलक्षण धारणा आहे त्यांच्याच पचनी ही गायकी पडली. दुसरे तिच्या वाटेला गेले नाहीत. अल्लादियाखाँसाहेबांनी आपल्या घराण्याचा तो ठेवा महाराष्ट्रातच ठेवला हे महाराष्ट्राचे भाग्य होय. महाराष्ट्राला या गायकीच्या बाबतीत तरी अन्य प्रतिस्पर्धी अजून कुणी आढळलेला नाही.

● ● ●

१५२०१

REFBK-0015201

महाराष्ट्र शासनाच्या प्रसिद्धी संचालनालयाची
अलीकडील काही साहित्यविषयक प्रकाशने :

**आनंदयात्री रवींद्रनाथ :**

*सं. : श्री. बा. भ. बोरकर*

**जा माझ्या माहेरा :**

*सं. : डॉ. सरोजिनी बाबर*

**एक होता राजा :**

*सं. : डॉ. सरोजिनी बाबर*

**तेजस्विनी :**

*कवी : श्री. विहंग*

**रणगर्जना :**

*भारतीय कवींचा प्रातिनिधिक कवितासंग्रह*

**साज शिणगार**

*सं. : डॉ. सरोजिनी बाबर*

**जयनाद :**

*मराठी कवींच्या राष्ट्रीय कवितांचा संग्रह*

संचालक, प्रसिद्धी संचालनालय,
महाराष्ट्र शासन, सचिवालय, मुंबई-३२.